म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. ५८७८.

IRBK-0105717

# विजेची वेल

अनंत काणेकर

किंमत तीन रुपये

८१०.९७०
५५१८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. (९)

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

6 AUG 1975

[कृ. मा. प.]

30५०४
२५०४
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क. ५७१७ नों. दि
IRBK-0105717

# विजेची वेल

अनंत काणेकर

किंमत तीन रुपये

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
२२ कसबा पेठ, पुणें २

• • •

पहिली आवृत्ति १९५६

• • •

सर्व हक्क लेखकाच्या
स्वाधीन आहेत.

• • •

मुखपृष्ठावरील चित्र :
दीनानाथ दलाल

• • •

मुद्रक :
द. ग. गपचूप
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार, पुणें २

• • •

३०५०४
आ. वा.
२५५४
मार्च ६५

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | माझा हिरवा मित्र | ५ |
| २ | दुरून आकाश साजरे... ! | ११ |
| ३ | *' सोवळा ' | १५ |
| ४ | आकाशांतील तारे आणि मी | २० |
| ६ | पुराणांतील वांगी | २४ |
| ७ | आरसा हंसला...... | २८ |
| ८ | *यजमान आणि पाहुणे | ३३ |
| ५/८ | कला आणि कायदा | ३९ |
| ९ | *शिकणारे आणि शिकविणारे | ४३ |
| १० | *' हात जोडले बुवा, साहेबापुढें ! ' | ४८ |
| ११ | *काय हा योगायोग ! | ५५ |
| १२ | माझीं मतं आणि शास्त्रज्ञ | ६२ |
| १३ | *' लहानपण दे गा देवा ! ' | ६५ |
| १४ | लेखण्या, बंदुका, संत, सज्जन... | ६८ |

१५ मनाच्या ढाली ७५
१६ *माझें आवडतें पान ७९
१७ ‘ मोठं, त्याहून मोठं ! ’ ८६
१८ *प्रतिपक्षावर मात ९०
१९ *पानिपत झालं नसतं ? ९७
२० *गेले ते दिवस... १०२
२१ शंकराचार्यांच्या गळ्यांत आइन्स्टाइन ! ११०
२२ जें माहीत हवं... ११३
२३ कल्पना असती तर... ११७
२४ ‘ पक्षि म्हणती ज्या आपुला...’ १२२

• • •

* ऑल इण्डिया रेडिओच्या सौजन्यानें लघुनिबंधात्मक भाषणें.

१ –

## माझा हिरवा मित्र

नुकत्याच दिवंगत झालेल्या संत-वाङ्मयाच्या एका श्रेष्ठ उपासकासंबंधीं एक गोष्ट मीं अलीकडेच वाचली. त्यांना मांजरें फार आवडत आणि दहा-वीस मांजरें त्यांच्या घरांत नेहमीं असत. या मांजरांवर त्यांचें अतिशय प्रेम असे आणि पोटच्या पोरांसारखी त्यांची ते काळजी घेत. या मांजरांपैकीं एका बोक्यानें एकदां त्यांना राग येईल असा कांहीं तरी अपराध केला. तेव्हां संतापून त्या बोक्याला मारण्याकरितां त्यांनीं कोपऱ्यांतली काठी घेतली, आणि त्याला मारण्याकरितां उगारली. त्याच्यावर ते काठीचा प्रहार करणार इतक्यांत ' नको ! ' ' नको ! ' असें तो बोका ओरडला. बोक्याच्या तोंडांतून माणसासारखे ' नको ' ' नको ' असे शब्द बाहेर पडलेले ऐकतांच ते चकित झाले. त्यांचा राग कुठल्या कुठें पळाला, आणि त्या बोक्याला त्यांनीं पोटाशीं धरलें.

माझ्याप्रमाणेंच माझ्या कांहीं मित्रांनीही त्या साहित्यिकासंबंधींची ही आठवण वाचली, तेव्हां त्यांच्यापैकीं बरेच जण या गोष्टीची थट्टा करून हंसूं लागले. कांहीं म्हणाले, ' संतांच्या आयुष्यांत जसे चमत्कार झालेले आपण ऐकतों तसेच संत-वाङ्मयाच्या उपासकाच्याही आयुष्यांत होतात म्हणायचे ! '

मला ही गोष्ट तितकीशी थट्टा करण्यासारखी वाटत नाहीं. त्याचें एक कारण असें कीं या वृद्ध साहित्यिकाचा आणि माझा चांगला स्नेह होता, आणि त्याचें

मांजरांचें प्रेम मी प्रत्यक्ष पाहिलें होतें. बोका आपल्याशीं बोलला असें कांहीं तरी सांगून बुवाबाजी करणारे ते गृहस्थ नव्हते, हेंही मला माहीत आहे. अतिशय फटकळ आणि अतिशय सरळ स्वभावाचे ते होते. यावरून बोका बोललाच असेल याबद्दल माझी खात्री आहे, असें मी मुळींच म्हणत नाहीं. मला असें वाटतें, कीं त्या मांजरावर त्यांचें अतिशय प्रेम होतें. त्यामुळें 'नको' 'होय' म्हणणाऱ्या लहान अर्भकासारखाच त्यांना तो वाटत होता. काठी उगारल्याबरोबर त्या बोक्यानें दीनवाणा चेहरा करून कांहीं तरी ओकारान्त आवाज काढला असेल, आणि त्याचक्षणीं या प्रेमळ गृहस्थाचें मनही 'नको' म्हणत असेल. तो मनांतल्या विचाराचा आवाज बोक्याच्या तोंडांतून निघाला असें त्यांना प्रामाणिकपणें वाटलें असल्यास नवल नाहीं.

घरांत पाळलेले पशु किंवा पक्षी कांहीं दिवसांनीं घरांतल्या माणसांसारखेच होतात. तीं माणसें नाहींत हें आपण जवळ जवळ विसरूनच जातों. फार काय, माणसांपेक्षांही ते आपल्याला अधिक जवळचे वाटतात; कारण माणसांतली माणुसकी त्यांच्यांत भरपूर असते आणि माणसांचे हेवेदावे, दुष्टावे, आप्पलपोटेपणा मात्र त्यांच्यांत मुळींच नसतो! एका लोकप्रिय आंग्ल लेखिकेची एक गोष्ट मला आठवते. तिला खूप पैसा मिळाला होता, प्रसिद्धीही खूप मिळाली होती. पण तिनें लग्न केलें नव्हतें. कुणीं तरी तिला विचारलें, 'का हो, तुम्ही लग्न कां करीत नाहीं?'

तेव्हां ती म्हणाली, 'लग्न कशाला करायचं? माझ्याकडे एक पोपट आहे आणि एक मांजर आहे. मांजर बाहेर गेलं कीं भरपूर उशिरां घरीं परत येतं आणि पोपट दिवसभर कानाशीं कटकट करीत असतो. झालं तर! नवरा हवा कशाला?'

गंमत म्हणून पोपटाबद्दल किंवा मांजराबद्दल तिनें असे हेटाळणीचे उद्गार काढले हें ठीक आहे. पण मी मात्र त्यांच्याबद्दल असे अवमानाचे उद्गार कधींच काढणार नाहीं; पोपटाबद्दल तर नाहींच नाहीं. पोपट म्हटलें कीं निर्मळ आठवणींनीं आणि कृतज्ञतेनें माझें अंतःकरण भरून येतें. मी अगदीं लहान असतांना एक पोपटच माझा सदा आनंदी आणि कधींही तक्रार न करणारा असा खेळगडी होता. आम्हां दोघांमध्यें वडीलकीचा मान त्याचा होता; आणि

पुष्कळ वेळां तो आपली वडीलकी माझ्यावर गाजवीत असे. माझ्या जन्माच्या आधीं दोन वर्षें तो पोपट माझ्या वडिलांनीं घरांत आणला होता. संध्याकाळीं कामावरून परत येत असतां कोठें तरी झाडाखालीं पडलेलें, केवळ मांसाचा लहानसा गोळा असलेलें पोपटाचें इवलेंसें पिल्लूं त्यांना सांपडलें. त्यांनीं तें उचलून घरीं आणलें. माझ्या आईनें त्या पिल्लाची अतिशय काळजी घेऊन त्याला वाढविलें. त्या पिल्लाला कांहीं खातां येत नव्हतें. दुधांत कापूस बुडवून पिल्लाच्या चोंचींत दिवसांतून पांच-सहा वेळां आपण कांहीं थेंब पिळीत असूं असें आई सांगते. पुढें तें पिल्लूं चांगलें गुबगुबीत होऊन इकडून तिकडे उड्या मारूं लागलें. कुणीं तरी आईला सांगितलें, अक्कलकाढ्याची मुळी उगाळून जर कांहीं दिवस रोज या पिल्लाच्या जिभेवर बोटानें घासली तर त्याची जीभ पातळ होईल, आणि हा पोपट फक्कड बोलूं लागेल. आईनें कित्येक दिवस तसें केलें. माझ्या जन्मानंतर दोन वर्षांनीं माझे वडील वारले. हा पोपट आणि मी आईच्या बरोबर माझ्या मामांच्या घरीं राहायला गेलों. तिथेंच आम्ही दोघे लहानाचे मोठे झालों. मी पंधरा-सोळा वर्षांचा होईपर्यंत हा पोपट जिवंत होता.

इतरांच्या तोंडांतले शब्द कुणी निर्बुद्धपणें पुन्हा पुन्हा उच्चारूं लागला, म्हणजे लोक त्याला ' पोपटपंची करूं नको, ' असें म्हणतात. दुसऱ्यांच्या शब्दांचा निर्बुद्ध पुनरुच्चार पोपट करतात असें लोकांना वाटतें. मला हें बिलकुल मान्य नाहीं. माझ्या मित्राच्या सोळा वर्षांच्या माझ्या अनुभवावरून मी सांगतों कीं हें मुळींच खरें नाहीं. त्याच्या दोन-तीनच गोष्टी इथें सांगतों; आणि मग लोकांनीं काय म्हणायचें असेल तें म्हणावें. गिरगांवांतल्या एका चाळींत माझे मामा राहात असत. तळमजल्यावर आमची खोली होती, आणि खोलीच्या दारासमोर बाहेरच्या गॅलरींत पोपटाचा पिंजरा टांगलेला असे. रात्रीं त्याचा पिंजरा आम्ही आंत आणून ठेवीत असूं. एका खोलींत आडवीं-उभीं अंथरुणें घालून मामा, आजी वगैरे आम्ही तीन चार-माणसें गर्दी करून झोंपलेलीं असूं. त्याच गर्दींत कोपऱ्यांतल्या एका खुर्चीवर त्याचा पिंजरा ठेवलेला असे. दिवे मालवून बिछान्यावर पडल्या पडल्या आम्ही कांहीं गोष्टी बोलायला सुरुवात केली कीं आपणही त्या गोष्टींत भाग घेतों आहोंत असें दाखवण्याकरितां कीं काय, पोपट मधूनमधून ' हूं हूं ' करीत असे ! केव्हां केव्हां आजी

चिडून त्याच्यावर ओरडायची, ' काय मेला फाजील तरी ! गप्प बस बघूं ! ' थोडा वेळ तो गप्प राहायचा. कांहीं तरी गमतीची गोष्ट चालली असतां आम्ही हंसूं लागलों कीं अगदीं माणसासारखा ' खू खू खू खू ' आवाज करून तो आमच्या हंसण्यांत सामील व्हायचा !

माझ्यावर तो वडीलकी कसा गाजवायचा तें पाहा ! आमच्या चाळीच्या बाहेरच्या बाजूला एक चहाचें दुकान होतें. आमच्या शेजारच्या एका खोलींत दुकानाचे नोकर चाकर उठत बसत. एकींत साखर, पीठ वगैरेचें कोठार होतें आणि जिन्याजवळच्या खोलींत भटारखाना होता. गॅलरींत त्यामुळें सारखी वर्दळ असे. मी चार-पांच वर्षांचा असतांना घरांतल्या आणि गॅलरींतल्या लोकांचा डोळा चुकवून गाडी-घोडे बघायला एकदम रस्त्यावर धूम टोकायचा. मग घरांतलें कुणीतरी माझ्यामागें धांवायचें, आणि बकोटीला धरून फरपटत घरीं ओढीत आणायचें. गॅलरींतच आजी किंवा मामा माझ्या पाठीवर रपाटे देत असतां पोपट शांतपणें मान वांकडी करून एका डोळ्यानें हें सर्व पाहात राहायचा. हा रस्त्यावर पळतो हें कांहीं बरोबर नाहीं हें त्यानें चांगलेंच ओळखलें होतें. गॅलरींत कुणी नाहीं, घरांतलीं माणसें दुपारीं स्वस्थ झोंपलीं आहेत असें पाहून एखादे दिवशीं मी जर रस्त्याकडे धांवलों तर पंखांचा फडफडाट करून आणि जीव जातो कीं राहतो अशा तऱ्हेनें केंकाटून तो घरच काय पण सारी चाळ जागी करायचा ! मग कुणीतरी मला धरून आणीत आणि दुपारची झोंप मोडल्यामुळें अधिकच चिडून अधिकच धपाटे देत. मारझोड संपून सर्व कांहीं स्थिरस्थावर झालें कीं मुसमुसत, डोळे पुशीत, माझ्यावर वडीलकी गाजवणाऱ्या त्या पोपटाच्या पिंजऱ्याकडे मी जात असें, आणि पिंजऱ्यांतून बाहेर आलेलें त्याचे शेपूट दांत-ओंठ खात जोरजोरानें ओढीत असे. दुःखानें तो ओरडायचा, पण माझ्या बोटाचा त्यानें कधींच चावा घेतला नाहीं. त्याला चावतां येत नव्हतें असें मुळींच नाहीं. गॅलरींतून जाणाऱ्या-येणाऱ्यानें कुणीं शेपूट ओढून त्याला त्रास दिला तर तो चांगला कडकडून चावत असे. पण हा लहान मुलगा आहे, आपला मित्र आहे, आणि विशेष म्हणजे आपल्यामुळें त्याला मार मिळाला आहे; तेव्हां आपण त्याला चावतां कामा नये एवढें त्याला समजत होतें.

माझा हा हिरवा मित्र जितका समजूतदार तितकाच मिस्किलही होता. चहा-वाल्यांच्या भटारखान्यांत दादाभट नांवाचा एक धिप्पाड आचारी होता. उंच, गोरापान, घाऱ्या डोळ्यांचा कोंकणस्थ ब्राह्मण होता तो. रोज दुपारीं शंकरपाळ्यांचें पीठ साखर घालून तो तिंबून ठेवीत असे पोपटाला तें गोड पीठ फार आवडायचें. दादाभटाला चिडवण्याकरितां चाळींतले लोक पुष्कळ वेळां त्याला ' जाडा भट ! ' म्हणून हांक मारीत. दादा भटाचे दोन नियम होते. दुपारीं पीठ तिंबून झालें, कीं त्याचा एक लहानसा गोळा आमच्या पोपटाच्या चोंचींत आणून द्यायचा. रात्रीं सर्व काम संपलें कीं चाळीच्या जिन्याखालीं काळोखांत बसून डोळे तांबडे लाल होईपर्यंत गांजा ओढायचा ! पैकीं पहिल्या नियमाशीं सध्यां आपल्याला कर्तव्य आहे. पिठाचा गोळा घेऊन दादा भट येतो आहे हें पाहिल्याबरोबर दांडीवरून पिंजऱ्याच्या तळपत्र्यावर उडी मारून मोठ्या ऐटींत मान हालवीत तुरु तुरु इकडे तिकडे फिरत पोपट दादा भटाचें स्वागत करायचा. गोळा चोंचींत देऊन दादा भटाची पाठ फिरली रे फिरली, कीं दांडीवर उडी मारून गोळा एका पायांत धरायचा आणि मान वर करून दादाभटाला ' ए जाडा भट ! ' ' ए जाडा भट ! ' म्हणून तो हांक मारायचा !

दादाभट मागें वळून ' फोकलीच्या ! पुन्हा तुला कध्धीं पीठ देणार नाहीं ! ' अशी शिवी हांसडून निघून जायचा. पण दुसऱ्या दिवशीं नियमाप्रमाणें दादा भट यायचाच.

कार्तिकी एकादशीच्या दिवशीं आमच्या पोपटानें इहलोक सोडला. आजी म्हणाली, ' अरे, तो कुणी तरी पुण्यशील साधुपुरुष अठरा वर्षे आपल्या घरांत राहून गेला ! '

कार्तिकी एकादशीला त्यानें देह ठेवला एवढेंच आजीच्या त्या उद्‌गारांचें कारण नव्हतें. त्या अठरा वर्षांत म्हणजे उभ्या आयुष्यांत त्यानें कधींही शिजवलेल्या अन्नाला स्पर्श केला नाहीं. पुष्कळांच्या घरांत पोपटाला भात कालवून घातलेला मीं पाहिला आहे. कांहीं पोपट भाकरी किंवा भात इतर फळांबरोबर खातातही. आमच्या पोपटाला भात किंवा भाकरी देण्याचा जेव्हां जेव्हां आम्हीं प्रयत्न केला तेव्हां तेव्हां दांडीवरून खालीं उतरून पायांनीं त्यानें तो इकडे तिकडे उडवून दिला. पेरू, शेंगा, मिरच्या वगैरे फळेंच तो खात असे. त्याच

मरणही एखाद्या साधुपुरुषानें शांतपणें समाधि घ्यावी तसेंच होतें. नेहमींप्रमाणें तो चांगला दिसत होता. त्याला कांहीं झालें नव्हतें. एके दिवशीं पिंजऱ्यांत घातलेल्या फळांना तो स्पर्शही करीना. इकडे तिकडे पाहायचा, आमच्याकडे टक-टका पाहायचा, पण खाण्याला चोंच लावीना. 'असं काय करतो हा!' आजी म्हणत होती. दुसऱ्या दिवशीं कार्तिकी एकादशी होती. पहाटेच्या वेळीं मान टाकून तो पिंजऱ्याच्या तळाशीं पडलेला दिसला.

लहानपणचे अनेक लागेबांधे आणि नातींगोतीं मी विसरून गेलों आहें. पण माझ्या या हिरव्या मित्राला मी कधीं तरी विसरेन का!

● ● ●

२९५०४
आ.वा.
२५६४
४-४-९७

# २

## दुरून आकाश साजरे...!

पहिल्यांदाच मी विमानांत बसलों तेव्हांचा एक अनुभव मला सारखा आठवतो. केव्हां एकदां खालीं येतों असं मला झालं होतं. गाद्या-गिरद्यांनीं मढवलेलं, नेहमींचं आरामशीर विमान नव्हतं तें. शिकविणारा आणि शिकणारा कसे तरी आंत बसूं शकतील असं एक विमानशाळेतलं तें चिमुकलं विमान होतं. कमरेला पट्टा बांधला होता तेवढाच काय तो आधार होता. कमरेवरचं सर्व शरीर विमानाबाहेरच होतं, विमान जरा कुठं एका बाजूला लवंडलं कीं खालीं समुद्र किंवा घरांचीं छपरं दिसायचीं नि वर अफाट निळं आकाश दिसायचं. अर्धा-पाऊण तासच माझ्या वैमानिक मित्रानं मला आकाशांत फिरवलं, पण त्या अर्ध्या तासांत मी किती तरी नव्या गोष्टी शिकलों. ‘जीव मुठींत धरणं’ हा शब्दप्रयोग चुकीचा आहे; ‘श्वास कोंडून जीव तोंडांत घट्ट धरणें’ असा शब्दप्रयोग पाहिजे असं मला त्या वेळीं वाटत होतं. भाषेंत नवी भर पडलीच पण अनुभवांतही खूपच नवी भर पडली. भीतीनं ब्रह्मांड नाहीं आठवलं मला; भीतीनं पृथ्वी मला आठवली! भीतीनं माती आठवली म्हणाना. कुणीं पाह्यलंय ब्रह्मांड! माती आपली खरी. कोणतीही जवळची गोष्ट खूप दूर गेली म्हणजे तिची महती कळते म्हणतात. सदान्कदा पृथ्वीवर आयुष्य काढणाऱ्या आम्हां माणसांना अतिपरिचयामुळें ती मातीमोल

वाटते; पण तिच्यापासून वर, दूर अंतराळांत गेलं म्हणजे ती माती आपणाला किती प्राणाहून प्रिय आहे याचा अनुभव येतो. कल्पनेनं उंच उंच आकाशाच्याही पलीकडे भराऱ्या मारणं ठीक आहे; पण पाय पृथ्वीवर रोवलेले असले म्हणजे तें सगळं चांगलं जमतं. पायासह एकदां वर भरारी मारून पाहा म्हणजे नको तें वरचं भव्य नि दिव्य आकाश; आपली पायांखालची खडबडीत, दणकट मातीच बरी असं वाटेल! विमान खालीं आलं नि मीं पृथ्वीवर पाय टेकले तेव्हां हरवलेल्या अर्भकाला त्याची आई दिसली नि तिच्या कुशींत त्यानं डोकं खुपसलं कीं त्याला जसं वाटतं तसं अक्षरश: मला वाटलं.

माझ्या एका शास्त्रप्रेमी मित्राला माझा हा अनुभव मीं सांगितला तेव्हां निर्विकार चेहरा करून तो म्हणाला, 'गुरुत्वाकर्षण आहे तें, दुसरं काय!'

मी म्हटलं, 'जड शरीरापुरतं तुझं गुरुत्वाकर्षण ठीक आहे; पण माझ्या मनाला मातीची विलक्षण ओढ आहे त्याचं काय?'

'त्याचा तूंच काय तो विचार कर!' असं म्हणून, तो आपल्या प्रयोगशाळेंत निघून गेला.

त्यानं सांगितलं म्हणून नव्हे तर खरोखरच मला आवडतं म्हणून मातीचं मला जें विलक्षण आकर्षण आहे त्याचा मी नेहमीं विचार करतों. माझं मलाच आश्चर्य वाटतं. मुंबईसारख्या यंत्रजीवी कृत्रिम शहरांत माझा जन्म झालेला, आणि सारा जन्म गेलेला. रसरशीत तांबडी किंवा कुळकळीत काळी माती कधीं दृष्टीलाहि पडायची नाहीं. दृष्टीला रोज पडायचीं दगडी गटारं नी डांबरी रस्ते. म्हणूनच कदाचित् आधींच माझ्या रक्तांत असलेली जिवंत मातीची ओढ अधिक तीव्र झाली असावी. काळ्या किंवा तांबड्या मातींतून तरारून बाहेर येणारे हिरवे कोंब पाहण्यांत एक प्रकारचा अलौकिक आनंद असतो,—मुलांना तर मातींत पुरलेली बी दोन पानांचं चिमणं झाड होऊन बाहेर येते तेव्हां स्वर्ग हातीं आल्यासारख्या आनंदाच्या उकळ्या फुटतात. गिरगांवांतल्या एका गजबजलेल्या चाळींत माझं सर्व लहानपण गेल्यामुळं हा आनंद मला कधींच उपभोगतां आला नाहीं. मातीच्या जिवंत स्पर्शाची ही ओढ आंतल्या-आंत दडपली गेल्यामुळं माझ्यासारखीं शहरी माणसं मनांतल्या मनांत कशीं धुमसत असतात याचं एक मजेदार उदाहरण मला आठवतं.

मी मुंबईत वाढलेला, पण माझी आजी कोंकणांतल्या शेतांत राबलेली, — स्वतःच्या हातांनीं पेरणी, कापणी केलेली स्त्री होती. पेरलेल्या एका दाण्याचे हजार दाणे होऊन वर आलेले भाताचे लोंबर तिनं हातांत खेळवले होते. परसांतल्या हिरव्या, तांबड्या, निळ्या, जांभळ्या भाज्यांचे, फुलांचे, फळांचे रंग पाहून तिचे डोळे निवलेले होते. या शेतभाताच्या गोष्टी ती मला सांगे तेव्हां तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकत. तिला मुंबईसारख्या शहरांत वृद्धपणीं हा ‘ जिवंत ’ मातीचा विरह किती जाणवत असेल याची कल्पनाच केलेली बरी. तिचा हा राग एकदां कसा व्यक्त झाला तेंच मजेदार उदाहरण मी सांगणार आहें. आमच्या चाळीचे जिने झाडणारा आणि संडास साफ करणारा एक म्हातारा रामा गडी होता. तो एकदां आमच्या दारावरून जात असतां त्याला कांहीं काम सांगायचं होतं म्हणून आजी मला म्हणाली, ‘ अरे, त्या झाडूवाल्या रामाला जरा हांक मार. ’ ते शब्द रामाच्या कानांवर पडले. आजी सहज त्याला झाडूवाला म्हणाली होती. तिच्या मनांत त्याचा अपमान करण्याचा चुकूनसुद्धां हेतु नव्हता. पण रामाला त्या शब्दाचा साहजिकच राग आला. तो पुढं येऊन म्हणाला, ‘ हें काय हो आजीबाई, मला तुम्ही झाडूवाला काय म्हणतां ? ’

‘ मग काय रे बाबा तुला म्हणायचं ? ’ आजीनं विचारलं.

‘ मला माळी म्हणा ’.

‘ अस्सं ? ’ आजीचा अस्सल कोंकणी खवचटपणा विजेसारखा तिच्या जिभेतून तत्क्षणीं उसळला, ‘ संडासांतल्या फुलबागा शिंपतोस म्हणून तुला माळी म्हणायचं कीं काय ? ’

बिचारा रामा या तडाख्यानं सर्दच झाला. रामावर आजी उगाच रागावली पण तिचा राग समजण्यासारखा आहे. फुलाफळांची जतन करणारासाठीं जो शब्द वापरावयाचा तो चाळीचे संडास झाडणाराला लावण्याची कल्पनाच तिला असह्य झाली. गंधवती धरतीमातेपासून वर्षानुवर्षं दुरावल्यामुळं तिच्या मनांत धुमसत असलेला राग अशा रीतीनं बाहेर आला !

मी मात्र लहानपणापासून झालेली माझी ही उपासमार आतां अधाशासारखी भरून काढण्याचा प्रयत्न करतों आहें. गिरगांव सोडून अलीकडे मी दादरला राहा-

यला आलों तेव्हां घराच्या आसपास उघडी जमीन मला दिसली. तात्नडतोब बाजारांत जाऊन मीं दोन-अडीच रुपयांचं भाजीपाल्याचं बी विकत आणलं, आणि मोठ्या उत्साहानं घरामागल्या जमिनींत पेरलं. मुलांच्या बरोबर मीही त्याला मधूनमधून पाणी घालीत होतों. बरंचसं बी रुजलंच नाहीं. टोमॅटोचीं रोपं वर आलीं, मोठीं झालीं, पण त्यांना फळंच आलीं नाहींत. चवळीची वेल मात्र रोज सकाळीं उठून पाहावं तों एक एक गिरकी घेऊन वर गेलेली दिसे. तिला तशी वाढतांना पाहून मुलं आनंदानं उड्या मारीत. मलाही उड्या मारा-व्याशा वाटत, पण वयाची आठवण होऊन मी मनांतल्या मनांत मनांत उड्या मारीत असे! मात्र माझाही आनंद मुलांइतकाच अवखळ होता. शेवटीं चवळीच्या वेलीला तीन-चार शेंगाही आल्या. तेव्हां आमचा आनंद गगनांत मावेना. शेवटीं ती वेल वाळून गेली.

माझ्या बऱ्याच मित्रांना माझा हा प्रयोग कळला होता. 'काय, एकंदर किती भाजी मिळाली ?' म्हणून त्यांनीं विचारलं तेव्हां चवळीच्या चार शेंगा आल्याचं वृत्त त्यांना मीं उत्साहानं सांगितलं. अडीच रुपयांचं बी पेरून दोन पैशांचीही भाजी मिळाली नाहीं हें ऐकून त्यांना हंसू आवरेना, पण माझी मुळींच निराशा झालेली नव्हती. बी पेरल्यानंतर कोंब फुटतो, नि हिरवीगार वेल डोळ्यांसमोर गरगरा वाढत जाते हें पाहतांना होणारा आनंद अलौकिक आहे. त्याच्यापुढं अडीच रुपये कांहींच नव्हेत.

वृक्ष, वेली, फळं, फुलंच कशाला—सर्वच प्राणीजात, आपण माणसंहि—धरतीचींच लेकरं नाहीं का ? 'माती असशी मातींत मिळशी', हें किती तरी अर्थांनीं खरं आहे. देह नाशवंत आहे एवढाच याचा अर्थ आहे असं मला नाहीं वाटत. जिवंत देहालासुद्धां मातीची विलक्षण ओढ असते. वृक्ष-वेलीं-प्रमाणें आम्हां माणसांची पाळंमुळंही मातींतच आहेत. जमिनीवर आपणाला जितकं सुरक्षित वाटतं तितकं पाण्यांत किंवा हवेंत कधींही सुरक्षित वाटत नाहीं. लहान बालकाला मातेच्या अंगावर जितकं सुरक्षित वाटतं नि जितकं सुख होतं तितकंच जरठ वृद्धालाही धरतीच्या मांडीवर होतं. एक आई, वयाचीं कांहीं थोडीं वर्षे पोषण करते तर ही दुसरी आई वयाच्या अंतापर्यंत पोषीत असते. एक माता. दुसरी माती—म्हणजेच मोठी माता!

● ● ●

# ३

## ‘ सोवळा ’

*

‘ सोवळा ’ हा शब्द ऐकल्याबरोबर आज ज्या भावना माझ्या मनांत निर्माण होतात, त्याच्या अगदीं उलट भावना मी लहान असतांना माझ्या मनांत उत्पन्न होत असत. घरांतलीं म्हातारीं माणसं ज्या ज्या दिवशीं विशेष सोवळं पाळीत, त्या त्या दिवशीं घरांत मोठं पवित्र वातावरण असे — त्या दिवसाचं खाणंपिणं मोठं सात्त्विक असे आणि पाहावं तिथं स्वच्छता दिसे. त्या वयांत सोवळं या शब्दाशीं,– स्वच्छता, सात्त्विकता, पावित्र्य या कल्पनांचा संबंध माझ्या मनांत जडला होता. तो तसाच राहिला असता; पण कांहीं दिवसांनीं एक चमत्कारिक कुटुंब आमच्या शेजारीं राहायला आलं. मी चमत्कारिक मुद्दाम म्हणतों. त्यापूर्वीही मी राहात होतों त्या चाळींत आमच्या आसपास उच्चवर्णीय कुटुंबें होतीं. त्यांच्याशीं आम्हां सर्वांचे चांगलेच संबंध होते. हें नवें कुटुंब मूलबाळ नसलेल्या वयस्क नवरा-बायकोचं होतं. नवरा मोठा सुस्वभावी व सर्वांशीं मिळूनमिसळून वागणारा होता. बायको मात्र भारीच चमत्कारिक होती; आणि तिच्या सोवळ्याओवळ्याच्या कल्पना तर भयंकरच होत्या. आमच्यासारख्या मुलांचा पाय नळाजवळच्या जागेंत जिथं पडला असेल तिथं तिथं पाणी टाकीत ती आपलं पाऊल टाकायची ! ही एक गोष्ट झाली. अशा अनेक गोष्टी ती करायची. पहिल्या-पहिल्यांदा आम्हांला फार वाईट वाटायचं.

पण मग आम्हीच तिला छळायला लागलों. त्या सर्व गोष्टी इथं सांगत नाहीं. पण तो शेजार आल्यापासून ‘ सोवळं ओवळं ’ वगैरे शब्द ऐकल्याबरोबर माझ्या डोक्यांत तिडीक उठूं लागली.

सोवळा म्हणजे दुसऱ्याला तुच्छ मानणारा,— आपण कुणीतरी श्रेष्ठ आहों असं समजणारा,— कुणीतरी अहंमन्य अशी माझी कल्पना झाली. त्या कुडं-बाच्या घरांत कितीतरी घाण असे. त्या बाईचे कपडेलत्तेही अस्वच्छ असत. त्यामुळें तर सोवळं म्हणजे ढोंगीपणा अशीही माझी कल्पना झाली. नाटकांतलं ‘ जरि वरुनि धुवट सोवळा । अंतरीं नाना कळा ! ’ हें पद ऐकून तर माझ्या बाल-मनांतल्या सोवळ्यासंबंधींच्या कल्पना अधिकच दृढ झाल्या.

सोवळ्याची कल्पना स्वच्छ राहण्याच्या प्रवृत्तींतून निघाली यांत शंका नाहीं. पण प्रत्येक चांगल्या गोष्टीची व्यवहारांत पुढं पुढं विकृति होत असलेली दिसते. तसंच सोवळ्याचं झालेलं दिसतं. अस्वच्छ काम करणाऱ्याचा स्पर्श झाला तर आंघोळ करावीशी वाटणं साहजिकच आहे. त्या माणसाला, काम करीत असतां शक्य तों स्पर्श करूं नये हेंही ठीक. पण काम केल्यानंतर तो स्वच्छ झाला तरीही त्याचा स्पर्श होऊं द्यायचा नाहीं; फार काय, अस्वच्छ काम करणाऱ्याच्या पोटीं जन्माला आला एवढ्या कारणानेंही एखाद्या स्वच्छ माणसाला अस्पृश्य ठरवायचा ही सोवळ्याच्या विकृतीची परमावधि होय. या विकृतीनेंच हिंदु समाजाला एक केवढा तरी मोठा कलंक लावून ठेवला आहे.

हें आचारांतलं सोवळं अलीकडे पुष्कळ कमी झालंय, पण विचार आणि उच्चाराचं सोवळं अजूनहि पुष्कळच आहे. हें सोवळं अर्थात् हिंदु समाजापुरतं मर्यादित नाहीं. हें सर्व मानव समाजांत पसरलेलं आहे. सुधारणेच्या कळसाला आपण पोहोंचलों आहोंत, असं समजणाऱ्या युरोपीय समाजांतही हें कमी आहे, असं नाहीं. व्हिक्टोरिया राणीच्या अमदानींत तर या सोवळ्या वृत्तीला,— या ‘ इश्श बाई ’ दृष्टिकोनाला अगदीं ऊत आला होता. एखाद्या तरुणानं एखाद्या तरुणीपाशीं विवाहाची मागणी केली तर ‘ होय ’ म्हणण्याऐवजीं तिनं बेशुद्ध पडायचं असा शिरस्ता होता ! उघड उघड ‘ होय ’ म्हणणं म्हणजे स्त्री-जातीला न शोभण्यासारखा असभ्यपणा ! लैंगिक बाबींचा सरळ सरळ उल्लेख वाङ्मयांत करणं हें तर इंग्लंड-अमेरिकेंत काल परवांपर्यंत ‘ अब्रह्मण्यम् ’ होतं,

—आजही तितक्या प्रमाणांत नसलं तरी, नाहीं असं नाहीं. यामुळें समाज ढोंगबाजीनं आणि विकृतीनं पोखरून जातो. यायचे ते विचार माणसांच्या मनांत येतच असतात. नैसर्गिक प्रवृत्ति उफाळावयाच्या त्या उफाळतच असतात. त्यांना वाव न मिळाल्यामुळें मनं मात्र विकृत होत असतात, किंवा वाटतं तें चोरून करायचं, आव मात्र सोवळेपणाचा आणायचा, असली ढोंगबाजी माजते. या सोवळेपणाशीं जन्मभर ज्यानें झुंज दिली अशा एका इंग्लंडच्या श्रेष्ठ कादंबरीकारानं या प्रकाराचं एका वाक्यांत फार परिणामकारक वर्णन केलंय्. या प्रकाराला तो ‘ Wearing figleaf on the mouth ’ म्हणतो. ईव्हनं लज्जारक्षणासाठीं फक्त एक अंजिराचं पान वापरलं होतं. हे सोवळे लोक तोंडावर अंजिराचीं पानें धरतात; म्हणजे बोलत नाहींत, पण अब्रू मात्र उघडी पडलेली असते !

मनोविश्लेषणशास्त्रानं या सोवळेपणाची चांगली मीमांसा केली आहे. एखादी बाई पुरुषांना वेळीं अवेळीं शिव्या देत असते, ‘ अमका माझ्याकडे पाहतो, तमका माझ्याशीं बोलण्याचा प्रयत्न करतो, सगळेच मेले पुरुष वाईट ’ वगैरे वगैरे ! आधुनिक मनोविश्लेषण सांगते कीं सर्वसामान्य स्त्रियांच्या मानानं या बाईला पुरुषांचं आकर्षण अधिक वाटतं, पुरुषांचा सहवास हवा असून मिळत नाहीं, म्हणून शिव्यांच्या भडिमारांत ही बाई आपल्या मनाचा आक्रोश बुडवूं पाहते आहे !

मनोविश्लेषणशास्त्राचा ज्याला जनक म्हणतां येईल त्या फ्रॉइडनं मानवी मनाचं वर्णन, ‘ एकाच घराच्या दोन मजल्यावर राहणाऱ्या दोन कुटुंबांसारखं तें आहे ’ असं केलं आहे. वरच्या मजल्यावर प्रकट मनाचं कुटुंब राहतं. हें मोठं पापभीरू, व्यवस्थित, घरंदाज कुटुंब आहे. आपल्या अब्रूची याला फार चाड आहे. खालच्या मजल्यावर अप्रकट मनाचं कुटुंब आहे. या कुटुंबात माणसांची गर्दी आहेच; पण यांतलीं बहुतेक माणसं मवाली किंवा दांडगेश्वर आहेत ! यांपैकीं कांहीं पूर्वी वरच्या मजल्यावरच्या कुटुंबांत होते, पण सभ्य कुटुंबांत राहायला नालायक म्हणून त्यांना खालच्या मजल्यावर हांकलण्यांत आलें. खालच्या मजल्यावरच्या लोकांचा रात्रं-दिवस चाललेला धांगडधिंगा पाहून वरच्या मजल्यावरचे लोक क्षणोक्षणीं अस्वस्थ होत असतात.

या वर्णनांतले खालच्या मजल्यावरचे लोक म्हणजे माणसाच्या मनावर पाशवी

प्रवृत्ति. वरच्या मजल्यावरचे लोक म्हणजे सुव्यवस्था. प्रतिष्ठा, संभावितपणा, धर्म, नीति वगैरे समाजधारणेकरितां केलेल्या नियमांप्रमाणें वागण्याच्या इच्छा. या इच्छा उपरोक्त प्रवृत्तींशीं आपला संबंध नाहीं असं दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात. पुष्कळ वेळां या प्रवृत्तींचें उदात्तीकरण होऊन त्या वरच्या मजल्यावर राहायला येतात. पुष्कळ वेळां तसं होत नाहीं. या प्रबल प्रवृत्ती दडपण्याच्या प्रयत्नांतून सोवळेपणाची प्रवृत्ति निर्माण होते. या असल्या सोवळ्याचीं उदाहरणं आतांच सांगितलीं. पुरुषांना वेळीं अवेळीं शिव्या मोजणाऱ्या बाया किंवा अमकं अश्लील आहे तमक्यानं पावित्र्य-विडंबन झालं म्हणून धोशा लावणारे पुरुष हे असलेच सोवळे होत.

विचारांची किंवा आचारांची स्वच्छता किंवा सात्त्विकता पाहिजेच. असले सोवळे समाजांत निर्माण होतील तेवढे हवेच आहेत. पण स्वच्छतेचं किंवा सात्त्विकतेचं स्तोम माजवून अस्पृश्यतेची भयंकर प्रथा समाजांत चालू करणारे किंवा पावित्र्याचं नांव घेऊन नव्या विचारांचा गळा दाबू पाहणारे हे समाजाचे शत्रु आहेत. हे सोवळे तर नाहींतच, पण जर कुणाला समाजानं ओवळे ठरवायचे असतील तर तें यांनाच ठरविले पाहिजेत.

कला, वाङ्मय, संस्कृति या क्षेत्रांत हा सोवळेपणा केवळ जाचकच नव्हे तर मारक होण्याचा संभव आहे. नव्या नव्या प्रयोगांनींच कलेची किंवा वाङ्मयाची प्रगति होत असते. सर्वसामान्य माणसाची प्रवृत्ति जुन्याला चिकटून राहण्याची नी नव्याचा धोका कोण पत्करतो अशा प्रकारची असते. याचा फायदा घेऊन केवळ जुनेपणामुळं पवित्र वाटणारं टिकवण्याचा, आणि नवेपणामुळं भीतिदायक वाटणारं पुढं येऊं न देण्याचा सोवळे लोक प्रयत्न करीत असतात. या प्रयत्नांचं खरं स्वरूप लोकांच्या नजरेला आणून देणं हें विचारवंतांचं कार्य आहे. विशेषतः ग्रन्थ किंवा चित्र अश्लील ठरवून दडपून टाकण्याचे जे कायदे आहेत त्यांच्यासंबंधीं जनतेनं फार जागरूक राहायला पाहिजे. समाजव्यवस्थेकरितां कायदे अवश्य पाहिजेत; पण कांहीं कायद्यांचा उपयोगापेक्षां दुरुपयोगच जास्त होण्याचा संभव असतो. कायदे करणारे आणि कायद्याची अंमलबजावणी करणारे हे सर्वसामान्य माणसांचेच प्रतिनिधि असतात. सर्वसामान्य माणसांना कोणत्याही नवीन गोष्टीची भीति कां वाटते हें आताच सांगितलं. तेव्हां समाजविघातक असें कांहीं

दडपून टाकण्याच्या भरांत संस्कृतींत मोलाची भर घालणारं असं कांहीं नवीनहि दडपलं जाण्याचा संभव असतो. नव्व्याण्णव खरोखरच घाणेरडे ग्रंथ दडपतां दडपतां कालिदासाचा किंवा शेक्स्पीअरचाही एखादा ग्रंथहि अश्लील म्हणून दडपला जायचा. अशा वेळीं एक निरपराधी फांशी जाण्यापेक्षां शंभर अपराधी सुटले तरी चालतील हें कायदेशास्त्रांतलं तत्त्वच फार बरं वाटूं लागतं आणि म्हणावंसं वाटतं कीं पुरें झालं हें सोवळं !

● ● ●

## ४

## आकाशांतले तारे आणि मी

तो क्षण अजूनही मला केव्हां केव्हां आठवतो, आणि भीतीची एक बारीकशी लहर अंतःकरणाला चाटून जाते. त्या वेळीं वाटलेली ती भीति अजबच होती. त्या भीतीला तोडच नव्हती. त्या भीतीसारखी भीति तीच. इतकीं वर्षें लोटलीं तरी अजूनही त्या क्षणाच्या आठवणीनं बारीकसा कां होईना पण अंतःकरणाचा थरकांप व्हावा, यावरून ती भीति किती विलक्षण होती हें दिसून येतं. तेरा-चौदा वर्षांपूर्वीचा तो अनुभव आहे. विलायतेहून मी परत येत होतों. भूमध्य समुद्राच्या शांत पाण्यावरून बोट संथपणें चालली होती. रात्रीची नऊ-दहाची वेळ असेल. जेवणं करून उतारू मोठ्या डेकवर हंसत-खिदळत, गप्पा-गोष्टी करीत बसले होते. माझ्या सहज मनांत आलं कीं अगदीं वरच्या छोट्या डेकवर जावं, आणि आकाशाची गंमत पाहावी. हें छोटं डेक अगदीं वर असतं, आणि क्वचितच एखादा खलाशी कांहीं कामाकरितां तिथं जातो. मी वर गेलों तेव्हां तिथं कुणीच नव्हतं. मी पाठीवर उताणा पडलों, आणि वर आकाशांकडे पाहूं लागलों. स्वच्छ,निळं आकाश चमचमणाऱ्या अक्षरशः असंख्य तारकांनीं आणि तारकापुंजांनीं भरून गेलं होतं. माझे दोन डोळे, तें अफाट निळं आकाश आणि ते चमचमणारे अगणित तारे, यांखेरीज जगांत दुसरं कांहींच नाहीं, असा क्षणभर मला भास झाला

आणि मी आनंदानें वेडावून गेलों. पण आणखी एक-दोन क्षण टक लावून पाहतों न पाहतों तोंच तो ताराखचित अफाट नीलिमा मला खायला येतो आहे कीं काय, अशा कांहींतरी अननुभूत, विलक्षण भीतीनं माझ्या काळजाचा थरकांप झाला. मी जगांतच आहें याची खात्री करून घेण्याकरितां कीं काय, एकदम धडपडून मी अंगाखालचं डेक चांचपडत उठून उभा राहिलों. अफाट निळ्या आकाशांतले ते अगणित तारे आणि मी एकटा, एकटा, एकटा, अशी कांहीं तरी भयंकर एकटेपणाची जाणीव त्या क्षणाला होऊन माझं काळीज धडधडत होतं. डेकच्या फळ्यांचा स्पर्श झाल्यावर, आजूबाजूचा बोटीचा कठडा पाहल्या-वर, जरा बरं वाटलं. जिन्यावरून उड्या मारीत मी खालच्या मोठ्या डेकवर आलों, आणि सिगारेट ओढीत, गप्पा-गोष्टी करीत, हंसत-खिदळत असलेले माझे बोटीवरले सोबती पाहून मला एकदम बरं वाटलं. मी माणसांत आलों होतों. माणसांत असण्यांत किती विलक्षण आनंद असतो याचा अतिपरिचयानं मला विसर पडला होता, त्याची जणुं काय त्या क्षणीं मला पुन्हा प्राप्ति झाली.

या क्षणाचा मी विचार करूं लागलों तेव्हां माझ्या ध्यानांत आलं कीं खरा-खुरा एकटेपणा माणसाला कधींच नको असतो. खरोखरच माणूस अगदीं एकटा असेल तर त्याला माणूस म्हणून जगणंच शक्य नाहीं. आहार, निद्रा, भय एवढ्यापुरता एखादा रॉबिन्सन क्रूसो कांहीं वर्षें एकटा जगूं शकेल, किंवा एखादा योगी सारं आयुष्य एकान्तांत घालवील; पण असला माणूस विचारांत घेण्यांत अर्थ नाहीं. तो माणूस नव्हेच. 'स वै मुक्तोऽथवा पशुः' ! निसर्गबाबाच्या मांडीवर लोळणं आणि सृष्टिसतीच्या खांद्यावर खेळणं हें सर्व कवितेंत नेहमींच, किंवा रोजच्या जीवनांत थोडा वेळ ठीक आहे, पण सर्वसामान्य-पणें माणसाला माणसांशिवाय राहणं शक्य नाहीं. उंच डोंगरावरून किंवा मनो-ऱ्याच्या शिखरावरून आकाशाची मजा मीं कितीतरी वेळां पाहिली होती. तेव्हां कधीं चमत्कारिक भीति वाटली नव्हती. कारण अंधुकपणें कां होईना, घरांचीं छप्परं — मानवी जीवनाच्या कांहीं खाणाखुणा दिसतच होत्या. पण बोटीवर केवळ आकाश आणि आपणच आहोंत असा क्षणभर भास झाल्याबरोबर माझ्या छातींत धडकी भरली !

माणूस एकटेपणाचा आव पुष्कळ वेळां आणतो; पण कळत अगर नकळत

प्रेमाच्या, द्वेषाच्या, नात्याच्या, गोत्याच्या, व्यवहाराच्या अनेक दृश्य किंवा अदृश्य धाग्यांनीं तो मानव-जातीशीं बांधलेला असतो. किंबहुना हे धागेच त्याची माणुसकी जिवंत ठेवीत असतात. माझंच पाहा ना. वाचीत, विचार करीत किंवा लिहीत माझ्या खोलींत मी बसलों असतां घरांतल्या कुणीं माणसानं माझ्याशीं बोललेलंच काय, पण माझ्या खोलींत डोकावून पाहिलेलंही मला मुळींच खपत नाहीं. संपूर्ण एकटेपणा मला पाहिजे असतो. पण त्याबरोबरच माझं लिहून किंवा वाचून झाल्यावर चहा करून द्यायला बायको घरांत आहे आणि माझ्याबरोबर खेळायला – खिदळायला मुलं येणार आहेत याचीही मला खात्री पाहिजे असते! मीं विचार करून लिहिलेलं कुणीतरी वाचणार आहे हेंही मला माहीत असतंच! तुला संपूर्ण एकटेपणा पाहिजे ना, राहा तर एकटा आणि खूप विचार कर, खूप लिही, असं म्हणून माझ्याशीं कुणींच कधीं बोलायचं नाहीं, चालायचं नाहीं, डोकावून मला त्रास द्यायचा नाहीं, कीं मीं लिहिलेलं वाचायचं नाहीं, असं घरांतल्या माणसांनीं आणि जगांतल्या लोकांनीं ठरवलं तर मला लिहिणं शक्य आहे का? मी म्हणतों, जगणं तरी शक्य आहे का?

मला पुढं जाऊन आणखी असं म्हणायचं आहे कीं केवळ एकटाच काय, पण केवळ दुकटासुद्धां माणूस जगूं शकणार नाहीं. या स्वार्थी, कपटी, दुष्ट जगापासून दूर दूर जाऊन 'तुला मी आणि मला तूं', असे आपण कुठंतरी राहूं, असं पुष्कळ प्रेमी युगुलं एकमेकांना सांगतात. हेंही कवितेपुरतं नेहमींच, किंवा व्यवहारांत थोडे दिवस ठीक आहे. पण कायमचं केवळ 'तूं आणि मी' राहणं शक्य नाहीं. सुष्ट, दुष्ट, कपटी, स्वार्थी, निष्कपट, निःस्वार्थी अशा विविध-रंगी मानवतेच्या सहवासांतच आपल्या प्रिय माणसांचा सहवास गोड वाटतो. केवळ प्रिय माणूस सदैव जवळ असेल तर कांहीं दिवसांनीं त्याचा सहवास विषाहूनही कडू होतो आणि तें प्रिय माणूस शत्रूहूनही शत्रु वाटूं लागतं. माझं हें विधान कुणाला कसंसंच वाटेल. पण एक घडलेली गोष्ट मीं कुठंतरी वाचली आहे. फॅसिस्ट हुकूमशाहीविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून पकडलेल्या एका क्रांतिकारक जोडप्याला फॅसिस्ट अधिकाऱ्यांनीं एकदां एक अजब शिक्षा दिली: 'तुमचं एकमेकांवर अतिशय प्रेम आहे ना – तुम्हाला एकमेकांना सोडून राहवणार नाहीं?' या प्रश्नाला त्या तरुण-तरुणीनं 'हो' असं उत्तर दिलं. 'ठीक

आहे, तुम्हाला कायमचं एकत्रं राहण्याची शिक्षा आवडेल,' असं म्हणून त्या अधिकाऱ्यांनीं त्या दोघांचे हात-पाय एकाच लोखंडी सांखळीनं कायमचे बांधून टाकून त्यांना तुरुंगांत ठेवण्याची शिक्षा दिली. खाणं, पिणं, झोंपणं, उठणं, फिरणं सर्व व्यवहार त्या दोघांना एकमेकांना जखडलेल्या स्थितींत चोवीस तास करावे लागत. दोन-चार दिवस त्यांनीं कसेतरी काढले. पुढें तिला झोंप लागली असतां तो जरा हलला तर ती जागी व्हायची. त्याला उठायची इच्छा नसतां तिला उठून कुठं जावंसं वाटलं तर तो चिडूं लागला. सांखळ्यांनीं दोघांच्या अंगाला जखमा झाल्या होत्या. एकाच्या हालचालींनीं दुसऱ्याला वेदना व्हायच्या. थोड्याच दिवसांत तीं दोघं क्षणोक्षणीं भांडूं लागलीं, एकमेकांना शिव्या-शाप देऊं लागलीं, दोघांपैकीं एक मरेल तर बरं, अशा प्रार्थना करूं लागलीं. हाल-हाल करून त्या दोघांना मारून टाकण्याची शिक्षा त्या अधिकाऱ्यांनीं दिली असती तर ती या शिक्षेपेक्षां कितीतरी सौम्य ठरली असती. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या त्या दोघांचं प्रेम ठार करून टाकण्याची — त्या दोघांना एकमेकांचा द्वेष करायला लावण्याची अमानुष शिक्षा त्यांनीं त्यांना दिली होती.

हें उदाहरण अपवादात्मक आहे हें मला मान्य आहे. सांखळीनं कायमचं दोघांना जखडून ठेवल्यावर एकमेकांबद्दल कांहीं दिवसांनीं उबग येणारच. पण मोकळेपणानंसुद्धां केवळ दोनच माणसं सर्व जगाचा संपर्क टाळून एकमेकांच्या सहवासांत कायमचीं राहतील तर कांहीं दिवसांनीं त्यांना एकत्र राहणं असह्य होईल असं मला वाटतं. छे छे! मी एकटाच राहीन, आम्ही दोघंच राहूं, या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण सर्वांनीं एकत्र राहिलं पाहिजे हेंच खरं.

● ● ●

# ६

## पुराणांतलीं वांगीं

गणूकाकांशीं माझे मतभेद नेहमींच होतात, पण त्यांच्या एका शक्तीचं मला नेहमीं कौतुक वाटतं. कोणत्याही कूट प्रश्नाचं ते अगदीं सहज आणि चट्दिशीं उत्तर देऊं शकतात. लहानपणीं तर त्यांच्या या शक्तीमुळं मी थक्क होऊन जात असें. त्या वेळीं मला जर कुणीं प्रश्न विचारला असता, कीं जगांतल्या सर्व शहाण्यांचा राजा कोण, तर त्याचं मीं तात्काळ उत्तर दिलं असतं, ' गणूकाका — आमचे गणूकाकाच ! '

लहानपणीं एकदां मीं त्यांना विचारलं, ' काका, मारवाड्याच्या डोक्यावर तीन पट्टे कां हो असतात ? '

काका ताबडतोब उत्तरले, ' अरे, मारुतीनं ओढलेत ते त्यांच्या डोक्यावर ! '

' म्हणजे ? ' मी उद्गारलों.

' मारुतीनं लंका जाळली हें तुला माहीत आहे ना ? '

' हो, पण त्याचा मारवाड्यांच्या... '

' ऐकून तर घे, ' काका सांगूं लागले, ' शेपूट पेटविण्याकरितां त्यानं शेपटाला खूपशा चिंध्या गुंडाळल्या, आणि घासलेटचे डबे तो शोधूं लागला. मारवाडी व्यापाऱ्यांकडे गयावया करून तो घासलेट मागूं लागला. पण मारवाडी कसले

खप्पी; ते म्हणाले, आम्ही नाहीं देणार फुकट घासलेट. मारुति संतापला. भुभुःकार करून त्यानं त्यांची गुदामं फोडलीं, घासलेटचे डबे बाहेर काढले आणि त्यांत शेपूट बुडवून पेटवून दिलं. त्या पेटत्या शेपटानं आधीं प्रत्येक मारवाड्याच्या डोक्यावर त्यानं तीन तीन पट्टे ओढले, आणि मग लंकेला आग लावायला तो निघाला. तेव्हांपासून मारवाड्यांच्या डोक्यावर हे तीन पट्टे आहेत ! '

काकांनीं दिलेली ही माहिती ऐकून मी अगदीं खूश होऊन गेलों. त्या वेळेला तरी माझं पूर्ण समाधान झालं.

आतां मोठा झाल्यावर काकांच्या उत्तरांवर मी इतका बेफाम विश्वास ठेवीत नाहीं; तरी पण काकांच्या विशाल कल्पनाशक्तीचं मला अजूनही पूर्वीइतकंच कौतुक वाटतं. परवां मीं त्यांना सहज म्हटलं, ' का हो, काका, पण-बीण, बाप-बीप असं केव्हां केव्हां आपण म्हणतों, त्यांतले हे बीण आणि बीप शब्द कुठून हो आले ? '

काकांचं उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, ' देव विश्वमित्राचं ऐकेना, तेव्हां तपश्चर्या करून प्रतिसृष्टि निर्माण करायची धमकी विश्वामित्रानं देवाला दिली होती, तुला माहीत आहे ना ? '

मी म्हटलं, ' हो. '

' पुढं देव नमला आणि विश्वामित्रानं आपला तो विचार सोडून दिला,' काका सांगूं लागले, ' पण थोडीशी प्रतिसृष्टि निर्माण झालीच होती. त्या सृष्टीं-तले हे शब्द अजून आपल्या भाषेंत राहिलेत ! '

विश्वमित्राची प्रतिसृष्टि आणि प्रतिसृष्टींतले हे शब्द, ही काकांची कल्पना मला अतिशयच हृद्य वाटली. हृद्य वाटायचं एक विशेष कारण होतं. माझ्या डोक्यांत अलीकडे एक चमत्कारिक विचार सारखा घोळत असतो. पुराणांतलीं वांगीं पुराणांत असं म्हणतात खरं, पण पुराणांतल्या वांग्यांचं चांगलं चमचमीत भरीत करून खातां येईल, असं अलीकडच्या कांहीं शोधांवरून मला वाटूं लागलं आहे. ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र, वगैरे अस्त्रांचीं वर्णनं आम्ही पुराणांत वाचीत होतों. आणि तीं अस्त्रं सोडल्याबरोबर पृथ्वी कशी थरथरा कांपत होती, सप्तसागर कसे उफाळून वर येत होते, आकाश कसं कोसळून खालीं येत होतं, भर दिवसा

मिट्ट अंधःकार कसा होत होता आणि मध्यरात्रीं लख्ख प्रकाश कसा पडत होता वगैरे वगैरे गोष्टींचं आम्हांला विलक्षण आश्चर्य वाटत होतं. हें आपलं पुराणांतलं वर्णन आहे. वास्तव जगांत हें कांहीं शक्य नाहीं, अशी आमची खात्री होती. ॲटम् बॉम्बचीं आणि त्याच्या स्फोटाचीं वर्णनं वाचून हीं पुराणांतलीं वांगीं आतां डोळ्यांसमोर झाडांना लटकूं लागलीं आहेत.

मध्यरात्रीं सामसूम झाल्यावर मी रेडिओ लावून बसतों, तेव्हां विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीची मला पुन्हा पुन्हा आठवण होते. एखादे वेळीं तुर्कस्थानमधील अंकारा शहरांत कुणी बोलत असेल त्याचा आवाज ऐकूं येतो, तर कधीं ऑस्ट्रेलियांतील सिडनेमधले शब्द कानांवर पडतात. कुठं तुर्कस्थान! कुठं ऑस्ट्रेलिया! त्या बोलणारांना कल्पना तरी असेल का, कीं मुंबई नांवाच्या एका शहरांतल्या एका कोपऱ्यांत बसलेल्या एका माणसाच्या कानांवर आपण बोलत असलेले शब्द पडत असतील म्हणून? आपण उच्चारलेला प्रत्येक शब्द त्याच क्षणाला साऱ्या विश्वाच्या कोनाकोपऱ्यांत जातो, — हिमालयावर उड्डाण करीत असलेल्या एखाद्या विमानांत, पॅसिफिक महासागराच्या तळाशीं असलेल्या एखाद्या पाणबुडींत, आफ्रिकेंतल्या जंगलांत, न्यू यॉर्कमधील गगनचुंबी इमल्याच्या एकशें दहाव्या मजल्यावर तो टिपून घेणारें यंत्र असेल तर तो ऐकतां येईल हें खरं, पण ऐकूं येवो अगर न येवो, तो इतक्या दूर सर्व ठिकाणीं जातो हें केवढं महान् आश्चर्य आहे!

रात्रीच्या प्रशांत वेळीं या आश्चर्याचा विचार करीत असतां कल्पनाशक्तीला आणखी एक पाऊल पुढें टाकावंसं वाटतं. साऱ्या विश्वाला वेढून टाकणाऱ्या लहरी आमचे शब्द सर्वत्र नेतात हें जर खरं, तर आणखीही एक गोष्ट खरी असण्याचा संभव आहे. या लहरी हे शब्द सांठवूनही ठेवूं शकत असतील. विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीसारखीच, कुणीं सांगावं, एखादी आवाजाची दुनिया असेल. आजचे, कालचे, अनादिकालापासूनचे माणसाचे आवाज या दुनियेंत वावरत असतील; उद्यां एखादा शास्त्रज्ञ या लहरींचं एखादं नवं रहस्य उघडकीला आणील, या 'आवाजांच्या दुनिये'चीं दारं आपणांसाठीं खुलीं होतील. आणि मग?— मग कल्पना करावी तितकी थोडीच! कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णानं अर्जुनाला सांगितलेली गीता, प्रत्यक्ष त्याच्या शब्दांत आपणाला ऐकतां येईल; भगवान् बुद्धाचीं प्रवचनं त्याच्या आवाजांत आपण ऐकूं. डेमॉस्थेनिस, सिसिरोचीं

भाषणं, शिवाजीचे शब्द, काय काय आपणांला ऐकतां येईल. मात्र व्याख्यानांचे खोटे रिपोर्ट देणं अशक्य होईल. सिनेमाला नेईन असं मी काल म्हणालोंच नव्हतों म्हणून नवऱ्यांना बायकांशीं भांडतां येणार नाहीं. आणखी, आणखी पुष्कळच कांहीं होईल ! पुराणांतलीं वांगीं पुराणांत असं गणूकाकांना सांगण्याची कांहीं सोय उरलेली नाहीं, एवढं खरं.

• • •

७

## आरसा हंसला......

मनुष्य-स्वभावाचं केव्हां केव्हां मनापासून हंसूं येतं. माझंच पाहा ना, परवां सहज हातीं आली म्हणून वीस-बावीस वर्षांपूर्वी मीं लिहिलेली माझीच एक गोष्ट मी वाचीत होतों. तिच्यांत एका पात्राचं वर्णन करतांना, तो माणूस चांगला चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा म्हातारा होता असं मीं केलं आहे. आतां मी त्या वयाचा झालों आहें. तेव्हां तें वर्णन वाचतांना मला कसंसंच वाटलं. 'चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा माणूस कसला म्हातारा, — चांगला तरुण असतो कीं,' मी मनांतल्या मनांत पुटपुटलों. नंतर अलिकडे लिहिलेला एक लेख पुन्हा पाहात असतां एक मजेदार. गोष्ट माझ्या ध्यानांत आली. तिथं कुणा तरी म्हाताऱ्याचं वर्णन करतांना चांगला साठ-सत्तर वर्षांचा तो होता, असं मीं लिहिलं आहे. म्हणजे आतां माझ्या मतें, साठ-सत्तर वर्षं झालीं म्हण-जेच माणूस म्हातारा होतो. मला वाटतं, माझ्या साठ-सत्तराव्या वर्षी एखादी गोष्ट जर मीं लिहिली तर म्हाताऱ्या माणसाचं वर्णन, तो चांगला ऐंशी-नव्वद वर्षांचा होता. असं मी करीन!

का कुणाला ठाऊक, पण असं होतं खरं. असलीच आणखी एक गंमत सांगण्यासारखी आहे. कांहीं दिवसांपूर्वी एका युरोपियन विद्वानाचं आमच्या कॉलेजांत व्याख्यान झालं. बोलतां बोलतां कुणाची तरी गोष्ट सांगतांना तो

म्हणाला, ' चाळीस-बेचाळीस वर्षांचा तो तरुण होता, — त्यानं एकदम तिला मागणी घातली ... ' ' चाळीस-बेचाळीस वर्षांचा तरुण, ' हे शब्द वक्त्याच्या तोंडांतून बाहेर पडल्यावरोबर कॉलेज-विद्यार्थ्यांच्या त्या प्रचंड श्रोतृसमुदायांतून हास्याचा एकच कल्लोळ उठला. वीस-बावीस वर्षांच्या त्या तरुणांना ' चाळीस-बेचाळीस वर्षांचा तरुण ' या शब्दांचं विलक्षण हंसूं आलं. मुलं कां हंसलीं तें त्या बिचाऱ्या युरोपियन वक्त्याच्या ध्यानांतच येईना. तो क्षणभर बावरल्या-सारखा झाला. तो स्वतः चाळीस-बेचाळीस वर्षांचा होता; आणि त्याच्या व्याख्यानाला हजर असलेले आम्ही तीन-चार प्राध्यापकही चाळीस-पंचेचाळि-शीच्या आसपासचे होतों. त्याच्या त्या शब्दांचं आम्हांला कांहींच वाटलं नव्हतं. पण मुलं हंसलीं तेव्हां आमच्या सर्व कांहीं ध्यानांत आलं.

खरोखरच माणूस म्हातारा केव्हां होत असेल तो होवो; पण कुणीं तरी अनुभवी शहाण्यानं म्हटलं आहे तें जर खरं असेल तर मग मी म्हातारा खास नाहीं. तो शहाणा म्हणतो, ' तारुण्याचं लक्षण हेंच कीं त्या वयांत माणूस जें आवडेल तें खातो; आणि जें खातो तें त्याला आवडायला लागलं कीं तो म्हातारा झाला म्हणून समजावं ! ' तरुणपणीं माणूस तिखट, तेलकट, काय वाटेल तें खात असतो. म्हातारपणाचा वारा लागला कीं मग मात्र तो बिन-तिखटाचं, वाफेवरलं वगैरे खाऊं लागतो, आणि तेंच किती चवदार लागतं हें स्वतःला आणि इतरांना अट्टाहासानं समजावून देऊं लागतो ! स्त्री जितकं सांगते तितकंच तिचं वय, आणि पुरुषाला जें वाटतं तेंच त्याचं वय, असं कुणीं तरी म्हटलं आहे तेंच मला वाटतं खरं. '

वयाच्या या गोष्टी एका डॉक्टर-मित्राबरोबर करीत असतां त्यानं एक आश्चर्यकारक नवा शोध मला सांगितला. तो म्हणाला, ' आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या एका शास्त्रज्ञानं अलीकडे असं सिद्ध केलंय् कीं लौकिक दृष्टया पंचवीस वर्षं वयाचा असणारा माणूस खरोखर पंचावन्न वर्षांचा असेल; तर एखादे वेळीं पंचावन्न वर्षांचा खरोखर पंचवीसच वर्षांचा असेल. '

' म्हणजे ? ' मी उद्गारलों, ' याचा अर्थ काय ? '

' याचा अर्थ सोपा आहे, ' माझा डॉक्टर मित्र सांगू लागला, ' त्या शास्त्र-ज्ञानं हा हिशोब दाखवणारं एक गणिती समीकरणही तयार केलंय्. ती गुंतागुंत

तुला समजणार नाहीं. थोडक्यांत असं सांगतां येईल : समज, एक पंचवीस वर्षांचा माणूस आहे, आणि एक पंचावन्न वर्षांचा आहे. दोघांच्याही हातांना एकाच प्रकारच्या शस्त्रानें पाव इंच लांब, पाव इंच रुंद आणि पाव इंच खोल अशी सारखीच जखम केली, आणि दोघांनाही एकाच हवामानाच्या अगदीं सारख्याच दोन खोल्यांत ठेवून दिलं. पंचावन्न वर्षं वयाच्या माणसाची जखम पांच दिवसांत भरून आली, आणि त्याच परिस्थितींतल्या पंचवीस वर्षांच्या माणसाच्या जखमेनें भरून यायला दहा दिवस घेतले; तर आम्हां डॉक्टरांच्या दृष्टीनं, तो पन्नास-पंचावन्न वर्षांचा माणूस पंचविशींतला, आणि तो पंचवीस वर्षांचा तरुण पन्नाशींतला असंच म्हटलं पाहिजे. कांहीं लोक जन्मतःच म्हातारे असतात, तर कांहीं म्हातारपणीं तरुण असतात. आलं लक्षांत ? '

' विचार करण्यासारखी गोष्ट आहे खरी. ' मी पुटपुटलों.

खरोखरच मी विचार करूं लागलों. शारीरिक दृष्ट्या पन्नाशीचा माणूस पंचवीस वर्षांचा तरुण आणि आणि पंचविशीचा जर पन्नास वर्षांचा म्हातारा असूं शकतो, तर मनाच्या दृष्टीनं हें किती तरी पटींनीं अधिक खरं असलं पाहिजे. आहेच मुळीं तें खरं. त्याचा ' फॉर्म्युला ' मी देतों. या शोधाबद्दल त्या शास्त्रज्ञासारखं मला ' नोबेल पारितोषिक ' मिळेल कीं काय तें मला सांगतां येत नाहीं; पण कांहीं म्हातारे पाहिल्यानंतर हा ' फॉर्म्युला ' मला सहज सांपडला. सत्तराव्या वर्षीं या म्हाताऱ्यांचं मन सात वर्षांच्या बालकाच्या इतकं ताजं, टवटवीत आणि निर्मळ आहे. एकाच म्हाताऱ्याचं उदाहरण देतों. आपलीं नातवंडं शोभतील अशा मुलांत सेनापति बापट किती सहजपणें मिसळतात,— त्यांच्या बोलण्यांत, त्यांच्या चालण्यांत, त्यांच्या खेळण्यांत किती मोकळेपणानं रंगून जातात. त्या मुलांनाही आपण सत्तरी उलटलेल्या एका भीष्माचार्यांशीं बोलतों आहोंत, असं वाटत नाहीं. पण त्यांच्या मनाच्या ताजेपणाची खात्री मला पुरेपूर पटली ती त्यांचं एक व्याख्यान ऐकतांना. ते सहज म्हणाले, ' मला लोक विचारतात, तुम्ही हल्लीं झाडू घेऊन रस्ते साफ करण्याचं काम कां करतां ? पुष्कळ कार्यकर्त्यांबरोबर मीं कामं केलीं. माणसं केव्हां केव्हां कंटाळतात, ' नाहीं ' म्हणतात. झाडूचं तसं नाहीं. विचारावं तेव्हां ती तुमच्याबरोबर काम करायला तयार... ! '

झाडूला विचारण्याची आणि तिच्याबरोबर काम करण्याची ही कल्पना आपल्या बाहुलीशीं, भिंतीशीं, झाडाशीं किंवा खुर्चीशीं गप्पागोष्टी करीत बसणाऱ्या एखाद्या बालकाच्याच तोंडीं शोभण्यासारखी नाहीं का ? मुलांनाच अशा साध्या दिसणाऱ्या, पण मोठ्या माणसांना किंवा कवींनाही न सुचणाऱ्या सुंदर कल्पना सुचतात. एका लहान मुलाला घेऊन एके दिवशीं सकाळीं मी खिडकीशीं उभा होतों. खिडकीजवळ एक आरसा होता. आरशावर अचानक सूर्याचा किरण पडला आणि आरसा चमकला. त्या मुलानं डोळे मिचकावले. ' काय रे झालं ? ' मीं त्याला विचारलं.

तो चटकन् म्हणाला, ' आरसा हंसला, काका ! '

एकदां एका मुलाला त्याच्या वडिलांनीं सकाळच्या वेळीं सहज विचारलं, ' काय रे, रात्र कुठं गेली ? ' तो मुलगा एकदम म्हणाला, ' दिवसानं खाऊन टाकली रात्र ! '

' मग या काळ्या काळ्या सांवल्या रस्त्यावर दिसताहेत त्या कुठून आल्या ? ' वडिलांनीं गमतीनं विचारलं.

मुलाचं उत्तर तयार होतं. तो चट्दिशीं म्हणाला, ' मी जेवतांना ताटाच्या बाहेर भाताचीं शितं नाहीं का उडत, — तशींच दिवस रात्र खाऊं लागला तेव्हां हीं शितं उडालींत ! '

किती सुंदर कल्पना आहे ही. सत्तराव्या वर्षीही बापटांना अशाच साध्या, पण सुंदर कल्पना सहज सुचतात. झालं तर ! हा घ्या माझा मनोयौवनाचा ' फॉर्म्युला ' : मुलांत मूल होतो आणि मुलांच्यासारख्या सुंदर कल्पना जो सहज बोलून जातो तोच चिरतरुण.

• • •

८

## यजमान आणि पाहुणे

‘ तुझं माझं जमेना, आणि तुझ्यावांचून गमेना ’ हा वाक्प्रचार ज्यानें शोधून काढला त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल मला अतिशय आदर वाटतो. मोठमोठे तत्त्ववेत्ते जगाचं रहस्य उकलून दाखवतांना मोठ्या आणि जडजंबाल गहन भाषेंत जें सांगतात तेंच अगदीं सोप्या आणि रोजच्या अनुभवांतल्या भाषेंत या माणसानें सांगितलें आहे. अशा कितीतरी जोड्या आहेत कीं ज्यांना एकमेकांबद्दल ‘ तुझं माझं जमेना आणि तुझ्यावांचून गमेना ’, असें म्हणावसं वाटतं. यांपैकीं एका जोडीबद्दल मला बोलायला सांगितलें आहे, ‘ यजमान आणि पाहुणे ’ ही ती जोडी ! सर्व सामान्यपणें माणसं माणूसघाणी नसतात. हेंच शास्त्रीय भाषेंत सांगायचं म्हणजे मानवप्राणी हा समाज करून राहणारा प्राणी आहे; किंबहुना इतर प्राण्यांशीं तुलना करतां असें म्हणतां येईल कीं, माणसाचें हें एक अभिमानास्पद वैशिष्ट्य आहे. प्रत्येकाला आपणाकडे केव्हां ना केव्हां पाहुणे यावे असें वाटतंच. वाद निर्माण होतो तो किती, किती वेळां आणि कोणत्या प्रकारचे पाहुणे यावे यासंबंधीं ! दुसरं असं कीं, यजमान आणि पाहुणे म्हणजे सिंह आणि हत्ती यांच्यासारखें अगदीं परस्पर विरुद्ध जातींचे जन्मजात वैर असलेले प्राणी नव्हत. आज यजमान असलेला उद्यां कुणाचा तरी पाहुणा होईल, आणि आज पाहुणा असलेल्याच्या नशिबीं परवां यजमान होण्याची पाळी येईल !

३९५०८ प्रा. ५६८

हें असें आहे म्हणूनच सुरुवातीला मीं म्हटलं कीं, 'तुझं माझं जमेना, आणि तुझ्यावांचून गमेना' हें सूत्र तयार करणारानं मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांचं म्हणणं सर्वांना पटेल अशा पद्धतीनें सांगितलं आहे. पाहुण्यांमुळें त्रास होतो, तेव्हां तुझं माझं जमेना असं मनःपूर्वक म्हणावंसं वाटतं पण केव्हां केव्हां एकलकोंडेपणाचा इतका कंटाळा येतो कीं, पाहुणे येतील तर बहार होईल असं वाटतं. आणि त्यांच्यावांचून गमत नाहींसं होतं. ते नकोसे वाटतात हें जितकं सत्य आहे तितकंच ते हवेसे वाटतात हेंही आहे. एका संस्कृत सुभाषितकारानं हें संपूर्ण सत्य फार परिणामकारकपणें सांगितलं आहे. तो म्हणतो,

प्रथमे द्वितीये तृतीयेच
दिनेऽतिथिः ।
देवभूतो, भारभूतो, शल्यभूतो
भवेत्क्रमात् ॥

अतिथी किंवा पाहुणा, पहिल्या दिवशीं देवासारखा वाटतो, दुसऱ्या दिवशीं तो भारभूत व्हायला लागतो, आणि तिसऱ्या दिवशीं तो शल्याप्रमाणें बोचूं लागतो! थोडक्यांत मजा, आणि अति तिथें माती, हें पाहुण्यानेंही लक्षांत ठेवलं पाहिजे. पहिल्या दिवशीं पाहुण्याचं कौतुक वाटतं. तो तसाच चिकटून राहिला कीं त्याचा भार असह्य होऊन ही पीडा केव्हां जाईल असं यजमानाला होतं आणि तिसऱ्या दिवशींही तो हलण्याचीं चिन्हं दिसलीं नाहींत कीं कांटा कसा उपटून काढावा याचा यजमान विचार करूं लागतो! सुभाषितकारानं पहिला दिवस, दुसरा दिवस, तिसरा दिवस हे शब्द सूत्रमय भाषेसाठीं वापरले आहेत. त्यांचा अगदीं कांटेतोल अर्थ करावयाचें कारण नाहीं. पहिले कांहीं दिवस, नंतरचे कांहीं दिवस आणि त्यापुढले कांहीं दिवस असा थोडा ऐसपैस अर्थ प्रथमे, द्वितीये, तृतीये दिने यांचा करायला हरकत नाहीं.

भारभूत आणि शल्यभूत झालेल्या पाहुण्यांचं अतिशय बहारीचं वर्णन आचार्य अत्रे यांनीं 'झेंडूच्या फुलां'तील आपल्या 'पाहुणे' या कवितेंत केलं आहे. तें इथं सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. केशवसुतांच्या कवितेंत हे दंवाचे थेंब कुठून येतात म्हणून मुलगा आईला विचारतो. अत्र्यांच्या कवितेंत हे पाहुणे इथें कुठून आले म्हणून मुलगा आपल्या आईला विचारतो.

‘आई ग! तर वद मातें
कोठुनि हे आले येथें?
तंबाखू पानें खात
कसे पहा बडबडतात!
उघडून डबा ग आपुला
राजरोज करिती हल्ला!
बाबांच्या पेटींतुन गे
पळविती विड्यांचे जुडगे!
मौज मला यांची वांटे
होते हे तर वद कोठे?’

आई यावर उत्तर देते :

‘कावळे, गिधाडें, घारी
येतीं हीं जेथुन सारीं
डोंगळे, डांस, धुंगरटीं
बाळा रे, जेथुन येती,
खोकला, ताप हीं दुखणीं
आम्हांस येती जिथुनी,
तेथुनीच आले येथें
हे छळावया आम्हांतें!’

त्यावर मुलगा पुन्हा विचारतो :

जातील कधीं हे आई?
घरादार न यांना कांहीं?’

आई म्हणते :

‘नाहीं रे ते इतुक्यांत
जाणार गड्या नाहींत!
जोंवरी भीड आम्हांतें
जोंवरी लाज ना यांतें,
तोंवरी असा बाजार
सारखा इथें टिकणार!

चडफडणें बघुनी त्यांतें
असतों ते जोंवरी येथें !

या कवितेंत वर्णन केलेले पाहुणे कितीही वाईट असले तरी निदान शेवटपर्यंत पाहुणेच राहिलेले दिसतात. पण मला एक लोकोत्तर पाहुणा आठवतो. तो तर शेवटीं यजमानाचाच यजमान झाला आणि बिचारा यजमान स्वतःचे घरांत पाहुण्यासारखाच काय पण चोरासारखा राहूं लागला ! आमच्या गणूकाकांच्या घरीं ही पाहुण्यांची जात पाहण्याची संधि मला मिळाली. आमचे गणूकाका पाहुण्यांचे भारी शोकी. चार-सहा महिन्यांत कुणी आला नाहीं कीं ते अगदीं बेचैन होतात. त्यांच्या पाहुण्यांचा आम्हां दूर राहणारांना कधीं कधीं कंटाळा येतो, पण त्यांना येत नाहीं. त्यांच्या पाहुण्यांविरुद्ध ब्र काढण्याची आमची छाती नाहीं. एकदां असाच त्यांच्या एका पाहुण्याबद्दल कांहीं उणा-अधिक शब्द मी त्यांच्याकडे बोललों. ते माझ्यावर आणि साऱ्या नव्या पिढीवर आवेशानें तुटून पडले. ‘ तुम्हां अलीकडच्या लोकांना स्वतःचे आईबाप जवळ नकोत; लग्न झाल्याबरोबर वेगळं राहायला पाहिजे. तुम्हांला पाहुणे कुठून आवडणार ! ’ काका गरजले; आणि विभक्त कुटुंब-पद्धतीचा हीनपणा, एकत्र कुटुंब-पद्धतीची श्रेष्ठता, नव्या पिढीचा भ्रष्टपणा वगैरे वगैरे विषयांवर त्यांनीं तब्बल दीड तास व्याख्यान दिलें. त्यांनीं हा भडिमार केल्यापासून त्यांच्या पाहुण्यांचा त्यांच्यासमोर उल्लेख करण्याचेंही मीं सोडून दिलें. म्हणूनच त्यांनीं आपणहून त्या दिवशीं आपल्या पाहुण्याची माझ्यासमोर गोष्ट काढली तेव्हां माझ्या आश्चर्याला पारावर उरला नाहीं. काकांचा पाहुणा खरोखरच लोकोत्तर असला पाहिजे, मीं मनांत म्हटलें.

काकू दोन-तीन महिने कोंकणांत राहायला गेल्या होत्या. काका एकटेच घरीं होते. केव्हां खाणावळींतून डबा आणून काका जेवायचे, केव्हां आम्ही जेवणाचा डबा पाठवीत असूं, केव्हां स्वतः शिजवून काका कांहीं तरी खायचे. हा पाहुणा आला तेव्हां पहिल्यांदा त्यांना अतिशय आनंद झाला. मोठ्या खुशींत होते काका. एका आठवड्याच्या आंत पाहुण्यानं काकांच्या घरांत आपली घडी नीट बसविली. खालीं जमिनीवर झोपून माझी कंबर दुखते असें तो म्हणाला, तेव्हांपासून काका जमिनीवर झोपूं लागले आणि पाहुण्यानें काकांची खाट

पटकावली. काकांना भात आणि चहा या दोन वस्तु अतिशय आवडतात. भरपूर भात आणि भरपूर चहा काकांना पाहिजे. पण तुमचं अंग अलीकडे फार सुटतंय, तुम्हीं भात कमी खाल्ला पाहिजे असें काकांना दरडावून सांगून पाहुण्यानं काकांचा भात तोडला. बहुतेक भात तो स्वतःच मट्ट करूं लागला. चहानें ऊष्णता वाढते आणि माझी प्रकृति थंड आहे असं म्हणून काकांना जेमतेम अर्धा कप चहा देऊन तो स्वतः कपावर कप ढोसूं लागला. तो कुठें बाहेर गेला असतां काका चोरून चहा करीत होते. काका कप तोंडाला लावणार इतक्यांत तो आला. किती वेळ चहा पितां, तुमच्या प्रकृतीला इतका चहा बरा नाहीं; म्हणून त्यानं तो कप ओढून घेतला आणि स्वतः पिऊन टाकला! काका कमालीचे भिडस्त असल्यामुळें त्यांनीं वाटेल तें सहन केलं असतं, पण चहा आणि भाताची उपासमार त्यांना अगदीं असह्य झाली. ते माझ्याकडे आले कीं स्वतः होऊन चहा मागूं लागले. एकदां मी जेवत असतां ते आले. माझ्या ताटांतल्या भातावरून त्यांची नजर हालेना. काकांचें कांहीं तरी ठीक नाहीं हें मीं ओळखलें. पण उगाच काका रागावतील आणि माझ्यावर तुटून पडतील म्हणून मी कांहीं बोललों नाहीं. शेवटी काकांच्यानें राहवेना आणि त्यांनीं आपली करुणकथा भीतभीत मला सांगितली. ‘ काय करावं मला समजत नाहीं, ’ काका म्हणाले.

‘ लाथ मारून त्याला हांकलून द्या ! ’ मी ओरडलों.

‘ छे, छे, छे, छे, ! कांहीं झालं तरी तो माझा पाहुणा आहे, ’ काका म्हणाले, ‘ कांहीं तरी युक्ति करून तो जाईल असं केलं पाहिजे. ’

‘ तुम्हां जुन्या लोकांना पाहुणे हवेत ना ? ’ असं काकांना म्हणायचं माझ्या तोंडावर आलं होतं, पण काका इतके रंजीस आले होते कीं, या वेळीं त्यांच्या-वर प्रहार करणं शुद्ध राक्षसीपणा झाला असता. म्हणून मीं मन आवरलं.

‘ मी एक युक्ति सांगतों, ’ मी म्हणालों, ‘ मात्र तुम्हीं मी सांगेन तसं वागलं पाहिजे ! ’

काका तात्वडतोब कबूल झाले.

माझ्या एका डॉक्टर मित्रानें नुकतेंच हॉस्पिटल उघडलें होतें. तिथं मी काकांना नेलं आणि त्यांच्या पायाला एक जंगी बँडेज बांधायला लावून त्यांना

खाटेवर झोपवून ठेवलं. पाहुणा समाचाराला आला तर गाडीखालीं सांपडून त्यांचा पाय मोडला आहे, एक महिना तरी उठणार नाहींत, म्हणून त्याला सांगायला डॉक्टरला बजावलें. काकांच्या चाळीचा भैय्या, काकांचा दूधवाला, भाजीवाला वगैरेंना इथं राहतात हे काकांचे दूरचे काका आहेत, त्यांच्याचकडे बिलं मागा म्हणून सांगितलं! इतक्या बाजूंनीं मारा केल्यावर तो पाहुणा निघून गेला. काकांना सहा दिवस हॉस्पिटलांत पडून राहावं लागलं!

आतांपर्यंतचीं हीं सर्व उदाहरणं आणि हें सर्व विवेचन वाचून कुणाची कल्पना होईल कीं, पाहुणे तेवढे वाईट, आणि यजमान तेवढे चांगले. पण हेंही एक अर्धसत्यच होईल. यजमानांचेही कांहीं लोकोत्तर नमुने आढळत नाहींत असं नाहीं. फार दूर कशाला जायला हवें. आमच्या गणूकाकांचाच एक अनुभव सांगण्यासारखा आहे. काका कधीं कुणाबद्दल वाईट बोलत नाहींत तेव्हां ते असल्या तक्रारी मला कधींच सांगत नाहींत. काकूंनी ही गोष्ट मला एकदां सहज सांगितली. आजारांतून उठल्यानंतर काकांना एकदां पुण्यासारख्या ठिकाणीं हवा बदलण्यासाठीं दोन महिने जाऊन राह्यला डॉक्टरनें सांगितलें होतें. पुण्याला त्यांचे एक दूरचे नातेवाईक राहात होते. त्यांच्याकडे जाऊन राहायचं काकांनीं ठरवलं. स्वतःचा खर्च काका दुसऱ्यांना करूं देणार नाहींत हें सांगायला नकोच. त्यांना लागणार दूध, फळं, औषधं वगैरेंचा खर्च काकाच करीत. त्याशिवाय स्वतःला आणि त्या कुटुंबाला लागणाऱ्या कितीतरी वस्तु तेच विकत आणीत. काकांनीं स्वतःच्या सदऱ्यासाठीं कापड आणलं तें पाहून किती दिवस असलं कापड मी शोधीत होतों, असे यजमान म्हणाले. काकांनीं दोन सदऱ्यांचं कापड त्यांना आणून दिलं. घराचं छप्पर मोडलं होतं. तें त्या गृहस्थानं दुरुस्त करून घेतलं आणि शें-पन्नास रुपयांचें बिल आलें तेव्हां सध्यां माझ्याकडे पैसे नाहींत, तुम्ही तेवढे पैसे मला उसने द्या, नंतर मी तुमचे देईन, म्हणून काकांकडून पाऊणशें रुपये मागून घेतले; आणि ते कधींच परत केले नाहींत! असेही यजमान व काकांसारखे पाहुणे नसतात असें नाहीं!

माणसाला माणसं हवींशीं वाटणं यांतच माणूसकी आहे. हें एक महान् सत्य आहे. आपल्या रक्त-मांसाच्या आप्तस्वकीयांसाठीं आपण कांहीं चांगलें केलें तर त्यांत कांहीं मोठंसं नाहीं. तो एक प्रकारचा स्वार्थच आहे. पण जो

आपला कुणी नाहीं इतकेंच नव्हे तर ज्याला कधीं पाह्यलेला नाहीं, अशा अतिथीसाठीं वाटेल त्यावर पाणी सोडणाऱ्या महोदार महात्म्यांच्या अनेक कथा आपल्या शास्त्रपुराणांत आहेत. अतिथीनं इच्छा प्रकट केली म्हणून स्वतःच्या मुलाचं मांस शिजवून त्याला खाऊं घालणाऱ्या चिलयाच्या आईबापांच्या कथेंत या महान् सत्याच्या परमोच्च स्वरूपाचें दर्शन होतें.

शास्त्रकारांनीं यजमानांचीं कर्तव्यं सांगितलीं आहेत; तेव्हां यथेच्छ पाहुणचार झोडण्यापलीकडे आपणाला कांहीं कर्तव्य नाहीं असं पाहुण्यांनीं मात्र समजूं नये हें सांगायला नकोच. उद्यां यजमान व्हायला आपण तयार असूं तरच आज पाहुणा होण्यांची आपली लायकी आहे हें त्यांनीं विसरतां कामा नये. हें विसरणारे जगांत फार आहेत म्हणूनच पाहुणा या शब्दाची आज इतकी बदनामी झाली आहे. पण कुणीं कुणाला हंसायचं कांहीं कारण नाहीं. आपण सर्वच माणसं अगदीं नालायक पाहुणे आहोंत हें श्रीसमर्थ रामदासांनीं मोठ्या खोंचक शब्दांत सांगितलं आहे. रामदास म्हणतात, हें विशाल जग ज्यानं निर्माण केलं त्या परमेश्वराचे पाहुणे म्हणून या जगांत आपण राहतों, वावरतों, अनेक सुखं उपभोगतों; पण आपला यजमान कोण आहे, तो काय करतो, तो कसा दिसतो याची साधी पूसतपाससुद्धां करणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आपणांपैकीं किती थोडे ? समर्थ म्हणतात —

‘ उगाच घर पाहोनी गेला ।
घरधनी नाहीं ओळखला ।
राज्यामधूनीच आला ।
परी राजा नेणें ॥

समर्थांच्या या प्रश्नाला आपण काय उत्तर देणार ? —

५

८

## कला आणि कायदा

माझ्या एका चित्रकार मित्राच्या चित्रांचं प्रदर्शन पाहायला गणूकाकांना मी बरोबर घेऊन गेलों होतों. निसर्गदृश्यांची सुंदर सुंदर चित्रं पाहून गणूकाका माझ्या मित्रावर खूश झाले होते. त्याची तोंडभर स्तुति करीत होते. इतक्यांत विवस्त्र स्त्रीच्या एका सुंदर चित्राकडे आम्ही येऊन ठेपलों आणि विजेचा झटका बसल्यासारखे गणूकाका जागच्याजागीं थबकले. क्षणभर त्यांच्या तोंडांतून शब्द फुटेना. झटकन् मान खालीं घालून ते पुढें सटकले, आणि माझ्या अंगावर खेंकसले, 'असल्या चित्रांना बंदी करणारा कांहीं कायदा नाहीं काय रे ?'

'आहे ना,' मी शांतपणें म्हणालों, 'अश्लील चित्र किंवा अश्लील पुस्तक जप्त करून त्याच्या कर्त्यांना शिक्षा देण्याची कायद्यांत सोय आहे.'

'ती सोय काय चाटायची आहे ?' गणूकाका उद्गारले, 'पुस्तक प्रसिद्ध होऊन एकदां लोकांच्या हातीं पडल्यावर किंवा चित्र अनेकांनीं पाहून झाल्यावर कुणीतरी तक्रार करणार, त्यानंतर सरकारी चौकशी होणार, मग खटला भरला जाणार म्हणजे गेलींच दीड-दोन वर्षे ! तोंपर्यंत त्या पुस्तकाचे किंवा चित्राचे काय व्हायचे ते दुष्परिणाम होणार इतकंच नव्हे तर ते चांगले जुने होऊन जाणार !'

' मग तुमचं म्हणणं सरकारनं काय करावं असं आहे, काका ? ' मीं नम्रपणें विचारलें.

' सर्व पुस्तकं आणि चित्रं, तीं प्रसिद्ध होण्यापूर्वीच सरकारनं पाहावीं आणि तुझ्या मित्राच्या या असल्या चित्रासारखी चित्रं किंवा पुस्तकं बाहेर येऊंच देऊं नयेत मुळी. ' काका तणतणले.

' तुमची सूचना फारच विधायक आहे, काका ! ' मी म्हणालों, ' पण, हें काम सरकारनं अंगावर घेतलं तर दुसरा कोणताच उद्योग त्यांना करावयाला नको ! '

' मग तुझं काय म्हणणं आहे ? ' काकांनीं मला विचारलें.

' माझं म्हणणं असं, ' मी म्हणालों, ' कीं तुम्ही म्हणतां असला प्रसिद्धि-पूर्वीच चित्रं किंवा पुस्तकं पास करण्याची सत्ता सरकारला देणारा कायदा तर नकोच, पण सध्यां आहे हा — नंतर खटले करण्याची सत्ता सरकारकडे सोपवणारा कायदाहि काढून टाकावा ! ''

' मला चिडवण्याकरितां तूं असं कांहीं तरी म्हणणार हें मला माहीतच होतं ! ' काका म्हणाले.

' काका, खरोखरच माझं तसं मत आहे, ' मी म्हणालों, ' आणि तुम्हांला एक बातमी सांगतों; माझ्या मित्राचं तुम्हीं आत्तांच पाह्यलेलं हें चित्र तज्ज्ञांनीं सर्वोत्कृष्ट ठरवलंय् ! '

काकांनीं कपाळावर हात मारला, आणि प्रलयकाल आल्यासारखा चेहेरा करून ते बाहेर पडले.

हा प्रसंग माझ्या एका वाङ्मयप्रेमी मित्राला मी सांगूं लागलों तेव्हां तो म्हणाला, ' म्हणजे ! तुला अश्लीलता आवडते कीं काय ? '

' मुळींच नाहीं, ' मी म्हणालों, ' मला आवडते कीं नाहीं हा प्रश्नच नाहीं. असल्या कायद्यानं समाजाचा कांहीं फायदा होणार नाहींच, पण कलेचं किंवा वाङ्मयाचं मात्र अतिशय नुकसान होईल, — म्हणजे शेवटीं समाजाचंच अतिशय नुकसान होईल ! '

' तें कसं काय ? '

' असले प्रसिद्धिपूर्व सरकारमान्यतेचे कायदे असते तर कालिदास किंवा

शेक्स्पीअर यांचं एकहि पुस्तक प्रसिद्ध झालं नसतं. यांत समाजाचं नुकसान आहे असं तुला वाटतं कीं नाहीं ?'

'हो, — पण —'

'समजलों तुला काय म्हणायचंय् तें. त्यांचीं पुस्तकं या कायद्यांत सांपडलींच नसतीं, होय ना ?'

'हो —'

'पण कायद्यांत सांपडलीं नसतीं हें आतां कित्येक शतकांनीं कालिदास, शेक्स्पीयर, कविकुलगुरु — कविश्रेष्ठ ठरल्यानंतर तुम्ही लोक म्हणूं शकतां. एक गोष्ट तुम्ही विसरतां कीं, कालिदासाला 'मालविकाग्निमित्र' या आपल्या पहिल्याच नाटकाच्या सुरुवातीला म्हणावं लागलंय् कीं पुराणमित्येव न साधु सर्वं, न चापि काव्यं नवमित्यवद्यम् म्हणजे जुनीं काव्यंच चांगलीं, कालिदासाचं हें नवं काव्य अवद्य म्हणजे गर्हणीय आहे असं म्हणणारे जाडे जाडे पंडित त्या काळांत होते, आणि त्यांना उत्तर म्हणून कालिदासाला हा श्लोक लिहावा लागला.'

'तें खरं आहे.'

'म्हणूनच मी म्हणतों कीं, एक वेळ पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर बंदी घालण्याचा कायदा असला तर चालेल,—तें पुस्तक काय आहे हें लोकांना कळायला तरी सवड राहील, पण मुळांतच एखादं पुस्तक मारण्याचा कायदा झाला तर वाङ्मयाचा ग्रंथच आटोपला !'

'तें कालिदास-शेक्स्पीअरचें ठीक आहे रे, पण सगळेच लेखक कांहीं कालिदास-शेक्स्पीअर नसतात. घाणेरडं लिहिणारे कांहीं लेखक असतातच कीं नाहीं !'

'कांहीं का म्हणतोस ! मी तर तुझ्यापुढं जाऊन म्हणतों कीं, घाणेरडं लिहिणारे पुष्कळ असतात — कालिदास-शेक्स्पीअरसारखे क्वचितच, आणि तरीहि कायदे नसावे.'

'म्हणजे; तुला म्हणायचंय् तरी काय ?'

'मला असं म्हणायचंय कीं या बाबतींत कायद्यानं समाजाचा फायदा होण्यापेक्षां नुकसानच अधिक होईल. घाणेरडं पुष्कळच प्रसिद्ध होतं असं मी म्हणालों.

तसलीं चित्रं किंवा पुस्तकं कोंवळ्या मुलांच्या हातीं पडणार नाहींत याची आई-बापांनीं काळजी घ्यावी. असल्या पुस्तकांना हात न लावण्याचा समाजानं पाहिजे तर निश्चय करावा, त्याविरुद्ध प्रचार करावा, तसलीं पुस्तकं किंवा चित्रं कर्त्याला किंवा प्रकाशकाला फायदेशीर होणार नाहींत असं करावं, — सर्व कांहीं लोकशाही हक्कांचा उपयोग करावा. पण कायदा आणि पोलीसखातें किंवा सरकारी नोकर यांच्या हातीं वाङ्मय किंवा कलाकृति बऱ्या कीं वाईट हें ठरविण्याची सत्ता नको, मग तें कोणतंहि सरकार असो!'

'सरकारवर तुझा इतका गैरविश्वास कां?'

'गैरविश्वास नाहीं. राज्यकारभारासाठीं सरकार पाहिजेच, पण कलाकृति बरी कोणती नि वाईट कोणती हें ठरविण्याइतकी सूक्ष्म सौंदर्यदृष्टि असलेला माणूस बहुधा पोलिसखात्यांत शिरत नाहीं; शिरला तर टिकत नाहीं, आणि टिकला तर त्याची सौंदर्यदृष्टि त्या खात्यांत टिकणार नाहीं! तेव्हां एखाद्या अज्ञात किंवा नव्यानंच जन्माला आलेल्या कालिदासाला किंवा शेक्स्पीअरला लोकांपुढं येऊं द्यावा कीं नाहीं हें ठरविण्याची सत्ता असल्या माणसांच्या हातीं देणं समाजाच्या दृष्टिनं धोक्याचं आहे. आपले सनातनी संततिनियमनाला विरोध करतांना म्हणतात तेंच मी या वाङ्मनियमनाबाबत म्हणतों — '

'काय?'

'कीं शेंकडों नालायक किंवा नको असलेले लोक संततिनियमनामुळं जन्माला येत नसतील, पण त्यामुळं एखादा शककर्ता महापुरुष किंवा ब्रह्मवेत्ता संत जन्माला यायचा राहून जायचा! वाईट पुस्तकांनीं समाजाचं थोडं-बहुत नुकसान होईल, पण एकंदरींत समाज इतका दणकट आहे कीं असलीं पुस्तकं आणि चित्रं शतकानुशतकं पचवून तो उरला आहे. हीं पुस्तकं आणि चित्रंच नष्टप्राय झालीं आहेत. पण कायदा केला तर आमचा एखादा कालिदास किंवा शेक्स्पीअर मात्र जन्मापूर्वीच मारला जायचा. आणि समाजाचं अतोनात नुकसान व्हायचं.'

'आहे खरं असं!' तो मित्र उद्गारला.

# १

## शिकणारे आणि शिकवणारे

*

एका महाविद्यालयांत शिक्षक किंवा प्राध्यापक म्हणून मी कित्येक वर्षे काम करतों आहें. या कामांतल्या कांहीं मौजा मीं सांगाव्या, असं मला सांगण्यांत आलं आहे. ज्ञानदान हें शिक्षकाचं काम, आणि ज्ञानग्रहण हें विद्यार्थ्यांचं काम. साहजिकच ज्ञान देणाराला सर्वच ज्ञान आहे असं ते त्याच्याकडून घेणारांना — विद्यार्थ्यांना वाटतं; पण कुणी कितीहि विद्वान् असला तरी त्याला सर्वच ज्ञान असणं शक्य नाहीं. विद्यार्थ्यांच्या शिक्षकाबद्दल कांहींहि कल्पना असल्या तरी शिक्षकानें आपल्या मर्यादा ओळखणं आणि विद्यार्थ्यांसमोर त्या प्रांजळपणें कबूल करणें हें केव्हांहि उत्तम. नाहीं तर एखादे वेळीं फजितीची पाळी यायची. माझा एक अनुभव इथं सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. आठ-दहा वर्षांपूर्वीं प्राध्यापक म्हणून एका कॉलेजांत काम करावयाला मीं नुकतीच सुरुवात केली होती. आठ-वड्यांतले कांहीं दिवस मी शिकवीत असे. एके काळीं फार प्रसिद्ध असलेल्या एका मराठी लेखकाचा एक लघुकथा-संग्रह बी. ए. च्या विद्यार्थ्यांना त्या वर्षी अभ्यासाकरितां होता. दहा-पंधरा वर्षांपूर्वी मीं त्या लघुकथा वाचल्या होत्या, आणि मला त्या फार आवडल्याहि होत्या. पण त्या काळांत कॉलेजांतून नुकताच बाहेर पडलेला मी एक विद्यार्थी होतों, आणि वाङ्मयाचा मीं फारसा चिकित्सकपणें अभ्यासहि केलेला नव्हता. त्यानंतर लघुकथा या वाङ्मय-प्रकाराचा मीं खूपच

अभ्यास केला आणि उत्कृष्ट लघुकथा कशी असावी, यासंबंधीं माझीं कांहीं मतेंहि बनलीं. त्यानंतर हा लघुकथा-संग्रह कॉलेजांत शिकवायला घेण्यापूर्वीं काळजीपूर्वक वाचण्याचं मीं ठरवलं होतं; पण दुसऱ्या टर्ममध्यें तें पुस्तक घ्यायचं होतं म्हणून टर्मच्या आधीं मीं त्याकडे लक्ष दिलं नव्हतं. पहिल्या टर्ममध्यें वर्गांत गेल्यावर विद्यार्थ्यांनीं आग्रह केला कीं तें लघुकथांचें पुस्तकच पहिल्या टर्ममध्यें मीं घेऊन टाकावं. मीं ती गोष्ट मान्य केली, आणि त्या तासाला बोलायला सुरुवात केली. एक तास पाऊण तास बोलण्याइतकी त्या लेखकाची मला माहिती होती, आणि त्याच्या लघुकथाहि दहा-पंधरा वर्षांपूर्वी मीं एकदां वाचलेल्या होत्या. मीं विचार केला, या तासाला त्या पुस्तकासंबंधीं सर्वसामान्य माहिती सांगावी आणि मग पुढल्या आठवड्यांत पुन्हा दुसरा तास घेण्याआधीं एक आठवडाभर त्या पुस्तकाचा चांगला अभ्यास करून जावं. त्याप्रमाणें त्या पुस्तकाची माहिती त्या तासाला मीं सांगितली, आणि दहा-पंधरा वर्षांपूर्वीं केलेल्या वाचनाच्या जोरावर त्या लघुकथांची भरमसाट स्तुतिहि केली. पुढें दुसरा तास घेण्यापूर्वीं त्या आठवड्यांत मी तें पुस्तक काळजीपूर्वक वाचूं लागलों तेव्हां दहा-पंधरा वर्षांपूर्वीं बनविलेलं मत अगदीं चुकीचं आणि उथळ होतं असं मला आढळून आलं. त्या पुस्तकांतल्या बऱ्याच लघुकथा अगदींच सामान्य आणि लघुकथेच्या कसोटीला मुळींच न उतरण्यासारख्या होत्या. पहिल्या तासाला तर मी त्या लघुकथांची भलतीच स्तुति करून बसलों होतों! आतां मी जर त्यांना वाईट म्हणूं लागलों तर विद्यार्थी मला समजतील तरी काय, असा विचार माझ्या मनांत आला. कांहीं झालं तरी खरं काय तें सांगून टाकायचं मीं ठरवलं आणि विद्यार्थ्यांनाहि तें फार आवडलं. दुसऱ्या तासाला वर्गांत गेल्याबरोबर 'तुम्हांला एक गंमत सांगायची आहे' अशीच मीं सुरुवात केली; आणि नंतर दहा-पंधरा वर्षांपूर्वी त्यांच्यासारखाच विद्यार्थी असतांना तें पुस्तक वाचून माझं जें मत झालं होतं तें पहिल्या तासाला पुन्हा पुस्तक न वाचतांच मीं सांगितलं होतं वगैरे त्यांना स्पष्ट सांगून टाकलं, आणि त्या पुस्तकाची चिकित्सक दृष्टीनं चर्चा करायला प्रारंभ केला.

आपणाला एखादी गोष्ट माहीत नसली किंवा एखाद्या बाबतींत आपण अज्ञानी असलों तर शिक्षकानं विद्यार्थ्यांना विश्वासांत घेऊन तसं स्पष्ट सांगून टाकावं, असं माझं मत आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारचा कमीपणा नाहीं. तसं

न केल्यास मात्र एखादे वेळीं फजितीचा प्रसंग ओढवतो. मी शाळेंत असतांना अशा शिक्षकाची आम्हीं केलेली गंमत मला आठवते. जॉमेट्रींतलं एखादं कठीण उदाहरण आम्हीं त्या शिक्षकांना विचारलं कीं तें कोणाच्या जॉमेट्रींतलं आहे म्हणून ते विचारायचे आणि उद्यां तें समजावून सांगतों असं सांगायचे. त्या काळांत तीन-चार जॉमेट्रीवरील पुस्तकें प्रसिद्ध होतीं. या सर्व पुस्तकांच्या ' कीज् 'हि उपलब्ध होत्या म्हणतात. ही गोष्ट आम्हांला माहिती नव्हती. पुढें आम्हांला कळलें कीं या मास्तरांच्या घरीं जॉमेट्रीच्या ' कीज् ' आहेत. म्हणून ते पुस्तकाचें नांव विचारायचे आणि उद्यां सांगतों म्हणायचे. आम्हांला कठीण वाटणारं उदाहरण अर्थात कुठल्या तरी एका पुस्तकांतलंच असायचं. त्यावर्षी आम्हांला टेनिसनचं ' लान्सेलॉट अँड एलन ' हें काव्य इंग्लिशला होतें. जॉमेट्रीच्या मास्तरांना इंग्लिश वाङ्मयाचा गंधहि नाहीं हें आम्हांला माहीत होतं. एक कठीण उदाहरण आम्हीं त्यांना विचारलं. नेहमींप्रमाणें, हें कुठल्या जॉमेट्रीच्या पुस्तकांतलं आहे असा प्रश्न त्यांनीं केला. आम्ही तावडतोब नांव ठोकून दिलं कीं ' लान्सेलॉट अँड एलन 'च्या जॉमेट्रींत हें उदाहरण आहे. ते एकदम चमकले. त्यांनीं हें नांव ऐकलं नव्हतं. ' लान्सेलॉट अँड एलन 'ची जॉमेट्री ? हे कोण बुवा नवीन ! ' असं कांहीं तरी पुटपुटत ते वर्गाबाहेर गेले. मास्तरांच्या खोलींत गेल्यावर त्यांच्यानं राहवेना. ' ' लान्सेलॉट अँड एलन ' ची ही कुठली नवीन जॉमेट्री बुवा ', असं कांहीं तरी ते तिथं बोलले असावे असं वाटतं. कारण दुसऱ्या इंग्लिशच्या तासाला इंग्लिशचे मास्तर आल्याबरोबर त्यांनीं आम्हांला विचारलं, ' काय रे, ' लान्सेलॉट अँड एलन 'ची जॉमेट्री आहे म्हणून कुणीं रे सांगितलं त्या मास्तरांना ? ' आम्हीं वात्रटपण केला होता, हें इंग्लिशच्या मास्तरांच्या लक्षांत आलं होतं आणि शिक्षकांच्या खोलींत ' लान्सेलॉट अँड एलन 'ची ही जॉमेट्री कुठली असं गंभीरपणें गणिताच्या मास्तरांनीं विचारलं असेल तेव्हां तिथं एकच हंशा पिकला असणार याचीहि मला खात्री आहे.

एखादा वात्रट विद्यार्थी एखादे वेळीं शिक्षकांवर इतक्या हुशारीनें मात करतो, कीं त्याचं कौतुक करावंसं वाटतं. कॉलेजांत शिकवायला सुरुवात केली तेव्हां कांहीं दिवस मराठीबरोबर पहिल्या वर्षाचं संस्कृतहि मी घेत असे. वर्गांत

एक वात्रट विद्यार्थी होता; आणि पुस्तकांतला शृंगाररसाचा भाग शिकवितांना जरा जास्त रंगवून शिकवलं कीं कांहींतरी प्रश्न विचारून तो आणखी गंमत करायचा. एकदा एक श्लोक मला शिकवायचा होता. त्या श्लोकांतल्या एका संस्कृत शब्दाचा अर्थ संस्कृतमध्यें फारच सोज्वळ होता; पण मराठींत त्या शब्दाचा अर्थ अत्यंत अश्लील होता. हा शब्द आला कीं तो वात्रट मुलगा कांहीं-तरी आचरटपणा करून वर्गांत हंशा पिकवणार याबद्दल माझी खात्री होती. आणि तसं न होऊं देण्याची खबरदारी त्या दिवशीं मीं घेण्याचं ठरवलं होतं. पण त्या मुलानं त्या दिवशीं माझा चांगलाच पराभव केला वर्गांत शिरतांनाच मी अगदीं उग्र चेहरा करून आंत गेलों. गेल्याबरोबर सर्वांना गप्प राहण्याबद्दल जोरानं दरडावलं. तो वात्रट मुलगा शेजारच्या मुलाबरोबर कांहींतरी बोलत होता. तेवढंच निमित्त करून त्याच्यावर मी चांगलाच खेंकसलों; आणि एवढी पूर्वतयारी करून तो श्लोक गंभीरपणें शिकवायला सुरुवात केली. पहिला चरण सुखरूपपणें पार पडला. दुसऱ्या चरणांत तो भयंकर शब्द होता. त्याचा सोज्वळ संस्कृत अर्थ मीं सांगितला आणि मुलांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्यांनींहि तो गंभीरपणें ऐकून घेतला होता. कुणाच्या मनांत कांहीं आलं नव्हतं. त्या दिव्यांतून पार पडलों म्हणून श्वास सोडून पुढल्या चरणाकडे मी वळणार तोंच तो वात्रट मुलगा उभा राहून म्हणाला, ‘सर, वाईट शब्दांतून काय सुंदर अर्थ निघाला!’ इतकं बोलून तो खालीं बसला आणि वर्गांत एकच हंशा पिकला. त्याच्या त्या कोटीचा राग येण्याऐवजीं मीहि हंसू लागलों. माझ्या गंभीर-पणाचा त्यानं इतक्या सहज सफाईनं निकाल लावला होता कीं हंसून त्याचं कौतुक करण्याखेरीज मला गत्यंतरच नव्हतं.

पण एखादे वेळीं मात्र शिष्य गुरूवर चांगलीच मात करतो. माझ्या माहितींतल्या एका शाळा-मास्तरांनीं गेल्या महायुद्धांत शाळा सोडून लष्करांत नोकरी धरली होती. नवीनच लष्करांत शिरलेल्या माणसाला पहिले कांहीं महिने फार कडक शिस्तीवर धरतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ नानाप्रकारच्या कवा-यती त्या माणसाला कराव्या लागतात. त्या माणसाच्या नशिबीं कवाईत घेणारा जो अधिकारी आला तो त्याच्याच शाळेंतला कांहीं वर्षांपूर्वी गुंड म्हणून गाजलेला विद्यार्थी होता. तो विद्यार्थी असतांना या मास्तरांनीं त्याला अनेक वेळां कडक

शिक्षा केली होती. मास्तरांच्या आधीं कित्येक वर्षें लष्करांत शिरल्यामुळें साहजिकच लष्करांत तो गुरु आणि मास्तर शिष्य झाले होते. पूर्वी शाळेंत मास्तरांनीं केलेल्या सर्व छळाचा त्यानें लष्करांत चांगलाच सूड घेतला. वाटेल ते हुकूम सोडून भर उन्हांत छाती फुटेपर्यंत धांवायला किंवा भुईवर सरपटायला तो मास्तरांना लावीत असे. आणि बिचाऱ्या मास्तरांना तें सर्व निमूटपणें करावें लागत असे.

पण असे प्रसंग येण्याचा क्वचितच संभव आहे. त्याच्या उलट बरेच वेळां घडतें. आणि शिक्षकाच्या जीवनांत जे कांहीं थोडे सुखाचे येतात प्रसंग त्यांपैकीं हे दुसऱ्या प्रकारचे प्रसंग महत्त्वाचे होत, असं म्हणायला हरकत नाहीं. हे दुसऱ्या प्रकारचे प्रसंग म्हणजे शिक्षक जीवनाच्या सहाऱ्यांतले निर्मळ पाण्याचे झरे होत असं कुणींतरी म्हटलं आहे. आपला एखादा विद्यार्थी कुणीतरी मोठा माणूस — पंतप्रधान किंवा सरसेनापति झालेला असतो. एखाद्या सार्वजनिक समारंभाच्या वेळीं आपणाला पाहिल्याबरोबर सर्वांना सोडून तो आपणाकडे येतो आणि अदबीनें ‘ कसं काय, सर ? ’ म्हणून नमस्कार करतो, आणि तिथं जमलेले सर्व मोठे लोक एका गरीब शिक्षकाकडे मोठ्या आदरानें पाहतात. यांत त्या शिक्षकाला जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. आपला शिष्य मोठा व्हावा हीच शिक्षकाच्या कामांतली सर्वांत मोठी मौज होय !

■ ■ ■

# १०

## ' हात जोडले बुवा, साहेबापुढं ! '

*

पाश्चिमात्यांच्या चांगल्या संवयी पुष्कळ आहेत, आणि पौर्वात्यांच्या वाईट संवयी कांहीं कमी नाहींत; पण मला, बोलायला सांगितलंय् पाश्चिमात्यांच्या ज्या संवयी पाहून आपल्याला ' हात जोडले बुवा ! ' असं म्हणावंसं वाटतं, त्यांच्यावर. हा विषय निघाल्याबरोबर मला प्रथम कशाची आठवण झाली असेल, तर मी कॉलेजांत होतों त्या काळांतल्या एका प्रसंगाची. पाश्चिमात्य मिशनऱ्यांनीं चालवलेल्या एका महाविद्यालयांत मी शिकत होतों. विद्यालयांच्या वसतिगृहांतच मी राहात होतों. आम्हां विद्यार्थ्यांवर देखरेख करणारे वसतिगृहाचे प्रमुख एक उंच धिप्पाड आयरिश मिशनरी होते. वसतिगृहाच्या वरच्या मजल्यावरच ते राहात. दाढीवरून हात फिरवीत आयर्लंडच्या अनेक गमती ते आम्हांला सांगत. त्यांचा गमत्या स्वभाव आम्हांला फार आवडे. पण औपचारिक वागणुकीबाबतच्या त्यांच्या काटेकोरपणाचा आम्हां हिंदी विद्यार्थ्यांना केव्हां केव्हां भारी राग येई. एकदां मीं त्यांची अशी खोड मोडली, कीं त्यांनींच मनांत ' हात जोडले बुवा ! ' म्हटलं असेल !

मला त्यांच्याविषयीं फार आदर होता, आणि त्यांच्यांशीं बोलतांना, चालतांना माझ्या डोळ्यांत किंवा इतर हालचालींत त्यांना तो दिसत असलाच पाहिजे; पण या पाश्चिमात्यांना तेवढं पुरत नाहीं. वेळो-

वेळीं शब्दांत शिष्टाचार व्यक्त झाला पाहिजे. तरच त्यांना बरं वाटतं. एकदां सकाळीं माझ्या खोलीवरून ते जात होते. त्यांना पाहिल्यावर मी हंसलों, पण 'गुड मॉर्निंग, फादर' म्हणायचं राहून गेलं! दुपारीं कांहीं कामाकरितां त्यांच्या खोलींत मीं गेलों, तेव्हां सकाळीं माझ्या हातून घडलेल्या माझ्या प्रमादाची त्यांनीं मला आठवण करून दिली. मीं मनःपूर्वक दिलगिरी व्यक्त केली, आणि 'पुन्हा अशी चूक होणार नाहीं' म्हणून सांगितलं. पण मनांतून मला त्यांचा राग आला होता. विचार करतां करतां त्यांची एक गम्मत करायची मीं ठरवलं. वसतिगृह आणि कॉलेज यांच्यामध्यें फादर लोकांचं जेवणघर होतं. सकाळीं आठ वाजतां प्रातरुपाहारा-करितां ते खोलीबाहेर पडत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांच्या खोलीच्या दाराशीं कांहीं तरी निमित्त काढून मी जाऊन उभा राहिलों. ते बाहेर पडल्याबरोबर खणखणीत आवाजांत 'गुड मॉर्निंग, फादर!' म्हणून मीं ललकारी केली. पोरगा सुधारला, कालच्या चुकीची मनःपूर्वक भरपाई करतोय, असं त्यांना वाटलं. मोठ्या खुशीनं माझ्या पाठीवर हात फिरवीत, 'गुड मॉर्निंग, माय् बॉय्!' म्हणत ते पुढं निघून गेले. एक तासानं ते परत यायच्या वेळेला वसतिगृहाच्या दाराशीं मी घोटाळत होतोंच! ते दृष्टीस पडल्याबरोबर 'गुड मॉर्निंग, फादर!' मीं उद्गारलों. 'गुड मॉर्निंग्!' फारच खूश होऊन ते म्हणाले आणि आपल्या खोलीकडे निघून गेले.

दहा वाजतां मी कॉलेजांत गेलों. त्यांचा पहिला तास आमच्या वर्गावर नव्हता. पण त्यांचा पहिला तास ज्या वर्गावर होता, त्या वर्गाच्या दाराशीं तास सुटायच्या वेळेला मी दबा धरून उभा राहिलों.

तास संपवून हंसत हंसत ते बाहेर येत होते. माझ्यावर त्यांची दृष्टि गेल्या-बरोबर मीं 'गुड् मॉर्निंग, फादर'ची आरोळी ठोकली! आतां मात्र माझा वात्रटपणा त्यांच्या तावडतोब ध्यानांत आला. 'गुड मॉर्निंग, माय बॉय्! ॲन्ड नाउ इनफ् ऑफ् इट्!' असं माझ्या अंगावर ओरडून पाय आपटीत ते पुढं निघून गेले.!

'गुड मॉर्निंग', 'गुड ईव्हिनिंग' प्रमाणेंच अमके कपडे सकाळीं, तमके

कपडे रात्रीं, अमके जेवतांना, तमके झोंपतांना, हेंहि पाश्चिमात्यांचं मोठं शास्त्र आहे. इतर युरोपियनांनीं हें शास्त्र आतां पुष्कळ ढिलं केलंय्. पण ब्रिटिश साम्राज्याच्या प्रतिष्ठेची धुरा इमानें इतबारें वाहणारे बडे ब्रिटिश अधिकारी तें अजूनहि भक्तिभावानं पाळतात. ब्रिटिश-आफ्रिकेंत अधिकारावर असलेल्या एका कर्नलनं आपल्या नीग्रो नोकराच्या अत्यंत प्रामाणिक, पण निर्बुद्ध सेवावृत्तीचं एक उदाहरण आपल्या आफ्रिकेंतल्या अनुभवांसंबंधीं लिहितांना एके ठिकाणीं सांगितलंय्; तें वाचतांना तो नीग्रो नोकर निर्बुद्ध होता असं मला मुळींच वाटलं नाहीं. ब्रिटिशांच्या फाजील शिष्टपणाचा त्या बिचाऱ्या धोपटमार्गी नोकरावर झालेला तो स्वाभाविक परिणाम होता. तो विशिष्ट प्रसंग म्हणजे त्या नीग्रो नोकराच्या निर्बुद्धपणाचा नमुना नसून ब्रिटिश शिष्टपणाचं सहजासहजीं झालेलं उत्कृष्ट विडंबन आहे, हें कर्नलसाहेबांच्या लक्षांत आलेलं नाहीं. तो प्रसंग असा :

आफ्रिकेच्या दाट जंगलांत कांहीं दिवस शिकारीसाठीं तंबू ठोकून राह्यचं कर्नलसाहेबांनीं ठरवलं. कपडेलत्ते, शिकारीचं सामान वगैरे सर्व कांहीं व्यवस्थितपणें बरोबर घ्यायला त्यांनीं आपल्या नोकराला बजावलं. त्यानं प्रामाणिकपणें सर्व कांहीं बरोबर घेतलं. सर्व दिवसभर आफ्रिकेच्या भयंकर उन्हाळ्यांत शिकारीसाठीं वणवण फिरून साहेबमजकूर संध्याकाळीं परत आले. त्यांचं अंग भाजून निघालं होतं, आणि त्यांतून घामाच्या धारा निथळत होत्या. नोकरानं जेवण तयार करून ठेवलंच होतं. ‘ हात-पाय-तोंड धुऊन जेवायला येतों ’, असं सांगून कर्नलसाहेब पलीकडे गेले. ते परत आले तेव्हां नोकरानं त्यांना टॉवेल दिला, आणि संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं घालायचा गरम काळ्या कापडाचा पोशाक, कडक इस्त्रीचा शर्ट, कडक कॉलर वगैरे नम्रपणें त्यांच्यापुढं धरून तो उभा राहिला. ते कपडे त्यानं तयार ठेवलेले पाहून, साहेब म्हणतात, ‘ हंसावं कीं रडावं तेंच मला कळेना ! रात्र पडली तरी आगीचा डोंब आजूबाजूला पेटल्यासारखं उकडत होतं. अंगावर फोड यायचे बाकी उरले होते. नोकर आणि आपण यांच्याखेरीज त्या दाट जंगलांत आमचा शिष्टाचार पाहायला कुणीच नव्हतं. आणि हा माणूस प्रामाणिकपणें ते काळेकुळकुळीत गरम कपडे, तो इस्त्रीचा शर्ट आणि ती कडक कॉलर मीं घालावी म्हणून माझ्यापुढं धरून उभा होता !... ’

नों. क्र. ता. दि
वि. क्र.

साहेबमजकूर कांहीं म्हणोत, त्या नोकराचं कांहीं चुकलं होतं, असं मला मुळींच वाटत नाहीं. जंगलांत नसेल पण आफ्रिकेच्या शहरांत राहणारे ब्रिटिश अधिकारी आणि बडे लोक घामाच्या धारा वाहात असतांना सार्वजनिक समारंभांच्या वेळींच नव्हे तर, घरींसुद्धा रात्रीच्या जेवणाच्या वेळीं कपडे बदलून सशास्त्र 'डिनरसूट' घालूनच जेवायला बसतात. तसं न केलं तर ब्रिटिश साम्राज्याची प्रतिष्ठा धुळीला मिळेल असं त्यांना वाटतं. हा प्रकार दररोज, दर रात्रीं डोळ्यांनीं पाहणाऱ्या त्या बिचाऱ्या नीग्रो नोकराला, आजूबाजूला चिटपांखरूं नसलेल्या दाट जंगलांतसुद्धां आपला धनी 'डिनरसूट' घातल्याशिवाय जेवणाला स्पर्श करणार नाहीं, असं वाटलं तर त्यांत आश्चर्य काय?

कपड्यांचं काय, किंवा भावनांचं काय, फाजील प्रदर्शन करण्याची पाश्चिमात्यांची जी संवय आहे, तिचा केव्हां केव्हां मनापासून वीट येतो. पत्नीवर किंवा प्रेयसीवर अतोनात प्रेम करणं ही चांगली गोष्ट आहे; क्वचित्प्रसंगीं सार्वजनिक ठिकाणीं त्याचं मुग्ध प्रदर्शन होणंहि अपरिहार्य आहे. पण सार्वजनिक ठिकाणीं उठतां-बसतां पत्नीवर किंवा प्रेयसीवर चुंबनांचा वर्षाव करून आजूबाजूच्या लोकांना सळो कीं पळो करून टाकण्याची आवश्यकता आहे, असं मला वाटत नाहीं. पॅरिसच्या रेल्वेस्टेशनवरचा एक प्रसंग मला आठवतो. रात्रीच्या गाडीनं पॅरिसहून मार्सेल्सला जायला मी निघालों होतों. माझ्या शेजारीं एक फ्रेंच तरुण आणि त्याची पत्नी बसली होती. तो तरुण प्रवास करणार होता आणि त्याची पत्नी त्याला पोंचवायला आली होती. डब्यांत फारशी गर्दी नव्हती, पण त्या जोडप्याखेरीज मी आणि एक फ्रेंच म्हातारा एवढे उतारू होतोंच. गाडी सुटायला दहा-पंधरा मिनिटं होतीं. त्या दोघांच्या चुंबन-आलिंगनांना अगदीं ऊत आला होता. तो फ्रेंच म्हातारा हंसत हंसत डोळे भरून त्यांच्याकडे पाहात होता, आणि मी पौर्वात्य तरुण शक्यतों हातांतल्या पुस्तकांतून डोकं वर न करण्याचा प्रयत्न करीत होतों! गाडी केव्हां सुटते असं मला झालं होतं. गाडी सुटायची वेळ झाली, आणि एक दीर्घ चुंबन पुरं होऊन ती बाई डब्यांतून फलाटावर येऊन उभी राहिली. इतक्यांत काय झालं कुणाला ठाऊक, गाडी दहा मिनिटं उशिरां सुटणार म्हणून गार्डानं जाहीर केलं. — ही मात्र पाश्चिमात्यांची एक चांगली संवय आहे.

आपल्याकडे कोणत्याहि कारणानं गाडी कितीहि तास उशिरानं सुटणार असली तरी उतारूंना आपणहून स्टेशन-मास्तर किंवा गार्ड सांगत नाहींच; पण विचारलं तरी कुणी दाद देत नाहीं!... असो. गाडीला उशीर आहे कळल्याबरोबर त्या फ्रेंच तरुणानं डब्याबाहेर उडी टाकली, आणि फलाटावर बायकोच्या कमरेभोंवतीं हात टाकून तों उभा राहिला. गाडी सुटायच्या एक मिनिट आधीं तो डब्यांत चढला. शेवटच्या मिनिटाला तर त्यानं कहर केला! मी खिडकीजवळ होतों. गाडी हालणार, इतक्यांत माझ्या अंगावर आडवं पडून खिडकीजवळ आलेल्या आपल्या बायकोचं एक चुंबन त्यानं घेतलंच! मी गुदमरून जाऊं लागलों. मग मात्र माझा राग आवरेना. मीं त्याला एकदम ढकलून बाजूला केलं. तेव्हां तो बाजूला झाला, आणि खांदे उडवून हातवारे करीत माझी मनःपूर्वक माफी मागूं लागला. मला फ्रेंच कळत नसल्यामुळं अर्थात् त्याच्या चेहऱ्यावरून आणि हावभावांवरून मीं हें ताडलं. तो मिस्किल फ्रेंच म्हातारा आळीपाळीनं माझ्याकडे आणि त्यांच्याकडे पाहात मोठमोठ्यानं हंसत होता!

स्त्रियांचं वाजवीपेक्षां फाजील कौतुक करण्याची पाश्चिमात्यांना संवय आहे यांत शंका नाहीं. स्त्रीदाक्षिण्य, अबलांबद्दल सहानुभूति हें सर्व ठीक आहे; पण ट्रॅममध्यें किंवा बसमध्यें कोणत्याहि स्त्रीला प्रत्येक पुरुषानं उठून जागा दिलीच पाहिजे, या दंडकाचा अर्थ काय? तरुण दांडग्या पोरीला वयस्क म्हाताऱ्यानं कशाला उठून जागा द्यायची? म्हातारे कोतारे, अपंग, दुबळे यांना जरूर उठून जागा द्यावी, मग ते स्त्रीजन्माला आलेले असोत कीं पुरुष-जातींतले असोत. प्रख्यात इंग्लिश लेखक चेस्टर्टन हे अतिशय लठ्ठ होते. स्त्रीदाक्षिण्याचा अत्युच्च विक्रम साधणारा पुरुष म्हणून इंग्लंडमध्यें त्यांची ख्याति होती. कां? तर ते उठले म्हणजे तीन स्त्रियांना जागा होत असे! आमच्या गणूकाकांचीं या बाबतींत फार कडक मतं आहेत. एकदां मी आणि ते बसमधून कुठंतरी जात होतों. मध्यें एके ठिकाणीं एक चांगली दांडगी बाई बसमध्यें चढली. तिला बसायला जागा नव्हती. कांहीं म्हटलं तरी पाश्चिमात्य शिक्षणाचा थोडा तरी परिणाम आमच्यासारख्यांच्या मनावर झालाच आहे. त्यामुळं तिला जागा देण्याकरितां मी उठत होतों. गणूकाकांनीं डोळे वटारून माझ्याकडे पाहात माझा कोट घट्ट धरून ठेवला, आणि मला माझ्या जागेवर दडपीत ते

तोंडांतल्या तोंडांत गुरगुरले, 'कशाला उठतोय्स ? तिला काय धाड भरलीय् उभं राहायला ! पायांच्या तर चांगल्या तुळया आहेत तिच्या !'

पाश्चिमात्य एका टोंकाला जातात, तर गणूकाकांच्यासारखे आमचे पौर्वात्य दुसऱ्या टोंकाला जातात. ते स्वतःच्या बायकोशीं सार्वजनिक ठिकाणीं फाजील सलगी करतात, तर आमचे सनातनी रस्त्यावरून जातांना स्वतःमध्यें आणि स्वतःच्या बायकोंत इतकं अंतर ठेवतात कीं ती यांची कुणीच नव्हे असं लोकांना वाटावं ! थोड्याशा वजनाचीसुद्धां कांहीं वस्तु पाश्चिमात्य आपल्या बायकांना हातांतून नेऊं देत नाहींत; अगदीं जीव टाकून तें ओझं स्वतः वहायचा ते प्रयत्न करतात; तर आमचे पौर्वात्य पुरुषपुंगव मोठमोठीं गांठोडीं आणि अजस्र पेट्या आपल्या बायकांच्या डोक्यांवर देऊन आपण ऐटींत पुढं चालत असतात.

आपल्याकडच्या या पद्धतीसंबंधीं बोलत असतां आफ्रिकेंतल्या एका रानटी जमातीवर राज्य करण्याकरितां आफ्रिकेंत गेलेल्या एका युरोपियन अधिकाऱ्याची एक गोष्ट मीं गणूकाकांना सांगितली. त्या जमातीचा असा कडक नियम होता कीं, कोणत्याहि प्रकारचं ओझं पुरुषांनीं कधींहि वाहायचं नाहीं. कितीहि मोठीं ओझीं असोत, तीं बायकांनींच नेलीं पाहिजेत. तिथल्या बायका आपला हा धर्म शतकानुशतकं निमूटपणें पाळीत होत्या. हा ताज्या रक्ताचा तरुण पाश्चिमात्य, राज्यकर्ता म्हणून तिथं गेला आणि बायकांच्या डोक्यावर मोठमोठीं ओझीं आणि पुरुष मजेंत चाललेले, हें दृश्य पाहून त्याच्या स्त्रीदाक्षिण्यपूर्ण पाश्चिमात्य अंतःकरणाला धक्काच बसला. त्यानं ताबडतोब एक हुकूम काढून दुसऱ्या दिवसापासून सर्व ओझीं वाहण्याचं काम पुरुषांनींच केलं पाहिजे,—बायकांच्या डोक्यावर ओझीं दिसतां कामा नयेत, असं जाहीर केलं. सरकारचा हुकूम तेव्हां पुरुषांनीं ओझीं डोक्यावर घेतलीं. एक सत्कृत्य केल्याचं समाधान मानीत तो गोरा अधिकारी आपल्या बंगल्याकडे परत येतो, तों एक भयंकर दृश्य त्याच्या दृष्टीला पडलं : गांवांतल्या सर्व स्त्रिया त्याच्या आवारांत जमून मोठमोठ्यानं गळा काढून रडत होत्या, आणि जमिनीवर डोकीं आपटून घेत होत्या !— 'पुरुषांनीं ओझीं वाहण्याचं काम केलं तर आमचा धर्म बुडेल, देवाचा कोप होईल, आणि आम्ही सर्व नरकांत जाऊन पडूं, तेव्हां तुम्ही

आपला हुकूम मागं घ्या,' असं हंबरडा फोडून त्या बायका सांगत होत्या! तो तरुण अधिकारी बावरून गेला. त्या सत्याग्रहापुढं त्याला नमावंच लागलं.

ही गोष्ट ऐकल्याबरोबर आनंदातिशयानं जिभल्या चाटीत गणूकाका उद्गारले, 'धन्य धन्य त्या आर्य स्त्रियांची!'

मी म्हटलं, 'काका, त्या आर्य स्त्रिया नव्हत्या! आफ्रिकेंत कुठल्या आल्यात आर्य स्त्रिया?'

माझ्या अज्ञानाची कींव करीत गणूकाका म्हणाले, 'काळ्या रंगाच्या आणि लोंकरीसारख्या कुरळ्या केंसांच्या म्हणून त्या आर्य नसतील असं तुला वाटतं काय? ज्या अर्थी त्यांनीं अशा प्रकारचा सत्याग्रह केला, त्या अर्थी मुळांत त्या आर्यच असल्या पाहिजेत!'

'अहो, पण काका, कशा?' मी उद्गारलों.

'कशा म्हणजे काय?' ते म्हणाले, 'टिळक म्हणतात त्याप्रमाणं उत्तर-ध्रुवाकडून आर्य निघाले ते कांहीं भारतांत आले, कांहीं तसेच आफ्रिकेंत गेले असतील त्यांपैकीं. भयंकर उन्हानं हजारों वर्षं करपल्यामुळं त्यांची कातडी काळी पडली असेल आणि डोक्यावरले त्यांचे केंस जागच्या जागीं वळून खुर-टले असतील. तुझा एक लांब केंस काढून आगीवर धरून पाहा! ...'

माझं बोलणंच खुंटलं. गणूकाकांचा हा शोध मानववंशाचं संशोधन करणाऱ्या विद्वानांपुढं मी नम्रपणें ठेवतों. पाश्चिमात्यांच्या संवयीसंबंधीं बोलतां बोलतां गणूकाकांचा हा शोध कळला; आणि आतां मला विचारावंसं वाटतं, 'हात जोडले बुवा!' असं कुणाला म्हणूं? पाश्चिमात्य अतिशिष्टांना, कीं आमच्या आर्यपुत्र गणूकाकांना?

● ● ●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ११

## काय हा योगायोग !

*

कोणतीहि गोष्ट सांगतांना गणूकाका मुळीं सुरुवातच ' योगायोग काय पहा ' अशी करतात ! जगांत जें कांहीं घडतं तें सर्वच योगायोगामुळें घडतं असं त्यांचं ठाम मत आहे. सर्व कांहीं कर्ताकरविता ईश्वर आहे अशी त्यांची बालंबाल खात्री असल्यामुळें, जें जें कांहीं होतं तें त्याच्या इच्छेनेंच होतं असं त्यांना वाटतं आणि ते म्हणतात, ' तसा योगायोगच होता मुळीं ! ' पण असं म्हणतांना आपण एक वदतोव्याघात करतों आहोंत — एकाच वेळीं एकमेकांना रद्दबातल करून टाकणारीं विधानं करतों आहोंत, हें त्यांच्या ध्यानीं येत नाहीं. योगायोग असं आपण केव्हां म्हणतों ? जेव्हां त्या त्या घटनेचं तर्कशुद्ध कारण देतां येत नाहीं तेव्हां,—जेव्हां असं कां घडलं तें सांगतां येत नाहीं तेव्हां. असं जर आहे, तर मग परमेश्वराच्या इच्छेमुळें अमुक अमुक घडलं असं स्पष्ट कारण दिल्यावर त्यांत योगायोग तो काय उरला ?

गणूकाकांच्यासारखे जे निर्भेळ देववादी किंवा दैववादी आहेत त्यांची गोष्ट सोडा. जगांतल्या बऱ्याचशा गोष्टींची कारणमीमांसा करतां येते, बहुतेक कार्यांचं कारण दाखवून कार्यकारणभाव प्रस्थापित करतां येतो. म्हणूनच एखाद्या घटनेची कारणमीमांसा करतां आली नाहीं किंवा अगदींच क्षुल्लक कारणानें कांहीं तरी प्रचंड कार्य घडलं म्हणजे आपण ' काय बुवा योगायोग

तरी ! ' असं कांहीं तरी उद्गारतों ! अनपेक्षितपणें किंवा कल्पना नसतांना एखादी चांगली गोष्ट घडली म्हणजे 'योगायोग' हा शब्द वापरतों; तशाच परिस्थितींत पण वाईट गोष्ट घडली म्हणजे 'दैवगति' असं म्हणतों. दैवगति हाहि एक योगायोगाचाच प्रकार, दुसरं काय ? एखादे दिवशीं आपण एखाद्या मित्राला भेटायला जावं असा विचार मनांत आणतों, तोंच तो मित्र दत्त म्हणून दाराशीं येऊन उभा राहतो, किंवा एखादा गरीब कारकून आपणाला कधीं इंग्लंड-अमेरिका पाहायला मिळेल का असं सुखस्वप्न मनांत घोळवीत असतो आणि सर्वांना सोडून, त्यालाच एखादें दिवशीं साहेब विचारतो, माझ्याबरोबर तूं विलायतेला येतोस का ? — मला एक कारकुनाची फार जरूरी आहे ! — हे झाले योगायोग. दैवगतीच्या किंवा वाईट योगायोगाच्याहि अशा कांहीं नेहमींच्या अनुभवांतल्या गोष्टी सांगतां येतील. मला एका वैमानिकाची गोष्ट माहीत आहे. त्याचा एक जोडीदार आजारी पडला. त्याची जागा घेण्याची पाळी दुसऱ्याचीच होती. तो जायला तयारहि झाला. पण हा तरुण आपली पाळी नसतांनाहि पुढें होऊन म्हणाला, 'मी जातों, तूं घे स्वस्थ विश्रांति.' आणि त्याच दिवशीं विमानाला अपघात होऊन तो त्यांत ठार झाला. जणुं काय, मृत्यूशीं त्याचा संकेत — अपॉइन्टमेंट ठरली होती. आणि ती पाळल्याशिवाय त्याला राहवत नव्हतं. 'तुकाराम' बोट बुडाली, त्या वेळची अशीच एक गोष्ट मीं ऐकली आहे. दोन्ही प्रकारचे योगायोग त्या गोष्टींत आहेत. पंचवीस वर्षांच्या बोट कंपनीच्या आपल्या नोकरींत 'तुकाराम' बोटीच्या कप्तानानें एक दिवसहि कधीं रजा घेतली नव्हती म्हणतात. ज्या दिवशीं बोट बुडाली त्या दिवशीं क्षुल्लक आजाराच्या निमित्तानें रजा घेतली, आणि तो बचावला. हा झाला योगायोग. आणि त्याच्या जागीं बदली म्हणून त्या दिवशीं जो कप्तान गेला आणि बुडाला त्याची दैवगति, दुसरं काय ? तोहि योगायोगच !

क्षुल्लक कारणानें कांहीं प्रचंड घडामोडी झाल्या तरीहि आपण पुष्कळ वेळां योगायोगच म्हणतों. क्लिओपात्राच्या अलौकिक सौंदर्यामुळें सीझर, ॲंटनी यांच्या-सारखे वीरश्रेष्ठ पागल झाले, आणि त्यामुळें मोठीं युद्धें आणि प्रचंड ऐतिहासिक घडामोडी झाल्या. कुणींसं म्हटलं आहे कीं, या क्लिओपात्राचं नाक अर्ध्या इंचानें लांब असतं तर इतिहास वेगळाच झाला असता ! म्हणजे ती जर इतकी सुंदर

नसती तर हे इतिहास घडवणारे पुरुष पागल झाले नसते आणि पुढल्या घडामोडी टळल्या असत्या. दुसरी एका राजाची गोष्ट सांगतात. युद्धावर निघतांना त्याच्या घोड्याच्या नालेंतला एक खिळा निखळला. तो व्यवस्थित लावण्याचा राजानें आळस केला. पुढें युद्धाला तोंड लागलं तेव्हां घोड्याचा नाल निखळून पडला. नाल गेल्यामुळें घोडा पडला. घोड्यामुळें राजा खालीं आला. राजा पडलेला पाहून त्याचं सैन्य सैरावैरां पळूं लागलं. राजाचा युद्धांत पराजय झाला. एका खिळ्यामुळें युद्ध हातचं गेलं ! काय योगायोग !

एखादं स्वप्न खरं झालं म्हणजेहि ‘ काय योगायोग ’ ! असे उद्‌गार तोंडावाटे बाहेर पडतात. आपल्या एखाद्या मित्राचं लग्न ठरलंय आणि आपण त्याच्या लग्नाला जाण्याची तयारी करतों आहोंत असं स्वप्न सकाळीं पडावं आणि दुपारीं पोस्टाच्या शिपायानें त्या मित्राचं, ‘ माझं लग्न ठरलंय् — तूं आलंच पाहिजेस ! ’ अशा अर्थाचं पत्र आणून द्यावं. काय विलक्षण योगायोग असं आपण म्हणतों.

जेव्हां आपली मति चालत नाहीं, जेव्हां तर्कशुद्ध कारण देतां येत नाहीं, तेव्हां आपण आश्चर्यचकित होऊन ‘ काय योगायोग ! ’ असं म्हणतों. आपल्या मनांत मित्राला भेटण्याचा विचार येऊन तो आपणाला भेटायला यावा; किंवा तिकडे आपल्या मित्राचं लग्न ठरावं आणि इकडे आपणाला स्वप्नांत ती गोष्ट दिसावी; या घटनांचा परस्परसंबंध कांहीं दाखवतां येत नाहीं, — कार्यकारणभाव सांगतां येत नाहीं. पण माणसाला कारण शोधून काढल्याशिवाय चैन पडत नाहीं. त्याच्या या जिज्ञासेंतच त्याच्या प्रगतीचं बीज आहे. या जिज्ञासेमुळेंच विज्ञानाचा विकास झाला आहे. सामान्य मनुष्य योगायोग किंवा दैवगति म्हणून स्वस्थ बसतो. फार तर परमेश्वराची इच्छा किंवा भूतचेष्टा म्हणून योगायोगाची वासलात लावतो. पण शास्त्रज्ञ इतक्या सहजपणें स्वस्थ बसूं शकत नाहीं. तो तर्काला पटेल असं या योगायोग वाटणाऱ्या घटनाचंहि कारण शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा कांहीं प्रयत्नांची माहिती तुम्हांला उद्बोधक वाटेल याबद्दल माझी खात्री आहे. माझ्या मनांत विचार येतो, तसाच माझ्या मित्राच्या येतो, यांत केवळ योगायोग नसून विचारसंक्रमणाचं किंवा टेलिपथीचं शास्त्र आहे काय किंवा कांहीं स्वप्नं खरीं होतात, — पुढें होणारं आधींच दिसतं म्हणजे भविष्यकाळाचा पट विणून अगोदरच तयार असतो, — बहुतेकांना तो दिसत नसला

तरी कांहींना दिसतो. म्हणजे ' काळ ' हा पदार्थ तरी काय आहे किंवा कांहीं लोक तुमच्या मनांतला विचार सांगूं शकतात म्हणजे अंतर्ज्ञान किंवा क्लेअर-व्हॉयन्स अशी कांहीं शक्ति माणसाला आहे कीं काय वगैरे प्रश्नांचा कांहीं शास्त्रज्ञ कसून विचार करीत आहेत. त्यांना फारसं यश अजून आलेलं नाहीं, पण त्यांचे प्रयोग खूपच मनोरंजक आहेत. लंडन युनिव्हर्सिटीचं ' कौन्सिल ऑफ् सायकिकल रीसर्च ' नांवाचं स्वतंत्र खातं आहे. आणि त्यांत कांहीं नामांकित विद्वान् काम करीत आहेत.

मघांशीं, स्वप्नांत भविष्यकाळाचं दर्शन होऊं शकतं काय, या प्रश्नाचा मीं उल्लेख केला होता. या प्रश्नावर मि. जे. डब्ल्यू. डन् नांवाच्या एक विद्वानानें ' ॲन् एक्स्पेरिमेंट् वुइथ् टाइम् ' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. यांत त्यानें काळासंबंधीं एक नवीनच सिद्धान्त मांडला आहे. या विषयावर प्रयोग करण्याची प्रेरणा डनूला, त्याला पडलेलीं कांहीं स्वप्नं खरीं झाल्यामुळेंच झाली. एक-दोनदां असं झाल्याबरोबर डनूनें स्वप्न पडल्याबरोबर तें तसंच्या तसं तपशील-वार लिहून ठेवण्याचं तंत्र बसवलं. संवयीनें, स्वप्नं पडल्याबरोबर तो जागा होऊं लागला, आणि स्वप्नांची स्मृति अगदीं ताजी आहे तोंच तें सर्व स्वप्न लिहून ठेवूं लागला. अशा अनेक स्वप्नांचीं काळजीपूर्वक टांचणें ठेवल्यानंतर त्याच्या हळूहळू लक्षांत येऊं लागलं कीं आपल्या स्वप्नांत कांहीं अंश भूत-काळाचा आहे तर कांहीं भविष्यकाळाचा आहे. अशा तऱ्हेचीं स्वप्नं पडणं ही एक अपवादात्मक गोष्ट आहे कीं काय, आपणालाच कांहीं विशेष शक्ति आहे कीं काय हें तपासून पाहण्याकरितां डनूनें आपल्या चार-पांच मित्रांनाहि पडलेलीं स्वप्नं लिहून ठेवण्याचं आपलं तंत्र शिकवलं, आणि त्यांनींहि स्वतःचीं बरींच स्वप्नं लिहून ठेवलीं. त्या स्वप्नांचा अभ्यास केल्यानंतर डनूच्या ध्यानांत आलं कीं, अस्पष्टपणें कां होईना, पण भविष्याचा कांहीं अंश सर्वांनाच स्वप्नांत दिसणं शक्य आहे आणि तो तसा दिसतो. ज्या अर्थी भविष्याची अंधुक कां होईना, थोडी-बहुत कल्पना स्वप्नांत येऊं शकते, त्या अर्थी आपण ज्याला भविष्य म्हणतों तें आधींच सर्व ठरून गेलेलं — तयार झालेलं असतं हें उघड आहे. काळ म्हणजे अनंत पायऱ्या असलेला एक धांवता जिना. आपण या जिन्यावरून नेहमींप्रमाणें पुढें तोंड करून न चढतां जणुं काय पाठ

करून वर चढतों आहोंत आणि जिना पायांखालून सरकत खालीं जातो आहे. लंडनच्या टयूब-रेल्वेच्या स्टेशनांत असे घडघड घडघड सरकणारे जिने आहेत. ते पाहिलेल्या माणसाला या डनूच्या सरकत्या किंवा धांवत्या जिन्याची अधिक चांगली कल्पना येईल. पायांखालून पुढें सरकलेल्या पायऱ्या म्हणजेच भूतकाळ आपणाला दिसतो; पण आपण पाठ करून वर चढत असल्यामुळें पायांखालीं येऊं घातलेल्या पायऱ्या किंवा भविष्यकाळ आपणाला दिसत नाहीं. कांहीं स्वप्नांत आपण जणुं काय किंचित् मागें वळून पाहतों, आणि भविष्याचं थोडंसं दर्शन आपणाला होतं. डनूच्या या सिद्धान्ताप्रमाणें माणसाचा भविष्यकाळ आधींच तयार होऊन राहिलेला दिसतो. खरोखर असं जर असेल आणि माणसांना कधीं काळीं हा सिद्धान्त पटला तर कांहींहि करण्याकरितां हातपाय हलवण्याचं माणसं नाकारतील! मोठमोठींच कार्यें काय, पण लहानसहान कृत्येंहि माणसं करणार नाहींत. कराचयचं काय कांहीं करून? सर्व कांहीं तयारच आहे. काळ सरकेल तसं तें दिसणार आहे! यासंबंधीं डनूचं म्हणणं काय आहे तें मला माहीत नाहीं, आणि सध्यां तरी डनूचा हा सिद्धांत म्हणजे एक अभिनव कल्पना, —यापेक्षां अधिक कांहीं नाहीं, असंच विचारवंत समजतात. पण योगायोगासंबंधीं प्रयोग काय चालले‌त हें यावरून समजतं.

डनू याच्या सिद्धान्ताबद्दल कुणी कांहीं म्हणो, पण त्याचं संशोधन प्रामाणिक आहे याची कुणी शंका घेत नाहीं. काळ ही एक चमत्कारिक गोष्ट आहे खरी. भविष्य आधींच तयार असतं कीं नाहीं कुणाला ठाऊक, असं आपण म्हणूं,—पण भूतकाळ मात्र गेला तो गेलाच, पुन्हा दिसणं शक्य नाहीं, याबद्दल आपली खात्री असते. पण याहि खात्रीला धक्का देणारा थोडासाच पण विश्वसनीय पुरावा उपलब्ध झाला आहे. १९०१ सालीं मिस् मोबर्लें आणि मिस् जुर्दां नांवांच्या दोन इंग्लिश स्त्रिया पॅरिसजवळचा प्रख्यात व्हेर्सायच राजवाडा पाहायला गेल्या होत्या. व्हेर्सायचा हा राजवाडा आणि त्याच्याभोंवतालच्या बागा इतिहासप्रसिद्ध आहेत. १७८९ सालीं फ्रेंच राज्यक्रांति झाली, त्या वेळीं प्रख्यात राणी मारी आंत्वानेत् याच राजवाड्यांत राहात होती. १९०१ सालीं मिस मोबर्लें आणि मिस जुर्दां या ऐतिहासिक राजवाड्याच्या बागांतून फिरत असतां त्यांना एक विचित्र अनुभव आला. तो त्यांनीं 'ॲडव्हेंचर'

नांवाच्या एका लहानशा पुस्तिकेंत लिहून ठेवला आहे. अठराव्या शतकांतले म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळचे कपडे घातलेले स्त्रीपुरुष त्यांना त्या बागेंत दिसले, त्या काळचे कपडे घातलेला राजवाड्यांतला एक नोकर एका दारांतून बाहेर आला आणि त्यानें त्या बायांना हटकलंसुद्धां. बागेंत कांहीं पाण्याचे झरे आणि त्यावरले लांकडी पूलहि त्या बायांनीं पाहिले. हें पाहात असतांना त्या बायांना चमत्कारिक असं कांहीं वाटत नव्हतं. पण नंतर त्यांच्या ध्यानांत आलं कीं, राजवाड्याच्या बागेंत तसे झरे आणि लांकडी पूल सध्यांच्या काळीं मुळींच नाहींत. फार काय, ज्या दारांतून तो नोकर बाहेर येऊन त्यानें त्यांना हटकलं तें दार शेंपन्नास वर्षांपूर्वीच बुजवून टाकलेलं आहे !

या बायांनीं आपणाला दिसलं तें सर्व तपशीलवार लिहून काढलं आणि तें प्रसिद्ध केलं. त्या बाया कुणी अशा तशा साध्या-भोळ्या स्त्रिया नव्हत्या. ऑक्सफर्ड येथील 'सेंट् ह्यूज्' कॉलेजची एक भूतपूर्व प्रिन्सिपॉल होती तर दुसरी चालू प्रिन्सिपॉल होती. इतिहासांत वाचलेलं त्यांना डोळ्यांसमोर दिसून केवळ भास झाला असं म्हणावं तर त्यांनीं वर्णन केलेल्या कांहीं विशेष गोष्टी त्यानंतर कित्येक वर्षांनीं — पंचवीस-तीस वर्षांनीं इतिहास-संशोधकांच्या दृष्टोत्पत्तीला आल्या आहेत. त्या बाया गेल्या होत्या त्या काळांत त्या कुणाला माहीत नव्हत्या आणि इतिहासांतहि नमूद झालेल्या नव्हत्या ! या बायांच्या प्रामाणिकपणाची कुणींच शंका घेतलेली नाहीं. आणि तसं कांहीं कारणहि नाहीं. मग झालं काय ? १७८९ साल म्हणजे अठरावं शतक अजूनहि व्हेर्सायच्या राजवाड्यांत अदृश्यपणें घुटमळतंय आणि कांहीं चमत्कार होऊन त्या दोन बायांनीं चुकून विसाव्या शतकांतून त्या दोनशें वर्षांपूर्वींच्या काळांत पाऊल टाकलं आणि थोडा वेळ त्यांनीं तो काळ पाहिला ! रायगड पाहायला गेलेल्या आपल्या इथल्या एखाद्या प्रवाशाला शिवराज्याभिषेकाचा उत्सव असाच पाहायला मिळाला तर काय मजा होईल !

जगांत योगायोग नांवाची गोष्टच नाहीं, प्रत्येक घटनेला कांहीं तरी कारण असतंच हें सिद्ध करण्याची शास्त्रज्ञांची किती धडपड चालली आहे, ही गोष्ट या सर्व प्रयोगांवरून दिसून येते. या धडपडींतूनच माणूस जीवनावर अधिका-

धिक प्रभुत्व मिळवतो आहे, हें खरं; पण या धडपडींत माणसाला कधीं संपूर्ण यश मिळेल काय ? मी याहिपुढें जाऊन विचारतों, सर्वच कारणं कळलीं आणि योगायोग म्हणायला कांहीं उरलंच नाहीं, तर जीवनांत जगण्यासारखं कांहीं उरलं नाहीं म्हणून रडणाऱ्या शिकंदरासारखीच मनुष्य-जातीची अवस्था होणार नाहीं का ?

● ● ●

## १२

## माझीं मतं आणि शास्त्र

एका लेखकानं आपला एक मजेदार अनुभव सांगितला आहे. मला तो सर्वस्वीं पटतो. मला वाटतं तो सर्वांनाच पटेल. तो लेखक म्हणतो, 'मी एकदां एक रोगचिकित्सेचा ग्रंथ वाचण्याचा प्रयत्न करीत होतों. निरनिराळ्या रोगांचीं लक्षणं त्या ग्रंथांत दिलीं होतीं. ज्या ज्या रोगाचं म्हणून लक्षण वाचावं तो तो रोग मला आहे असं मला वाटायला लागलं ! मी पुरुष असल्यामुळं फक्त बाळंतरोग काय तो मला झालेला नाहीं याबद्दल माझी खात्री होती !'

माझाही असाच एक अनुभव आहे. अलीकडे मनोविश्लेषणशास्त्रावरचं मिळेल तें पुस्तक मी वाचतों. वाचून झालं कीं स्वतःचं मनोविश्लेषण करूं लागतों. मात्र स्वतःच्या मनाला बरं वाटेल इतकंच स्वतःचं मनोविश्लेषण मी करतों. खोलांत जात नाहीं. फार खोलांत कां जात नाहीं या माझ्या मनोवृत्तीचं दुसऱ्या कुणीं तरी मनोविश्लेषण करायला हवं ! आतां हेंच पाहाना. बहुधा मी एकदम कुणाला वाईट म्हणत नाहीं, हें माझ्या पुष्कळ मित्रांच्या ध्यानांत आलंय. मात्र म्हणून ते मला साधुपुरुष समजत नाहींत. कुणी म्हणतात, 'तूं भित्रा आहेस. कठोर सत्य स्पष्टपणें बोलायचं तुला धैर्य नाहीं.' त्यांचं म्हणणं अगदींच खोटं आहे असें मला वाटत नाहीं; आणि मनाला वाईट वाटतं. कुणी म्हणतात, 'तूं लबाड आहेस. अमक्याकडून आज ना उद्यां

तुझा कांहीं तरी फायदा होण्याचा संभव आहे, तेव्हां खरं बोलून तूं त्याला दुखवूं इच्छित नाहींस. ' याही म्हणण्यांत पुष्कळ वेळां मला थोडं तथ्य दिसतं; आणि मी दुःखी होतों. पण या सर्व दुःखाचा परिहार परवां कुणाचं तरी मनोविश्लेषणावरचं एक पुस्तक वाचतांना झाला. त्या हुशार ग्रंथकारानं लिहिलं होतं, माणूस एखादे वेळीं केवळ आळसानं खरं बोलत नाहीं. मला तें एकदम पटलं. काय करायचंय् एखादा वाईट आहे हें त्याला सांगून ? असलं खरं तर आतांच सांगितलं पाहिजे, असं थोडंच आहे ! आणि नाहीं सांगितलं तर काय मोठं आकाश कोसळून खालीं पडणार आहे ! माझे मित्र मला कमालीचा आळशी म्हणतातच. मग या बाबतींत मात्र मला भित्रा किंवा स्वार्थी ठरविण्यापेक्षां आळशी कां ठरवूं नये ? तें पुस्तक वाचल्यानंतर हे विचार सुचूं लागले तेव्हां मनाला हळूहळू बरं वाटूं लागलं.

याहीपेक्षां आणखी एक फारच चांगली गोष्ट त्या पुस्तकांत होती. ती म्हणजे नेहमीं अंतर्मुख होऊन स्वतःच मनोविश्लेषण करणारा माणूस, स्वतःच्या दोषांची जाणीव वाढत गेल्यामुळें दुसऱ्यांच्या दोषांकडे सहानुभूतीनं आणि उदार अंतःकरणानं पाहूं लागतो, असं त्या पुस्तकांत म्हटलं होतं. झालं तर. मी मनोविश्लेषणावरचीं पुस्तकं वाचतों. अंतर्मुख होऊन स्वतःचं मनोविश्लेषण करतों. मी स्वतः किती वाईट आहें ही जाणीव सारखी वाढूं लागते; आणि मग दुसऱ्यांना वाईट म्हणायला माझी जीभ धजत नाहीं ! मनोविश्लेषणशास्त्राचा विजय असो !

मनोविश्लेषणवाल्या फ्रॉइडप्रमाणेंच सापेक्षतावादी आइन्स्टाइननंही माझे प्रश्न सोडवून टाकले आहेत. आइन्स्टाइनचा सापेक्षतावाद जगांतल्या श्रेष्ठ गणितज्ञांपैकींही फारच थोडयांना नीट समजला आहे म्हणतात. पण मला जितका आइन्स्टाइन समजला आहे तितक्याचा मीं माझ्या समाधानाकरितां भरपूर उपयोग करून घेतला आहे ! काल, आज, आत्तां, नंतर हे शब्द जितका विचार करावा तितके किती अर्थशून्य आहेत हें आइन्स्टाइननं दिलेल्या या एकाच उदाहरणावरून पाहाना. आकाशांतले कांहीं तारे इतके दूर आहेत कीं, त्यांचं अंतर मैलांच्या आंकडयांत आपण सांगूं लागलों तर शून्यांनीं कागदच्या कागद भरून जातील. तेव्हां शास्त्रज्ञ तें अंतर प्रकाश-वर्षांच्या हिशेबानं सांगतात.

एका सेकंदाला प्रकाशाचा वेग एक लक्ष शहाऐंशी हजार दोनशें चौऱ्यांशी मैल इतका असतो. प्रकाशाइतका वेग साऱ्या विश्वांत दुसऱ्या कशाचाच नाहीं. एका सेकंदाला इतके मैल तर एका मिनिटाला किती, एका मिनिटाला इतके तर एका तासाला किती अशा हिशेबांत एका वर्षाचे मैल काढायचे, नी मग इतकीं प्रकाश-वर्षें अमका तारा पृथ्वीपासून दूर आहे असं म्हणायचं. काळानं स्थळाचं मोजमाप करायचं. या हिशेबानं आर्क्टरस हा तारा पृथ्वीपासून अडतीस प्रकाश-वर्षें दूर आहे; म्हणजे आर्क्टरस्‌चा प्रकाश पृथ्वीवर येऊन पोहोंचायला अडतीस वर्षें लागतात. दूरदर्शक यंत्रांतून आपण आर्क्टरस् पाहतों, आणि आतां, या क्षणाला आर्क्टरस पाहिला असं म्हणतों. आतां आर्क्टरसचे जे प्रकाश-किरण आपल्या डोळ्यांना जाणवले ते आर्क्टरस्‌कडून अडतीस वर्षांपूर्वी निघाले होते हा हिशेब आपणाला माहीत आहेच. याचा अर्थ इतकाच कीं, आतां जो आर्क्टरस आपण पाहिला तो अडतीस वर्षांपूर्वीचा होता! खरोखरच आतांचा, म्हणजे या क्षणाला असलेला आर्क्टरस् आपणाला आजपासून अडतीस वर्षांनीं म्हणजे एकोणीसशें ब्याण्णव सालीं दिसेल! आतां पाहिला, या बोलण्यांत काय बरं अर्थ उरला?

हाच विचार आपण एखाद्याला चट्‌दिशीं वाईट ठरवतांना करायला नको काय? आपल्या जवळचा माणूस वाईट कीं बरा हें ठरवायला आपणाला किती तरी वेळ लागतो. मग एखाद्या किंचित् परिचयाच्या, दूरच्या माणसाला आपण वाईट ठरवतों त्या वेळेला तो त्या वेळेचाच असतो काय? कदाचित् आपण त्याला वाईट म्हणतों त्या क्षणाला तो चांगलाही झालेला असेल! झालं तर. माझे मित्र म्हणतात तितका मीसुद्धां खास वाईट नाहीं. माझ्या मित्रांना शास्त्रज्ञांचीं हीं पुस्तकं वाचायला मी सांगणार आहें. मी स्वतः तर या शास्त्रज्ञांवर बेहद्द खूश आहें. शास्त्रज्ञांनीं जगाचं बरं केलंय् कीं वाईट, असा जोराचा वाद सध्यां चालू आहे. माझं शास्त्रज्ञांनीं चांगलंच केलंय् याबद्दल मला मुळींच शंका नाहीं!

• • •

# १३

## ' लहानपण दे गा देवा ! '

*

मोठीं माणसं जेव्हां ' लहानपण दे गा देवा ! ' असं देवाला आळवीत असतात तेव्हां लहान मुलांना मोठी गंमत वाटत असेल. खरोखरच या मोठ्या माणसांना लहानपण हवं, का उगाच आपलं हीं मोठीं माणसं कांहीं तरी सोंग करताहेत; असंच मुलांना वाटत असलं पाहिजे. स्वतःच्या अनुभवांवरून मी हें सांगतों. मी लहान असतांना ' रम्य तें बालपण. देइ देवा, फिरुन... ' किंवा ' लहानपण दे गा देवा ! ' असं एखाद्या मोठ्या माणसाला बोलतांना ऐकलं, कीं हा माणूस लबाड असला पाहिजे, असं मला वाटे. असं कां वाटे त्याचं कारण अगदीं स्पष्ट होतं. मी लहान असतांना मला लहानपण मुळींच हवंसं वाटत नसे. मला वाटतं, कुणाही लहान मुलाला, नको हें लहानपण — केव्हां एकदां मी मोठा होईन, असंच वाटत असलं पाहिजे मोठ्या माणसांच्या खिशांत हवे तेवढे पैसे असतात, त्यांना हवं तें खायला विकत घेतां येतं, पाहिजेत ते कपडे बाजारांतून आणतां येतात, पाहिजे तेव्हां बाहेर फिरायला जातां येतं, ' जाऊं का ' म्हणून कुणाची परवानगी घ्यावी लागत नाहीं, न विचारतां गेलं तरी कुणी रागावत नाहीं—कुणी कान पिरगाळीत नाहीं कीं कधीं कुणाच्या छड्या खाव्या लागत नाहीत. साहजिकच केव्हां एकदां मी मोठा होईन असं मला वाटत असे.

मोठया माणसांची प्रत्येक गोष्ट पाहून, काय मजा आहे या मोठ्यांची, असं मला लहानपणीं वाटत असे. मोठीं माणसं आपणांपेक्षां अधिक उंच असतात याचाही लहानपणीं मला हेवा वाटे. आपणाला हवी असलेली एखादी वस्तु फळीवर किंवा उंच कुठं तरी खुंटीला असावी आणि एखाद्या मोठ्या माण-साला ती 'काढून दे' म्हणून आपण सांगावं. 'आतां नाहीं देत, मग देईन' म्हणून त्यानं दम भरावा. असं कांहीं झालं कीं नको तें लहानपण असं मला होई, आणि 'मोठेंपण, लवकर एकदां दे गा, देवा!' असं मी मनांतल्या मनांत म्हणत असे. एवढया-तेवढयासाठीं लहानांना मोठ्यांच्या पुढें किती लाचार व्हावं लागतं! एकदां घरांतल्या एका मोठया माणसानं मला चांगलं चडवून काढलं, तेव्हां रागावून मी त्याला म्हणालों, 'थांब तूं, तुझ्याएवढा मोठा झालों कीं मीही तुला असाच मारीन!' माझे हे शब्द ऐकून तो मोठयांदा हंसूं लागला तेव्हां मी गोंधळून गेलों. तो म्हणाला, 'अरे, पण तूं माझ्याएवढा मोठा होशील तेव्हां मी तुझ्यापेक्षांहि मोठा होईनच कीं!' मी आपला वाढत जाणार, आणि तो मोठा माणूस मात्र आहे तेवढाच राहणार अशी माझी कल्पना! त्याच्या त्या उत्तरानं मी आणखीच लहानपणाविरुद्ध मनांतल्या मनांत चरफडूं लागलों.

या सर्व गोष्टींवरून कुणाच्याही लक्षांत येईल कीं लहानांना 'लहानपण दे गा देवा!' असं कधींच म्हणावंसं वाटत नाहीं. उलट, केव्हां एकदां देव आपणाला मोठेपणा देईल असंच लहानांना वाटत असतं. 'लहानपण दे, लहान-पण दे,' ही ओरड मोठीं माणसंच करीत असतात. काय मजा आहे पाहा! लहानांना मोठं व्हावंसं वाटतं, आणि मोठ्यांना लहान व्हावंसं वाटतं! बरो-बरच आहे. लहानपणीं मोठेपणाचे फक्त फायदे दिसतात, तोटे दिसत नाहींत. मोठेपणीं लहानपणांचे जे फायदे त्यावेळीं दिसत नव्हते ते दिसूं लागतात आणि लहानपणाचे तोटे किंवा लहानपणीं झालेला त्रास मात्र माणूस विसरून जातो. पण विसरून जातो, असंही म्हणतां येणार नाहीं. मोठीं माणसं जेव्हां 'लहान-पण हवं, लहानपण चांगलं' असं म्हणतात तेव्हां वर सांगितलेल्या लहानपण नकोसं वाटूं लावणाऱ्या गोष्टी तीं माणसं विसरलेलीं असतात, असं मला वाटत नाहीं. त्यांना त्यांची पुरी आठवण असते. 'लहानपण दे गा देवा,' असं तीं

म्हणतात तेव्हां मोठेपणीं होणाऱ्या सर्व त्रासांनीं तीं गांजून गेलेलीं असतात. आणि लहानपणांचे फायदे फक्त त्यांना हवे असतात.

थोडक्यांत सांगायचं म्हणजे मोठेपणाचे तोटे त्यांना नको असतात. लहानपण दे गा देवा, म्हणजे मोठेपणाचे फायदे जसेच्या तसे ठेवून देवानें त्यांना लहानपणाचेही सर्व फायदे द्यावे, अशी त्यांची देवाला प्रार्थना असते! पण देव कुणाचे कसले फाजील लाड करीत नाहीं. 'लहानपण तुम्हांला हवं ना? मग करूं तुम्हांला दोन फूट उंच? गाडींत चढतांना दुसऱ्या कुणीं तरी उचलून ठेवावं लागेल; नवा कोट पाहिजे असला तर रडून ओरडून दुसऱ्यांची मनधरणी करावी लागेल; लवकर उठलां नाहीं तर पाठींत धपाटा बसेल; विडी किंवा सिगारेट तोंडांत घेतली तर थोबाडींत मिळेल. बोला, देऊं का खरोखरच तुम्हांला लहानपण!' असं देवानं या लोकांना खडसून विचारलं, तर हीं मोठीं माणसं, 'हो चालेल; दे आम्हांला लहानपण' असं देवाला म्हणतील का? मला नाहीं वाटत.

हें लहानपण त्यांना नको असतं. मोठेपणाची चैन तशीच चालू ठेवून, उद्यांचा विचार करायला नको, पोटासाठीं काम करायला नको, ना कसले श्रम, ना कसली चिंता, ही लहानपणाचीही चैन त्यांना हवी असते. हें लहानपण देव कधींच कुणाला देत नाहीं. आणि देत नाहीं तेंच बरोबर आहे. तें मिळालं तर माणसाच्या कर्तृत्वाचा कारभारच आटोपेल. साधुसंत 'लहानपण दे गा देवा!' म्हणतात तेव्हां त्यांना हें लहानपण नको असतं. त्यांना लहान मुलाचं शुद्ध निर्मळ मन हवं असतं. आणि हें लहानपण देव त्यांना भरपूर देतो.

● ● ●

# १४

## लेखण्या, बंदुका, संत, सज्जन...

माझे एक तत्त्वज्ञानी मित्र आहेत. मोठे भले गृहस्थ आहेत ते. तत्त्वज्ञानावर त्यांचं फार प्रेम आहे. माझ्यावर त्यांची खूप माया आहे, आणि माझं भलं व्हावं असं त्यांना सदोदित वाटत असतं. परवां ते माझ्याकडे सहज कांहीं कामाकरितां आले होते. व्हाइटहेड् या प्रख्यात इंग्लिश तत्त्ववेत्याचं पुस्तक वाचीत मी बसलों होतों. माझ्या हातांत व्हाइटहेड्चं पुस्तक पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. बिघडलेला मुलगा बऱ्याच वर्षांनीं सन्मार्गावर आलेला पाहून एखाद्या बापाचा जसा चेहरा होतो तसा चेहरा करून ते एकदम म्हणाले, 'ठीक ठीक—असं कांहीं तरी वाचा आणि लिहा.'

'म्हणजे!' मी उद्गारलों.

'म्हणजे असं कीं तुमच्या त्या कविता आणि गोष्टी आतां खूप झाल्या. असं कांहीं तरी भरदार लिहा!'

त्यांच्या चेहऱ्यावरून आणि आवाजावरून मी गोष्टी आणि कविता लिहितों हें निश्चितपणें पापकृत्य किंवा गुन्हा नसला तरी फारसं कांहीं चांगलं नव्हतं, असं त्यांना वाटत होतं हें उघड होतं. इतके दिवस तसं स्पष्ट माझ्या तोंडावर सांगण्याचा त्यांना धीर झाला नव्हता; पण आज त्यांच्या आवडत्या व्हाइटहेड्चं पुस्तक माझ्या हातांत दिसल्याबरोबर त्यांच्या मनांतली रुखरुख एकदम बाहेर पडली.

त्यांच्याबद्दल मला अतिशय आदर असला तरी त्यांच्या त्या बोलण्यानं मीहि एकदम डिवचल्यासारखा झालों, आणि चटकन् उलटून म्हणालों, 'माझ्या गोष्टी-कविताच तुम्हांला वाईट वाटतात, कीं एकंदर गोष्टी-कविताच वाईट? आणि तत्त्वज्ञान, बोध, विचार असं कांहीं ज्यांत आहे तें लिखाण चांगलं, टिकावू, भरदार, असं तुम्हांला वाटतं?'

'छे छे, तसं नाहीं.' टाळाटाळीच्या स्वरांत ते म्हणाले, 'गोष्टी, कविता कांहीं वाईट नाहींत, पण —'

'पण —', मी म्हणालों, 'तत्त्वचर्चा अधिक चांगली, होय ना?'

'हो – असं म्हणायला हरकत नाहीं.'

'कालिदास, भवभूति, बाणभट्टापेक्षां कुणीही तत्त्वचर्चा करणारा लुंग्यासुंग्या अधिक चांगला, होय ना?'

'छे-छे-छे-छे, कालिदास-भवभूतींची गोष्टच वेगळी –' ते एकदम उद्गारले.

'म्हणजे, कांहीं वर्षांनीं – आम्हांला कालिदास-भवभूतिसारखें लोकांनीं श्रेष्ठ ठरवलें कीं पुढच्या जन्मीं तुम्ही आमच्या गोष्टी, कविता वाचणार किंवा न वाचतां का होईना, पण आम्हांला तत्त्वज्ञान्यांपेक्षां श्रेष्ठ–निदान बरोबरीचे तरी समजणार!'

'म्हणजे – माझं म्हणणं —' ते चांचरले.

'सांगतों तुमचं काय म्हणणं तें — आम्ही मंडळी गोष्टी-कवितांबरोबरच तुमचे तत्त्वज्ञानांचे ग्रंथ वाचतों, आणि गोष्टी-कवितांचं कार्य वेगळं, तत्त्वग्रथांचं किंवा ललितेवर वाङ्मयाचं कार्य वेगळं, आणि दोन्ही कार्यें आपापल्या परीनं महत्त्वाचीं आहेत हें ओळखतों. तुम्ही तत्त्वज्ञानाचा अहोरात्र व्यासंग करतां, पण आमच्याच काय, पण कालिदास-भवभूति किंवा शेक्सपीअर, टॉल्स्टॉयच्याही कविता-कादंबऱ्या मुळींच वाचीत नाहीं. कविता-कादंबऱ्या हें कांहीं तरी उथळ, क्षणभर करमणूक करणारं आहे असं समजतां. मात्र सर्व जगानं शेक्स्पीअर, कालिदासांना श्रेष्ठ ठरवलेलं असल्यामुळें, त्यांचं नांव काढलं कीं, वा–वा, त्यांची गोष्ट वेगळी असं म्हणतां! आमच्याबद्दल जें वाटतं तेंच त्यांच्याबद्दल तुम्हांला वाटतं. त्यांच्याबद्दल तसं म्हणण्याची तुम्हांला छाती होत नाहीं इतकंच.'

माझ्या भडिमारानं ते सर्दच झाले, पण हाडाचे सज्जन असल्यामुळें 'तुमच्या म्हणण्यांत त्ररंच तथ्य आहे' असं कांहीं तरी पुटपुटून कांहीं वेळानें ते निघून गेले.

या तत्त्वज्ञानी स्नेह्यांना गोष्टी-कवितांपेक्षां कांहींतरी तत्त्वगंभीर असं मीं लिहावंसं वाटतं, तर दुसरे एक माझे देशभक्त मित्र आहेत, त्यांना मीं गोष्टी-कविता लिहाव्या, पण त्यांच्यांतून कांहीं समाज-शिक्षणही देण्याचा प्रयत्न करावा असं वाटतं. हे मित्र त्यागी, देशभक्त आणि तळमळीचे जनता-सेवक आहेत, आणि विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे—त्यांना स्वतःला माहीत नाहीं पण ते एक उत्कृष्ट ललित लेखक आहेत. ते कोंकणांत गेले म्हणजे तिथल्या निसर्ग-सौंदर्याचं मला पाठविलेल्या पत्रांत ते जें वर्णन करतात किंवा आपल्या भावनांचं ते जें सूक्ष्म चित्रण करतात तें कसलेल्या ललित लेखकालाही क्वचितच साधेल असं असतं. तुमच्या निसर्गवर्णनांत आणि भावना चित्रणांत कांहीं समाजशिक्षण नाहीं, पण तें उत्कृष्ट ललित साहित्य आहे असं मी त्यांना नेहमीं म्हणतों, पण त्यांना तें मुळींच पटत नाहीं. तुमच्या पत्रांतले उतारे मी प्रसिद्ध करतों असं मी एकदां म्हणालों, तेव्हां 'याद राखून ठेव, पुन्हां तुला पत्र म्हणून लिहिणार नाहीं,' अशी धमकी त्यांनीं मला दिली!

ते मला एकदां म्हणाले, 'ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांची समाजशिक्षकांची परंपरा तुम्ही आजच्या कवींनीं नि लेखकांनीं चालवली पाहिजे.'

'तें ठीक आहे,' मीं म्हटलं, 'हे सर्वश्रेष्ठ कवि समाजशिक्षक होते यांत शंकाच नाहीं; पण कालिदास, भवभूति, शेक्स्पीअर, गटे यांनीं तुम्ही म्हणतां तसलं कांहीं समाजशिक्षण दिलेलं दिसत नाहीं. मग यांना तुम्ही चांगले कवि समजतां कीं नाहीं? त्यांची परंपरा आम्हीं चालवली तर तुमची कांहीं हरकत आहे का?'

'त्यांची गोष्टच वेगळी'! ते म्हणाले.

'म्हणजे, तुम्हांला असं का म्हणायचंय् कीं आमच्या गोष्टी-कविता भिकार असतात, तेव्हां असल्या भिकार गोष्टी-कविता खरडण्यापेक्षां समाजाला मार्गदर्शक होईल असं कांहीं तरी आम्हीं लिहावं? असं तुमचं म्हणणं असेल तर तें मी एक वेळ मान्य करीन, अर्थात् भिकार गोष्टी लिहिणारा समाजशिक्षणही

कितपत चांगलं करूं शकेल हा प्रश्नच आहे, — पण समाजशिक्षण न देणाऱ्या सगळ्याच गोष्टी-कविता, मग त्या आमच्या असोत कीं शेक्स्पीअर, कालिदासांच्या असोत, निरर्थक आहेत असं जर तुम्हांला म्हणायचं असेल तर — '

' तसं नव्हे, पण आज आपलं राष्ट्र, आपला समाज कसल्या स्थितींत आहे – तेव्हां — '

' कबूल ! कबूल ! समाजाला मार्गदर्शन पाहिजे, जनता साक्षर व्हायला हवी, खेड्यांतली घाण जावी, हीं सर्व अत्यंत महत्त्वाचीं आणि थोर कार्यें आहेत; पण त्यांचा लकडा कवि-कादंबरीकारांच्या मागें कां ? हीं कामें करायला त्यांच्यापेक्षां लायक लोक देशांत आहेत कीं ! '

यावर ते विशेष कांहीं बोलले नाहींत.

खरी गंमत अशी आहे कीं या सुस्वभावी सद्गृहस्थांनीं ललित वाङ्मयाचं मूलभूत कार्य काय याचा मुळींच विचार केलेला नसतो; आणि त्यांना प्रामाणिकपणें वाटत असतं कीं ललित वाङ्मय हें एक क्षणभर करमणुकीचं साधन आहे. समाज शिक्षक, तत्त्वज्ञानी किंवा देशभक्त यांच्या कार्याइतकंचे किंबहुना त्यांच्यापेक्षांही अधिक महत्त्वाचं आणि मोलाचं कार्य उत्तम ललित वाङ्मय करतं किंवा करूं शकतं याची त्यांना कल्पनाच नसते. ललित लेखकाचं आयुष्य केवळ उथळ करमणूक करण्यांत फुकट चाललं आहे तें त्यानं समाजशिक्षण देऊन किंवा तत्त्वज्ञान सांगून सार्थकी लावावं, अशी प्रामाणिक तळमळ या वाङ्मयाच्या हितचिंतकांना लागलेली असते. वाङ्मयाच्याच मागें हे सर्व हितचिंतक हात धुवून लागतात याचीं एक-दोन विशेष कारणं आहेत, असं मला वाटतं. पहिली गोष्ट अशी कीं इतर कलांची, – चित्रकला म्हणा, शिल्पकला म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कला म्हणा, – त्यांचीं साधनं त्यांच्या पुरतींच विशिष्ट असतात, इतरांचा त्यांच्याशीं कांहीं संबंध येत नाहीं. चित्रकारांचा रंग, कुंचला, शिल्पकाराची दगड हातोडी किंवा गाणाराचा सुरेल गळा हा त्यांचा त्यांनाच वापरतां येतो. ललित वाङ्मयाचं साधन जें भाषा तें सर्व व्यवहारांत सर्वच वापरतात, – ललित लेखक फक्त विशिष्ट प्रकारानें तें वापरीत असतो. शिव्या देणारा भाषा वापरतो, हिशेब ठेवणारा भाषा वापरतो, प्रेम करणारा भाषा वापरतो, तत्त्वज्ञानी वापरतो, समाजशिक्षक वापरतो, चोर वापरतो, साव वापरतो;

आणि ललित लेखकही भाषाच वापरतो. तेव्हां सर्व कांहीं ललित वाङ्मयानं करावं असं सर्वांना वाटतं !

दुसरं असं कीं, ज्ञानेश्वर, तुकाराम किंवा टॉल्स्टॉय, रोमाँ रोलाँसारखे थोर ललित लेखक संत आणि समाजशिक्षक होते. त्यांचं वाङ्मय जितकं थोर तितकंच त्यांचं चारित्र्य थोर आणि तितकंच त्यांचं समाजशिक्षणाचं कार्यही थोर. पण या बाबतींत आमचे हितचिंतक एक गोष्ट लक्षांत घेत नाहींत. हीं थोर माणसं तीन भूमिका सारख्याच यशस्वीपणें पार पाडणारीं थोर माणसं आहेत. त्यांनीं समाजशिक्षण दिलं नसतं किंवा ते संत नसते तरीही त्यांच्या वाङ्मयीन थोर गुणांनीं ते थोर लेखकच ठरले असते. पण हे लोक नेमके त्यांच्या वाङ्मयीन गुणांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या समाजशिक्षणामुळें किंवा त्यांच्या संतपणामुळें त्यांना थोर लेखक ठरवीत असतात ! इतकंच नव्हे तर केवळ लेखक असलेल्या इतरांना, – समकालीनांना उघडपणें आणि शेक्सपीअर, कालिदासांसारख्या प्राचीनांना मनांतून कमी लेखीत असतात. लिओनार्दो दा विंची हा विख्यात इटालियन चित्रकार उत्तम स्थापत्य-शास्त्रज्ञ, उत्तम शरीर शास्त्रज्ञ आणि उत्तम एंजिनीअरही होता म्हणतात. पण म्हणून त्यांच्या चित्रांशीं इतरांच्या चित्रांची तुलना करून ते एंजिनीअर नाहींत, केवळ चित्रकार आहेत, म्हणून त्यांचीं चित्रं कमी दर्जाचीं ठरवायचीं कीं काय ? अर्थात् एखाद्याच्या चारित्र्याचा किंवा त्याच्या सामाजिक कार्याचा वाङ्मयावर परिणाम होणार नाहीं, किंवा विंचीच्या चित्रकलेवर त्याच्या एंजिनीअरिंगच्या ज्ञानाचा किंवा शरीराच्या अभ्यासाचा परिणाम झाला नसेल असं समजायचं कांहीं कारण नाहीं. पण वाङ्मयाचा विचार करतांना वाङ्मयीन मूल्यांची आणि चित्रकलेचा करतांना त्या कलेच्या मूल्यांचीच कसोटी लावायला पाहिजे. शेक्सपीअर किंवा कालिदास संत होते किंवा नाहीं याची माहिती नाहीं, आणि आमच्या हितचिंतकांना हवं असलेलं समाजशिक्षण ' मेघदूतां 'त किंवा ' हॅम्लेट 'मध्यें सांपडत नाहीं म्हणून हे कवि टाकाऊ ठरवायचे काय ?

या बाबतींत एका थोर इंग्लिश लेखकानं मुद्दाम वादाकरितां आत्यंतिक भूमिका घेऊन एका हटवादी टीकाकाराला दिलेलं उत्तर सांगण्यासारखं आहे. तो टीकाकार म्हणाला, ' तुमच्या खिडकीसमोरच्या घराला आग लागली

तर त्या आगीच्या लाल, हिरव्या, निळ्या ज्वाळा पाहण्यांतच तुम्ही गुंगून जाल आणि आपल्या कादंबरींत आगीचं वर्णन करतांना त्या कशा रंगवाव्या याचा विचार करीत बसाल ?'

'अर्थात् !' तो लेखक म्हणाला, 'मी हेंच करीन. बादल्या भरून आग विझविण्याचं काम माझ्या हातून कांहीं नीटसं होणार नाहीं. उलट आग विझविण्याकरितां धांवधांव करणाऱ्या, त्या कामांत पटाईत असलेल्या लोकांना माझ्या बावळट लुडबुडीचा त्रास होऊन आग विझविण्यांत अडथळाच निर्माण व्हायचा. तेव्हां ज्या कामांत मी पटाईत आहें तें काम मी जर नीट केलं तर वाङ्मयांत आगीचं एक सुंदर वर्णन कायमचं राहील, आणि वर्षांनुवर्षे लोक त्याचा आनंद चाखतील !'

'देश पारतंत्र्यांत आहे तेव्हां लेखण्या टाकून बंदुका घ्या', असा संदेश लेखकांना सावरकरांनीं दिला तेव्हां माझ्या एका वात्रट मित्रानें अगदीं अशाच प्रकारचे उद्गार माझ्याकडे काढले होते. तो, म्हणाला 'तुम्हां लेखकांपैकीं एखादा लेखणी आणि बंदूक सारख्याच कुशलतेनें चालवूं शकत असेल; मी नाहीं म्हणत नाहीं; पण तुमच्यापैकीं शेंकडा नव्व्याण्णव लोकांची बंदूक सांवरतां सांवरतां त्रेधा-तिरपिट होईल; आणि स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या पटाईत सैनिकांना समोरच्या शत्रूला कांहीं वेळ तसाच सोडून वाटेल तशा बंदुका झाडून आपल्याच लोकांना जायबंदी करणाऱ्या तुम्हां साहित्यिक सैनिकांचा गोंधळ आवरावा लागेल ! त्यापेक्षां घरीं राहून चार चांगल्या कविता किंवा दोन चांगल्या गोष्टी लिहिल्यात तर स्वातंत्र्य-युद्धांतून जगूनवांचून आलेल्यांना वेळ तरी आनंदांत घालवितां येईल. अव्यापारेषु व्यापार करून हेंही नाहीं नि तेंही नाहीं असं करण्यापेक्षां, जे चांगलं येतं तेवढं केलंत तरी देशावर फार उपकार होतील !'

समाजशिक्षण, तत्त्वशोधन, स्वातंत्र्ययुद्ध, क्रांति, आगी विझवणं हीं सर्व थोर कार्यें आहेत, आणि ज्या लेखकाला जमतील त्यानं तीं अवश्य करावीं; पण ललित वाङ्मयाचं स्वतःच असं मूलभूत कार्य फार थोर आहे. आणि लेखकानं तेवढं केलं तरीही राष्ट्रासाठीं, समाजासाठीं, जनतेसाठीं त्यानं खूप केलं असं समजलं पाहिजे. आमचं साम्राज्य गेलं तरी बेहत्तर पण आमचा शेक्सपीअर

आम्ही गमावणार नाहीं असं इंग्रज लोक म्हणतात, तें उगाच नव्हे. आणि कालिदासानें आमच्या राष्ट्राची मान जितकी उंच करून ठेवली आहे तितकी कोणत्या समाजशिक्षकानं केली आहे ? सर्वांच्या वापरानं बुरसट झालेलं भाषेचं साधन चांगला ललित लेखक अशा कांहीं नव्या तेजानं वापरतो कीं माणसांच्या मनाची पुनर्घटना होते. माणसांचीं मनं समृद्ध, संवेदनशील आणि विशाल होतात. हींच मनं क्रांति, नीति, शिक्षण आकलन करूं शकतात, आणि पचवूं शकतात. क्रांति करणारांचीं, नीति सांगणारांचीं आणि शिक्षण देणारांचीं मनं, किंवा ज्यांच्यासाठीं क्रांति करायची, नीति सांगायची आणि ज्यांना शिक्षण द्यायचं त्या माणसांचीं मनं जर क्षुद्र, असंस्कृत, बोथट असतील तर क्रांतीची अपक्रांति होते, नीतीचा काळाबाजार होतो आणि शिक्षणाचा व्यापार होतो. खरा ललित लेखकहि अशा प्रकारचीं मनं घडवतो, म्हणजेच क्रांतीची क्रांति, नीतीची नीति, आणि शिक्षणाचें शिक्षण तो करीत असतो. अनेक क्रांत्या आल्या आणि गेल्या, नीतीचेही खूप प्रकार झाले आणि शिक्षणाच्या पद्धती बदलल्या, पण या क्रांत्यांचं; नीतीचं आणि शिक्षणाचं बीज जिथं रुजलं पाहिजे तें माणसाचं मन विशाल म्हणजेच क्रांतियोग्य, नीतियोग्य आणि शिक्षणयोग्य करण्याचं कार्य ललित वाङ्मयानं अनादि कालापासून चालवलं आहे आणि पुढेंही चालवीत राहील.

● ● ●

# १५

## मनाच्या ढाली

अतिशय सुस्वभावी, परोपकारी वृत्तीचे असे माझे एक मित्र आहेत, पण त्यांच्या एका गोष्टीचं मला नेहमीं आश्चर्य वाटतं. मला फक्त आश्चर्य वाटतं पण माझ्याइतकं त्यांना न ओळखणाऱ्या एखाद्या नव्या माणसाला ते गृहस्थ अगदीं उलट्या काळजाचे आहेत असं केव्हां केव्हां वाटेल. ते वागतातच तसे केव्हां केव्हां. आमच्या परिचयाचे एक गृहस्थ त्यांचा दम्याचा विकार बळावून एकाएकीं वारल्याचें एकदां आम्हांला कळलं.

त्याबरोबर माझे हे मित्र एकदम म्हणाले, ‘ हजार वेळां त्याला मीं सांगितलं असेल कीं तेवढा विडीचा नाद सोड म्हणून. एक संपली कीं दुसरी पेटवायचा. शेवटीं हें असं झालं. ’

त्यांच्या कचेरींतला एक कारकून हृदयक्रिया बंद पडून असाच एकदां वारला. त्याची हकीकत सांगतांना ते म्हणाले, ‘ हृदयक्रिया बंद पडून मरेल नाहीं तर काय ! पांचव्या मजल्यावर राहायचा. रोज पांच जिने चढायचे नि उतरायचे म्हणजे काय थट्टा आहे ! हृदयावर परिणाम होणारच. ’

धांवत्या बसमध्यें चढायचा प्रयत्न करतांना त्यांचा पुतण्या हात सुटून पडला आणि पायाचं हाड मोडल्यामुळें तीन महिने त्याला इस्पितळांत पडून राहावं लागलें.

‘ या लोकांचे पाय मोडायचेच. झाला एक दिवस ऑफिसांत उशीर तर साहेब काय फांशी देणार आहे ! सोडून द्यायची ती बस. ’

कुणाला अपघात झाला किंवा कुणी मेला तर आमच्याप्रमाणेंच आमच्या या मित्रालाही वाईट वाटतं. तो हृदयशून्य नाहीं याबद्दल माझी खात्री आहे; म्हणून तो असे कांहीं उद्गार काढी तेव्हां मला आश्चर्य वाटे. पण एकदां एक प्रसंग घडला आणि त्याच्या असल्या उद्गारांचं मला आश्चर्य वाटेनासं झालं. तो असं कां बोलतो त्याचा छडा मला लागला. छडा लागला असं मला तरी वाटतं. कुणी आणखी कांहीं वेगळं कारण सांगू शकेल. पण मला माझं कारण खरं वाटतं. माझा हा मित्र एका कचेरींत हेड् क्लार्क आहे. एकदां असं झालं कीं त्याच्या आजूबाजूच्या कचेऱ्यांतले दोन हेड क्लार्क आठ-पंधरा दिवसांच्या अंतरानं कांहीं ना कांहीं होऊन कैलासवासी झाले. कित्येक दिवस माझा हा मित्र बेचैन होता.

'अरे, असा घाबरल्यासारखा काय दिसतोस अलीकडे तूं?' मीं त्याला विचारलं.

'तसं कांहीं नाहीं रे,' तो पुटपुटला, 'पण हेड क्लार्कच एकामागून एक मरतात म्हणजे काय?'

त्याचे हे शब्द ऐकून माझ्या डोक्यांत प्रकाश पडूं लागला. त्याच्यासारखेच विडी-तंबाखू न ओढणारे, तळमजल्यावर राहणारे, चालत्या बसमध्यें चढण्याचा कधींही प्रयत्न न करणारे हेड् क्लार्क एकदम मरूं लागले, तेव्हां तो घाबरून गेला. इथं मरण्याचं कारण कांहींच देतां येईना. एकच कारण दिसत होतं; तें म्हणजे माणूस हेड् क्लार्क असणं! तेव्हां आमच्या मित्राची घाबरगुंडी उडाली. माझ्या ताबडतोब ध्यानांत आलं, कुणी मेला किंवा कुणी पडला कीं तो पटकन् तसं कांहींतरी कां बोलत असे. याचं कारण तो दुष्ट किंवा उलट्या काळजाचा होता असं नव्हे; तर कांहीं वाईट बातमी कळली कीं त्याला भीति वाटे आणि ती लपविण्याकरितां — स्वतःच्या भेदरून गेलेल्या मनाचं समाधान करण्याकरितां तो तसं कांहींतरी बोलून जाई. मी विडीतंबाखू ओढीत नाहीं, तेव्हां मला दमा होऊन मी मरणं शक्यच नाहीं; मी तळमजल्यावर राहतों, जिन्यांची चढउतार मुळींच करीत नाहीं, माझी हृदयक्रिया कशी बंद पडेल? मी धांवती बस पकडण्याचा कधीं चुकूनही प्रयत्न करणार नाहीं, मला अपघात होणारच नाहीं; असं कांहीं-तरी स्वतःच्या मनाचं समाधान तो करीत असावा. पण केवळ हेड् क्लार्क मरूं

लागले तेव्हां त्याची पांचावर धारण बसली ! बिचारा ! दोन हेड् क्लार्क एकदम वारले, हा केवळ त्याच्या नजरेला पडलेला योगायोग. किती तरी प्रकारचे लोक एका दिवशीं जगांत मरत असतात. विड्या ओढ ओढ ओढणारे मरतात, तसेंच विडीला स्पर्शही न करणारे दमा बळावून मरतात. तळमजल्यावर सारा जन्म काढणारेही हृदयक्रिया बंद पडून किती तरी मरतात. आणि अगदीं निश्चल बसमध्यें चढतां चढतांही पाय घसरून पडणारे आणि हाड मोडून घेणारे कांहीं कमी नाहींत !

पण माणसाचा स्वभाव असा आहे खरा. आमचा तो मित्र फार वेळां तसं कांहीं तरी बोलतो म्हणून तें लक्षांत येतं. पण आपण सर्वच जण केव्हां ना केव्हां, कळत अगर नकळत असंच कांहींतरी स्वतःचं समाधान करून घेत असतों. आपण वर्षानुवर्षं सकाळ ते संध्याकाळ घाम काढून काम करतों आणि जेमतेम पोटापुरतें मिळवतों. एखादा कांहीं तरी हातचलाखी करून एका दिवसांत आपण जन्मांत मिळवलं नाहीं इतकं मिळवतो आणि मग सुखानं राहात असलेला आपल्या दृष्टीला पडतो. आपण सर्व सभ्य पण दुःखी लोक लांब चेहरे करून गंभीरपणें एकमेकांना सांगतों, ‘पचायचे नाहींत त्याला हे हरामाचे पैसे. शेवटीं हाल हाल झाल्याशिवाय राहणार नाहींत. पापाचं प्रायश्चित्त मिळणारच.’

पुष्कळ वेळां सद्‌गुणी म्हणून नव्हे तर भित्रे म्हणून आपण पाप करीत नाहीं. पाप करणाराला जें सुख मिळालेलं असतं तें आपणांला हवं असतं. पण न मिळालेल्या द्राक्षांना आंबट म्हणणाऱ्या कोल्ह्याप्रमाणें त्या पाप करणाऱ्याला सुख मिळणार नाहीं; आणि आपण फार सद्‌गुणी असल्यामुळें पाप करूं इच्छित नाहीं, असं ठासून स्वतःच्या मनाला सांगून आपण आपलं असह्य जीवन सुसह्य करीत असतों.

याला फसव, त्याला फसव असं करून चैनींत राहणाऱ्या एका माणसाबद्दल मला भेटेल तो सांगत असे, ‘केव्हां ना केव्हां याचं बेंड फुटणार आणि हा फूटपाथवर पडणार पाहा.’

शेवटीं मी त्या सर्वांना एकदा सांगितलं, ‘हें पाहा, लांड्यालबाडया करून चैनींत राहणाऱ्या कित्येकांचीं केव्हां ना केव्हां बेंडं फुटलीं असतील, पण ज्यांचीं

शेवटपर्यंत फुटलीं नसतील असेही पुष्कळ होऊन गेले असतील. नाहीं नाहीं, म्हणतां या माणसानंच पंधरावीस वर्षे तरी आतांपर्यंत चारपांच जणांना टोप्या घालून मर्जेत काढलींच. फार तर आणखी पंधरावीस वर्षे त्याच्या आयुष्याचीं उरलीं असतील. कोट्यवधि माणसांनीं भरलेल्या या अफाट जगांत टोपी घालून घेणारे आणखी चारपांच बावळट त्याला सांपडणार नाहींत कीं काय ?'

माझी ही मीमांसा ऐकून ते बिचारे अस्वस्थ झालेले दिसले. त्यांचं सात्त्विक समाधान मी उगीच काढून घेतलं, असं आतां मला मनापासून वाटतं. पाप करण्याची ताकद असूनही पाप करीत नाहीं तो खरा सद्‌गुणी, हें अगदीं खरं आहे; पण भित्रेपणामुळें कां होईना, माणसं सदाचारी राहतात हेंही कांहीं वाईट नाहीं. शौर्याचा किंवा सदाचाराचा प्रश्न बाजूला टेवला तरी पदोपदीं नाना निराशांना तोंड देत धीमेपणानं जीवन जगणारीं सामान्य माणसं अधून मधून स्वतःची निरुपद्रवी फसवणूक करून आपलं जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांचं तें निरुपद्रवी समाधान काढून घेणारे आम्ही तरी अतिशहाणे कोण ? एका कवीनं म्हटलं आहे, 'माणूस श्वासोच्छ्वास करतो आणि म्हणतो, मी जगतों. काय वेडा आहे माणूस ! एक एक श्वास तो गमावत असतो म्हणजे खरोखर तो मरत असतो.' तर्कशुद्ध विचार करतां कविराज म्हणतात तें अगदीं खरं आहे. पण प्रत्येक श्वास सोडतांना मी मरतों असं माणूस म्हणायला लागला तर तो जगणारच नाहीं ! स्वतः कविराजही असा मंत्र अहोरात्र जपत नसतील याबद्दल माझी खात्री आहे !

● ● ●

# १६

## माझें आवडतें पान

*

'वृत्तपत्रांतलं तुमचं आवडतं पान कुठलं?' असा प्रश्न विचारल्याबरोबर एकदम 'जाहिरातींचं पान!' असं मी बोलून गेलों. पण 'कां?' असा पाठोपाठ दुसरा प्रश्न आल्याबरोबर मात्र मी बावरलों. 'कां' तें मला तरी कुठं माहीत होतं? आपणाला आवडणाऱ्या अशा अनेक गोष्टी आहेत कीं त्या आपल्याला कां आवडतात तें सांगतां येणं कठीण आहे. त्या आपणाला आवडतात खऱ्या. मग मी माझं मनोविश्लेषण करूं लागलों. खरंच, आपणाला जाहिरातींचंच पान विशेष कां आवडतं? मनोविश्लेषणशास्त्राचा मुख्य भर रोगाच्या अनेक वर्षांच्या इतिहासाचं संशोधन करण्यावर असतो. तेव्हां अगदीं लहानपणीं मी पहिल्यांदां वृत्तपत्र वाचूं लागलों तेव्हांपासूनच्या माझ्या आवडी-निवडींचा मी विचार करूं लागलों. आणि माझ्या विशेष आवडीचं कारण ताब-डतोब सांपडलं. लहानपणीं इतर मजकूर वाचणं आणि वाचला तरी समजणं अशक्य होतं. जाहिरातींचा बहुतेक मजकूर चांगला मोठ्या जाडजूड टाइपांत असतो, इतकंच नव्हे, तर निरनिराळ्या चित्रविचित्र टाइपांत तो असतो, आणि जाहिरातींत चित्रंही असतात. तेव्हां लहानपणीं तेंच पान मीं विशेष आवडीनं पाहावं, हें अगदीं उघड होतं. अगदीं कोंवळ्या बालमनांत रुजलेली ही आवड अर्थातच पुढें वयाबरोबर फोंफावत गेली. पाहालंत, मनोविश्लेषणशास्त्र किती सोपं आहे तें!

आतां यावर कुणी विचारील, तुम्ही लहानपणीं वर्तमानपत्रं वाचीत होतां किंवा निदान चाळीत तरी होतां ही थाप कशावरून नाहीं ? या प्रश्नाला उत्तर देणं कठीण आहे, हें मी कबूल करतों. एवढ्या लहानपणचे पुरावे कुठून आणायचे ? याबाबत तरी तुम्हीं माझ्या शब्दांवर विश्वास ठेवला पाहिजे. ज्या अनेक कारणां-स्तव घरांतलीं वडील माणसं माझ्या अंगावर खेंकसत असत त्यांपैकीं अभ्यासाचीं पुस्तकं सोडून वर्तमान-पत्र हातांत घेणं हें एक होतं, एवढं मला आठवतं. मात्र पुढं मोठेपणीं मी वृत्तपत्र-व्यवसायांत पडलों, तेव्हां लहानपणापासूनच मला वृत्त-पत्रवाचनाचा विलक्षण नाद होता, अशी थाप ठोकून देण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं, हें सांगून ठेवतों. मी मोठा झालों आणि कुणीं माझं चरित्र लिहिलं तर माझा चरित्रकार मात्र अशी थाप ठेवून देण्याचा संभव आहे. शिवाजी महाराजांचं चरित्र लिहावयाचं म्हणजे लहानपणीं इतर मुलं ' ट्यँव् ट्यँव् ' कर-तात तर महाराज पाळण्यांतच ' स्वराज्य ! स्वराज्य ! ' म्हणून रडत असत असं सांगायचं; किंवा मोठेपणीं अत्यंत निःस्पृह किंवा न्यायनिष्ठुर म्हणून विख्यात झालेले रामशास्त्री लहानपणीं गोट्या खेळतांनासुद्धां न्यायासाठीं झगडत, असं बेलाशक ठोकून द्यायचं, असा सर्वसाधारणपणें चरित्रकारांचा रिवाज आहे ! असो. सांगायचा मुद्दा हाच कीं, माझ्या अंगीं कसलाही मोठेपणा नाहीं; पण चित्रां-मुळं म्हणा, मोठ्या टाइपांमुळं म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळं म्हणा, मला लहानपणीं वर्तमानपत्रांतलं जाहिरातींचं पान आवडायचं, आणि आतांही इतर कारणांमुळं तें आवडतं.

पुढें शाळेंतल्या वरच्या वर्गांत गेलों आणि वर्तमान-पत्रांतल्या बऱ्याचशा गोष्टी समजूं लागल्या, तेव्हां वेगळ्याच कारणांकरितां जाहिरातींचं पान मला आवडूं लागलं. आतां सांगून टाकायला हरकत नाहीं. कांहीं जाहिराती वाचून माझ्या डोक्यांत एकदां एक छान कल्पना आली, आणि तिचा मीं भरपूर फायदा करून घेतला. पुष्कळ वेळां मी वाचीत असें,

' चि. गोविंदा यास, तूं कुठेंही असलास तरी असशील तसा घरीं निघून ये. पैसे पाहिजे असल्यास तसें कळव. आम्ही ताबडतोब पैसे पाठवूं. तुझी आई अंथरुणाला खिळली आहे. वडिलांनीं जेवण सोडलें आहे. तरी सर्व राग सोडून ताबडतोब घरीं निघून ये. आम्ही तुला

पुन्हा कधींही रागावणार नाहीं.'

मुलं पळून गेलीं म्हणजे वडील माणसं अगदीं सुतासारखीं सरळ येतात, ही गोष्ट असल्या प्रकारच्या जाहिरातींवरून माझ्या ध्यानांत आली. एखादे दिवशीं फार मार बसला म्हणजे मी ओरडून सांगत असें, 'पाहा त्या जाहिरातींतल्या गोविंदासारखा पळून जाईन.' मला वाटतं, ही धमकी द्यायला सुरुवात केल्यापासून दोन-चार धपाटे तरी मला कमी बसत असत. मात्र फार ताणल्यामुळं ही युक्ति पुढं फसली. एके दिवशीं विरोधी पक्षही चिडीला गेला, आणि मला स्पष्ट बजावण्यांत आलं, 'जा बघूं पळून. आम्ही कांहीं एक जाहिरात देणार नाहीं. म्हणे पळून जाईन; काळोखांत बाहेर पडायला सोबत लागते नि म्हणे पळून जाईन!' झालं. आमचा बार फुकट गेला!

याच वेळेला जाहिरातींच्या पानांत मला आणि माझ्या एक-दोन मित्रांना एक नवीनच खेळ सांपडला. आमच्या अंगांत तेव्हां देशभक्तीचं आणि ब्रह्मचर्याचं वारं संचरलं होतं. लग्न करणारे लोक हरामखोर आहेत, असं आम्हांला वाटत होतं. 'वधू पाहिजे. वराचं वय अमुक. सालीना उत्पन्न तमुक. गोत्र फलाणं, प्रवर अमुकतमुक.' वगैरे जाहिराती वाचल्या कीं आमच्या पायाची आग मस्तकांत जायची. अगदीं तिडीक यायची आमच्या डोक्यांत. त्यांत आणखी 'वर बिजवर. पहिल्या लग्नाचीं चार मुलें, घरदार आहे.' वगैरे बिजवरांच्या 'वधू पाहिजे' जाहिराती वाचल्या कीं आम्हा बालदेशभक्त अगदींच भडकून जायचे. देशाला आग लागलेली असतांना या लोकांना लग्न कशीं सुचतात, हें आम्हांला कळेना! या लोकांना ताळ्यावर आणण्याचा आम्हीं निश्चय केला. फार नाहीं पण एवढी तरी देशसेवा आपण करावी, असं आम्हीं ठरवलं. तेव्हां मला वाटतं, पोस्टकार्ड पैशाला एक मिळे. खाण्यासाठीं मिळालेल्या पैशांतून आठवड्याला तीन पैसे या कार्यासाठीं प्रत्येकानं खर्च करायचे, असं आम्हीं ठरवलं. दर शनिवारीं दुपारीं शाळा सुटल्यावर 'वधू पाहिजे' जाहिरातींतले पत्ते टिपून घेऊन आम्ही नऊ-दहा पोस्टकार्ड त्या पत्त्यांवर पाठवून देत असूं. पहिल्याच लग्नाची जाहिरात असल्यास, पुढील मजकूर आम्ही लिहीत असूं:

'सा. न. वि. वि. आपली अमक्या पत्रांतली 'वधू पाहिजे' जाहिरात वाचली. देशांत काय चाललं आहे. तुम्हांला कांहींच कळत

नाहीं ? या वेळीं लग्नं कसलीं करतां ? हा पापी विचार सोडून द्या, आणि देशासाठीं कांहीं तरी करा. तुमची मातृभूमि तुम्हाला हांक मारते आहे. कळावें, ही विनंति. तुमचे हितचिंतक,

वसंत, अनंत, बापू, बंडू वगैरे. '

त्रिजवराची जाहिरात असल्यास याहीपेक्षां उदात्त ध्येयं आम्ही त्या माणसापुढं मांडीत असूं :

'सा. न. वि. वि. अमुक पत्रांतली तुमची 'वधू पाहिजे' ही जाहिरात वाचली. वाचून अतिशय दुःख झालें. काय हें ! या वयांत आतां कशाला लग्न करतां ? आपलं सालीना उत्पन्न इतकं आहे म्हणतां, मग तें देशासाठीं किंवा गोरगरीबांसाठीं कां खर्चीत नाहीं ? हा भलताच विचार सोडून द्या. अगदींच वेळ जात नसेल तर कथाकीर्त-नाला जा किंवा घरींच हरिभजन करीत बसा. आपले हितचिंतक,

वसंत, अनंत, बापू, बंडू वगैरे. '

पत्रावर आमचा पत्ता नसे, किंवा खालीं सत्रंध नांवं नसत. तेव्हां या पत्रांचा काय परिणाम झाला, किती लोक लग्नाचा विचार सोडून देशभक्तीला किंवा ईश्वरभक्तीला लागले तें सांगतां येत नाहीं. पण आम्ही मात्र कांहीं तरी देशसेवा करीत आहोंत, असं मनःपूर्वक समजत असूं.

ही झाली शाळकरी वयांतली गोष्ट. याच जाहिराती आतां प्रौढ वयांत वाचतांना निराळीच गंमत वाटते. 'त्या त्या देशांतल्या वृत्तपत्रांतल्या नुसत्या जाहिराती पाहून तिथली समाजस्थिति मी सांगूं शकेन,' असं कुणीं तरी प्रख्यात समाजशास्त्रज्ञानं म्हटल्याचं मला आठवतं. अर्थात् त्यांच्या या म्हणण्यांत थोडीशी अतिशयोक्ति आहे, यांत शंका नाहीं. तरी पण या दृष्टीनं पाहतां आपल्या वृत्तपत्रांतल्या जाहिराती आमच्या समाजस्थितीवर विदारक प्रकाश पाडतात, हें कबूल केलें पाहिजे. 'वधू अव्यंग, निरोगी, गौरवर्ण, सुंदर पाहिजे'. अव्यंग, निरोगी वधू पाहिजे हें ठीक. पण जणूं काय हे जाहिराती देणारे सर्व अगदीं गोरेपान आणि सुंदर असतात ! गुरांच्या बाजाराप्रमाणें लग्नाच्या बाजा-राची आपल्याकडे स्थिति आहे, हें यावरून दिसून येतें. केव्हां केव्हां 'इंग्रजी बोलूं शकणारी वधू पाहिजे' अशीहि एखादी जाहिरात दिसते. इंग्रजी बोल-

ण्याचा आणि सुखी संसाराचा काय संबंध आहे, तें हे वरराजच जाणोत, पण परभाषेबद्दल जो एक अतिरिक्त आदर आमच्या कांहीं लोकांच्या मनांत उत्पन्न झाला आहे त्याची कींव येते.

पण याहीपेक्षां आश्चर्यकारक जाहिराती आणि त्या बहुधा उत्तर हिंदुस्थानांतल्या कांहीं पत्रांत मीं वाचल्या आहेत. वधूसंबंधींच या जाहिराती असतात. पैसे, घरदार, किंवा जवळचे कुणी नातेवाईक नसणाऱ्या एखाद्या सामान्य माणसाला बायकोसाठीं जाहिरात द्यावी लागली तर तें ठीक आहे; पण उत्तर हिंदुस्थानांतल्या पत्रांत 'आय्. सी. एस्. ला वधू पाहिजे. श्रीमंत पाहिजे, सुंदर पाहिजे.' वगैरे जाहिराती वाचून मात्र मति गुंग होते. आय्. सी. एस्. साठीं झालेला सर्व खर्च भरून काढण्यासाठीं हा खटाटोप आहे हें उघड आहे. टेंडरं मागवतात त्याप्रमाणें आय्. सी. एस. इतकं शिक्षण आणि दर्जा प्राप्त झालेल्या माणसानं वधूचीं टेंडरं मागवावीं हें वाचून खरोखरच लाज वाटते.

औषधांच्या जाहिरातींचं एकंदर प्रमाण पाहून वर उल्लेखिलेले समाजशास्त्रज्ञ फारच मजेदार निष्कर्ष काढतील याबद्दल माझी खात्री आहे. आतां अर्थात् चित्रपटांच्या जाहिरातींचेंच प्रमाण फार असतं. पण चित्रपट अस्तित्वांत येण्यापूर्वी जाहिरातींचं बहुतेक पान वज्रांगभैरव पाक, सुवर्णमालिनी वसंत, जवानमर्द मोदक वगैरेंच्या जाहिरातींनीं भरलेलं असे. इथले लोक भयंकर निःशक्त झाले आहेत आणि म्हणूनच ते स्वातंत्र्याला नालायक आहेत असा निष्कर्ष आमच्या उपरोल्लेखित समाजशास्त्रज्ञ महाशयांनीं काढला नाहीं म्हणजे मिळविली! बाकी मला मात्र कांहीं औषधांच्या जाहिराती फारच आवडतात. मला पोटाच्या अनेक व्यथा आहेत, तेव्हां या व्यथेवरल्या जाहिराती मी अगदीं तल्लीन होऊन वाचतों. 'अमुक गोळी रात्रीं झोंपतांना घ्या, सकाळीं उठल्याबरोबर तुम्हांला सर्व जग हर्षोत्फुल्ल दिसेल,' किंवा 'कां उगाच पोट धरून बसतां? मि. जोन्स जेवल्याबरोबर अमुक अमुक दोन गोळ्या घेतात आणि मग नाचत उड्या मारीत ऑफिसांत जातात!' या जाहिराती वाचतांना ललित वाङ्मयाविषयीं कुणींसं म्हटलं आहे त्याप्रमाणं माझी अगदीं सविकल्प समाधि लागते आणि क्षणभर मीहि जोन्सप्रमाणें नाचत, बागडत, उड्या मारीत आपल्या कामाला चाललों आहें असा मला भास होतो! निरनिराळ्या गोळ्या आणि वड्या यांच्या जाहिराती

वाचतांना, त्यांच्या गुणांचं वर्णन, अनुपानाच्या अटी वगैरे आत्मसात् करतांना जो कांहीं आनंद होतो तो फक्त पोटाची व्यथा असलेल्या माणसांनाच कळेल ! इतरांना कळणं शक्य नाहीं ! 'आंतड्यांतील श्लेष्मल त्वचेला इजा न करतां कोठ्यांतील पित्तरसाची उठावणी करा !' वगैरे लढाऊ घोषणा जाहिरातींत वाचल्या म्हणजे चित्त थरारून जातं; आणि बाहूंना—नव्हे, चुकलों—पोटांतील अवयवांना विलक्षण स्फुरण चढतं !

शेक्स्पीअरचीं नाटकं किंवा बायबल यांच्यासारखे अमोल ग्रंथ मनःपूर्वक वाचणारे लोक फारच थोडे असतात; पण अमेरिकन जाहिरातदारांनीं आणि वृत्तपत्रांनीं या थोर ग्रंथांची अगदीं एका साध्या युक्तीनं तमाम जनतेला गोडी लावली. उच्च वाङ्मय वाचणारे थोडे असतील, पण गोळ्या गिळणाऱ्या आणि मलमें लावणाऱ्या लोकांची जगांत खात्रीनं बहुसंख्या आहे. एक अमेरिकन कंपनी बायबलमधले मोठमोठे उतारे देऊन हळूंच त्यांतून आपल्या मलमाची जाहिरात करीत असे. उदाहरणार्थ, 'येशू ख्रिस्त म्हणतो कीं एका गालावर कुणीं चापट मारल्यास दुसरा गाल पुढें करा.' हें वाक्य या जाहिरातदारानं आपल्या जाहिरातींत उद्धृत करून त्यापुढं हळूच आणखी एक वाक्य जोडून दिलं : 'येशू म्हणतो कीं एका गालावर कुणीं चापट मारल्यास दुसरा गाल पुढं करा; पण तोंपर्यंत पहिल्या गालाला अमुक अमुक मलम चोपडा म्हणजे दुसरा गाल पुढं करावयाला तुम्हाला कांहीं एक वाटणार नाहीं !' दुसऱ्या एका कोल्डक्रीमच्या व्यापाऱ्यानं शेक्स्पीअरच्या 'रोमिओ ॲण्ड ज्यूलिएट्' या प्रख्यात नाटकांतला एक उतारा सचित्र दिला. ज्यूलिएट्च्या सौंदर्याला उद्देशून रोमिओनं केलेलं तें भाषण होतं. त्यांत फारसा फरक जाहिरातीकरितां त्यानं केला नव्हता. 'तूं अशी आहेस, तुझा चेहरा चंद्राहून सुंदर आहे.' वगैरे शेक्स्पीअरचीं सर्व वाक्यं त्यानं जशींच्या तशीं दिलीं होतीं. शेवटीं फक्त एकच वाक्य त्यानं अधिक घातलं होतं. 'पण तूं जर अमुक अमुक कोल्डक्रीम वापरशील तर त्याहूनही सुंदर दिसशील !'

पवित्र बायबल किंवा शेक्स्पीअरसारखा महाकवि यांना आपलीं मलमं आणि गोळ्या यांच्या खपासाठीं लोळविणारे हे जाहिरातदार पाहिले कीं एक विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. जाहिरातीचा उद्देश काय ? अमुक प्रकारची

वस्तु अमुक ठिकाणीं मिळते आणि तिचे अमुक उपयोग आहेत, हें सांगण्याचा. मग हीं भरमसाट आणि अतिरंजित वर्णनं जाहिरातींत कां देण्यांत येतात? वस्तु चांगली असली तर लोक एकमेकांना तिची शिफारस करूं लागतात आणि आपोआपच तिचा खप होतो. आकर्षक जाहिरात देणं ही गोष्ट वेगळी; पण वाचक – थोडीबहुत बुद्धिमत्ता असलेला वाचक – ज्यावर मुळींच विश्वास ठेवणार नाहीं अशीं भरमसाट वर्णनं कां? अर्थात् गुणांचा अभाव असल्यामुळं ओरडा-आरड करून, भलत्याच मुद्द्यांवर लोकांचं लक्ष वेधून आपली वस्तु खपविण्याचा हा अट्टाहास आहे, हें उघड आहे. रशियांत वस्तूचें उत्पादन उपयोगाकरितां होत असल्यामुळं–कसेंही करून नफा मिळविण्याकरितां होत नसल्यामुळं – तिथल्या वृत्तपत्रांत अशा प्रकारच्या जाहिराती मुळींच दृष्टीला पडत नाहींत. आमच्या चित्रपटांच्या जाहिरातींत ही पद्धति अगदीं पराकोटीला गेली आहे. नायकाचें काम करणारा एम्. ए., एल्एल्. बी. आहे, नायिका प्रख्यात वकिलाची मुलगी आहे, वगैरे गोष्टी जाहिरातींत वाचतांना खरोखरच मौज वाटते. भिकार अभिनय करणाऱ्या एम्. ए., एल्एल्. बी. चें प्रेक्षकांना सोयर-सुतक काय? नायिका वकिलाची मुलगी असण्याऐवजीं झाडूवाल्याची मुलगी असून ती जर उत्कृष्ट अभिनय करणार असेल तर प्रेक्षक तिच्या बापाचा विचार कशाकरितां करणार? मात्र प्रत्यक्ष चित्रपटापेक्षां या जाहिरातींनीं अधिक मनोरंजन होतं, हें कबूल केलं पाहिजे! आणि भाषेच्या संपत्तींत या जाहिराती केवढी भर टाकतात! 'दिलखेचक', 'हृदयफोडक', 'काळीजतोडक' हीं विशेषणं, चित्रपट नसते तर मराठी भाषेला लाभलीं असतीं काय! वृत्तपत्रांच्या बाकीच्या पानांत खूप कांहीं असेल, पण ही मजा जाहिरातींच्या पानांतच!

● ● ●

## १७

## ' मोठं, त्याहून मोठं ! '

एका छोट्या मुलासमोर मूठभर चॉकोलेटच्या वड्या धरून मी म्हणालों, ' यांतलं कुठलं पाहिजे तुला ? बदामाचं, पिस्त्याचं कीं साधंच ? '

त्यांतलं सर्वांत मोठं उचलून तो मुलगा म्हणाला, ' मला सर्वांत मोठं पाहिजे ! '

' काय गम्मत आहे पाहा, ' माझ्याबरोबर असलेल्या एका मित्राला मी म्हणालों, ' बदाम कीं पिस्ता याचा विचारसुद्धां करीत नाहीं हा गुलाम. त्याला फक्त मोठं चॉकोलेट पाहिजे ! '

गंभीर चेहरा करून छोटा तत्त्ववेत्ता असलेला माझा मित्र म्हणाला, ' त्या पोराला काय हंसायचं ? आजकाल सगळ्यांनाच एकापेक्षां एक मोठ्यांचा सोस लागलाय् ! '

' पुरे पुरे, तुझं तत्त्वज्ञान ! ' म्हणून त्या वेळेला त्याची मी थट्टा केली; पण त्याच्या बोलण्यांत खूपच तथ्य आहे, असं अलीकडे मला वाटूं लागलंय्. आमचा देश एवढा मोठा आहे, आमच्या देशांतलं धरण सगळ्या जगांत लांब आहे. आमच्या देशांतल्या इमारती साऱ्या पृथ्वीतलावर उंच आहेत, हे शब्द अलीकडे सारखे कानांवर आदळत असतात. अशी बडबड करणाराला केव्हां केव्हां

चटकन् विचारावंसं वाटतं, ' का हो तुमच्या देशांतले गद्धेही सर्व जगांत मोठे असतील, नाहीं ? '

असं विचारावंसं वाटतं, पण आपण विचारीत नाहीं. कारण यांपैकीं बहुतेक सद्धेतूनं बोलत असतात, बढाई मारण्याकरितां बडबडत नसतात.

या बाबतींतले मला आलेले दोन अनुभव सांगण्यासारखे आहेत. प्रवासांत एकदां एक स्विस तरुण मला भेटला होता. एकमेकांच्या देशांसंबंधीं आम्ही बोलूं लागलों, आणि बोलतां बोलतां आमच्या देशाची लांबी-रुंदी, लोकसंख्या, हिमालयपर्वत यांचं वर्णन मी करूं लागलों. मी बढाई मारीत नव्हतों, — खरं तेंच सांगत होतों. तो एकदम उद्गारला, ' खरंच, तुमच्या देशांत मी जन्मलों असतों तर बरं झालं असतं ! '

' कां रे, बुवा, ' मी हंसत म्हणालों, ' मला वाटतं, मी तुमच्या देशांत जन्मलों असतों तर बरं झालं असतं ! '

' म्हणजे ? ' तो उद्गारला.

' म्हणजे असं, ' मी म्हणालों, ' कीं सगळंच आमच्याकडे मोठं असल्या-मुळं इतक्या वर्षांत माझ्या देशाचे कांहीं एक-दोन कोनेकोपरे मीं पाहिले असतील, हिमालय चढून जाण्याची तर गोष्टच नको. उलट, तुझ्या देशाची लांबी रुंदी दोन-तीन तासांच्या आगगाडीच्या प्रवासानं पाहून घेतां येते. वर्षांतून चार वेळां देशांतला कानाकोपरा हवा तर पायीं फिरून पाहावा ! तुझा एवढासा आल्प्स हवा त्यानं हवा तेव्हां चढावा ! लहानसा देश असल्यामुळं तुम्ही तो स्वच्छ किती ठेवतां, तुमचं आरोग्य काय, तुमचं राहणीचं मान किती छान ! आमचं सर्वच मोठं, त्याबरोबर आमचं दारिद्र्यही मोठं, आमचा गबाळेपणाही मोठा ! '

माझे हे शब्द ऐकून तो हंसला आणि शेवटीं त्याचा देश त्याला बरा नि माझा देश मला बरा असंच ठरलं. पण या बोलण्यांतली एक गोष्ट निर्विवाद आहे. मोठ्यांची हौस ठीक आहे. पण मोठ्यांचा हव्यास उपयोगाचा नाहीं; मोठ्याइतक्याच कांहीं छोट्या गोष्टीही महत्त्वाच्या असतात. पण पुष्कळ लोकांच्या हें ध्यानांत येत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां आग-गाडींत माझ्या शेजारींच बसलेल्या एका हिंदी भाषी गृहस्थाशीं मी बोलत होतों.

माणूस मोठा सुस्वभावी आणि विद्वान् होता. पण बोलतां बोलतां त्याचीं कांहीं मतं ऐकून मला आश्चर्य वाटलं. भारतांतल्या निरानिराळ्या भाषांसंबंधीं बोलतांना तो म्हणाला, ' आपला देश केवढा मोठा आहे. त्याची एकच एक मोठी भाषा पाहिजे. जास्तींत जास्त लोक हिंदी बोलतात तेव्हां ती मोठी भाषा आहे. तुमच्या मराठी, गुजराती, तामिळ, तेलुगु वगैरे छोट्या छोट्या भाषा तुम्ही शक्य तितक्या लवकर विसरून जाल नि आपण सारे हिन्दींत बोलूं शकूं तितकं आपल्या देशाचं लवकर कल्याण होईल. '

त्याच्यांशीं सरळ वादविवाद करण्यापेक्षां त्याची थोडी गम्मत करावी म्हणजे माझा मुद्दा त्याच्या लवकर ध्यानांत येईल असा विचार करून मी म्हणालों, ' तुमचं म्हणणं बरोबर आहे. पण मला वाटतं, सध्यांचा काळ लक्षांत घेतां आपण जरा याहीपेक्षां मोठं झालं पाहिजे. आतां सर्व जग आधुनिक विज्ञानानं जवळ आलंय् नि परस्परावलंबीही झालंय्. आपण सर्व एकत्र जगूं किंवा हायड्रोजन् बॉंबनं एकदमच एकत्र मरूं. जग आपल्या देशापेक्षां मोठं आहे हें तुम्ही एकदम मान्य कराल. देशाच्या कल्याणापेक्षां जगाच्या कल्याणाची काळजी वाहाणार अधिक मोठा हेंही तुम्ही अमान्य करणार नाहीं. जगाच्या कल्याणासाठीं जगाची एक भाषा असणं आवश्यक आहे, आणि इडों कीं एस्परांटो नांवाची एक विश्वभाषा कांहीं विद्वानांनीं तयारही केली आहे म्हणतात. तेव्हां जुन्या भाषा टाकून नवीनच शिकायची तर तुम्ही आम्ही सर्व ती एस्परांटोच शिकायला सुरुवात करूं या. त्याचप्रमाणें जगांत पिवळे लोक सर्वांत फार आहेत. त्यांच्या खालोखाल काळे आहेत; नि त्यांपेक्षां कमी गोरे आहेत; कातडी पिवळी करण्याचं रसायन शास्त्रज्ञ सहज शोधून काढतील ! तेव्हां जगांतल्या सर्व लोकांनीं पिवळं व्हावं हें बरं ! मग काळा, गोरा वगैरे वर्णभेदांचीं भांडणं दक्षिण आफ्रिकेंत वगैरे चाललींत तीं आपोआपच बंद पडतील नि जगाचं कल्याण होईल ! '

माझं हें व्याख्यान ऐकून तो मोठमोठ्यानं हंसूं लागला. माझा मुद्दा त्याच्या ताबडतोब ध्यानांत आला. मोठं, त्याहून मोठं, त्याहीपेक्षां मोठं असं म्हणत म्हणत जगाचा एकरंगी, एकसांची ठोकळा करायचा कीं काय ! जिवंत जग म्हणजे विविधतेनं नटलेलं जग. सर्व भाषा, सर्व रंग पाहिजेत. मोठ्याबरोबर लहानांनीं, लहानांबरोबर मोठ्यांनीं, काळ्यांबरोबर गोऱ्यांनीं, गोऱ्यांबरो-

बर काळ्यांनीं, – एकमेकांना खाण्याचा प्रयत्न न करतां एकमेकांशीं मिळून मिसळून राहण्यांतच मजा आहे.

या मोठेपणाच्या वादविवादांत एका इंग्रज मित्रानं मात्र मला चांगलंच निरुत्तर केलं. इंग्रज मोठे व्यवहारी, कोणत्याही आत्यंतिकतेच्या आहारीं न जाणारे, हें मला पुन्हा एकदां पटलं. त्याच्याबरोबर बोलतां बोलतां मी एकदां थट्टेंत म्हणालों, ' आज जगांतला सर्वांत मोठ्यांतला मोठा माणूस—गांधीजी आमचे आहेत. तुमच्यांत असा कुणी आहे ? '

' नाहीं, बुवा, ' तो शांतपणाचा मिस्किल भाव आणून म्हणाला, ' हें पाहा, तूं म्हणतोस तें खरं आहे; पण त्यांत एक लहानशी गोम आहे. सर्व मोठेपणाचा मक्ता तुम्हीं एकाच माणसाला दिल्यामुळें तुम्ही सर्व फारच छोटे राह्यला आहांत. आमचं तसं नाहीं. आम्ही मोठेपणा अधिक मोठ्या प्रमाणांत वांटला आहे. आमच्यांत एकच मोठा माणूस नाहीं; पण आमच्यांतला छोटा माणूस तुमच्या छोट्या माणसापेक्षां खूप मोठा आहे ! मला वाटतं, लोकशाहीच्या तत्त्वानुसार हेंच अधिक चांगलं. एक कोट्याधीश आणि कोट्यवधि माणसं दरिद्री असण्यापेक्षां कोट्यधीश कुणीच नाहीं, पण सर्वच जण कमी-अधिक सुखवस्तु असलेले बरं नाहीं का ? '

त्यानं मला चांगलाच टोला हाणला होता ! खरोखरच मोठं, मोठं करीत मोठ्याच्या मागं खुळ्यासारखं धांवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मोठीं यंत्रं, मोठीं शहरं, मोठ्या योजना, सर्वच मोठं मोठं करण्याच्या नादांत, ज्या छोट्याशा, माणूस नांवाच्या प्राण्यासाठीं हें सर्व चाललेलं असतं, तो विचारा शिल्लकच राहात नाहीं !

● ● ●

# १८

## प्रतिपक्षावर मात

*

प्रतिपक्षावर मात करण्याकरितां काय करावं, असा प्रश्न जेव्हां एखादा विचारतो तेव्हां प्रतिपक्षापेक्षां त्याचं स्वतःचं बळ कमी असतं आणि शक्तीपेक्षां सुद्धां युक्तीनें प्रतिपक्षावर कशी कुरघोडी करायची याचं उत्तर त्याला हवं असतं, असं मला वाटतं. प्रतिपक्षी बरोबरीचा असेल किंवा कमी तोलाचा असेल तर मात कशी करावी याची विशेष चिंता करण्याचं कारणच नाहीं. अफजुलखान किरकोळ असता तर भेटीचं सोंग करायचं, कडकडून मिठी मारायचं आणि हळूच त्याच्या पोटांत वाघनखं खुपसायचं शिवाजीला कांहींच कारण नव्हतं. त्यानं तिथल्या तिथं त्याची मुंडी मुरगाळली असती. अफजुलखानानं तसाच विचार केला होता. शिवाजी आपल्या मानानें अगदीं किरकोळ आहे. तेव्हां मिठी मारतांना आपण त्याला सहज कांखेंत चिरडून टाकूं ! पण त्यानं शिवाजीचा गळा आपल्या कांखेंत दाबण्याआधींच शिवाजीनं त्याची आंतडी बाहेर काढली. अफजुलखानाची कल्पना अशी कीं हा फक्त शरीराचा किंवा शक्तीचा सामना आहे. प्रतिपक्षी कांहीं डोकं वापरील हा विचार त्याच्या डोक्याला शिवूनहि गेला नाहीं ! शिवाजीनं हें बरोबर हेरलं होतं. प्रतिपक्षी शक्तीच्या मिजाशींत असेल तर त्याची ती मिजास तशीच राहूं द्यायची आणि आपण युक्तीचा अवलंब करायचा. थोडक्यांत सांगायचं म्हणजे शत्रु किंवा प्रतिपक्षी ज्याची अपेक्षा

करतो तेंच नक्की करायचं नाहीं, ही प्रतिपक्षावर मात करायची एक रामबाण युक्ति आहे.

आपल्या धंद्यांत अतिशय निष्णात म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका अमेरिकन चित्रपट निर्मात्याचा एका प्रख्यात इंग्लिश नटाला आलेला अनुभव मला इथं सांगावासा वाटतो. या निर्मात्याच्या श्रीमंतीसंबंधीं, त्याच्या हुशारीसंबंधीं, त्याच्या मिठास वाणीविषयीं आणि हां हां म्हणतां प्रतिपक्षाला खिशांत घालण्यासंबंधीं लोकांत नाना प्रकारच्या अफवा होत्या. एखाद्या राजाच्या राजवाड्यापेक्षां त्याच्या ऑफिसची खोली सजविलेली आहे. पांचसहा मोटमोटीं दालनं ओलांडून त्याच्या खोलींत पोहोंचेपर्यंत आजूबाजूच्या वैभवानंच त्याला भेटायला जाणारा माणूस अर्धा खचतो. त्याच्या बोलण्यांत अशी कांहीं विलक्षण मोहिनी आहे कीं मोठमोठ्या नटांना आणि नटींना कमींत कमी पगाराच्या जाळ्यांत तो सहज पकडतो, वगैरे वगैरे, शेंकडों दंतकथा लोक एकमेकांना सांगत. व्होल्टेअर, डिझरायली वगैरेंच्या अमर भूमिका चित्रपटांत करणारा प्रख्यात इंग्लिश नट जॉर्ज आर्लिस या निर्मात्याला भेटला तेव्हांची ही गोष्ट आहे. त्या वेळीं इंग्लंडच्या रंगभूमीवर एक मोठा नट म्हणून आर्लिस प्रसिद्ध होता. तो अमेरिकेंत गेलेला नव्हता किंवा चित्रपटांतहि त्यानं काम केलेलं नव्हतं. या अमेरिकन चित्रपट-निर्मात्यानं त्याला मुद्दाम एक सुंदर पत्र लिहून आपल्या चित्रपटांत काम करण्याकरितां अमेरिकेला बोलावून घेतलं होतं. त्या प्रसंगाच्या आठवणी लिहितांना आर्लिस म्हणतो, या निर्मात्याच्या चपल बुद्धीच्या इतक्या अद्‌भुतरम्य कथा लोकांनीं मला सांगितल्या होत्या कीं त्याला भेटावयाला जायच्या आधीं दोन दिवस मला दुसरें कांहीं सुचत नव्हतें. तो असं बोलेल, मग मी असं बोलेन, त्यानं मला असं बनवण्याचा प्रयत्न केला तर मी त्याला असं उत्तर देईन, त्यानं पन्नास हजार डॉलर्स एका चित्रपटांतल्या कामासाठीं देईन म्हटलं तर पाऊण लाखाच्या खालीं करारावर सही करायला तयार नाहीं असं मी त्याला खणखणींत बजावीन, वगैरे वगैरे विचारांनीं माझं डोकं मीं पिकवून घेतलं होतं. शेवटीं त्याला भेटायला जायचा दिवस उजाडला सगळे तयार केलेले मुद्दे मनांतल्या मनांत घोकून आणि छाती घट्ट करून आर्लिस त्या निर्मात्याला भेटायला निघाला. आर्लिसनं नावांचं कार्ड पाठविल्या-

बरोबर त्यानं आर्लिसला ताबडतोब आंत बोलावून घेतलं. आपल्या मोठ्या थोरल्या टेबलाशीं एक लठ्ठ चिरूट ओढीत तो बसला होता. आर्लिस आंत आल्याबरोबर तो उठून उभा राहिला आणि मोठ्या प्रेमानं आर्लिसला त्यानं आपल्याजवळ बसवून घेतलं. आर्लिस मनांत म्हणूं लागला — यानं आपले मोह-पाश टाकायला सुरुवात केली बरं का ! आर्लिसला त्यानं एक चिरूट दिला, आणि इंग्लडमध्यें आपण असतांना आर्लिसच्या निरनिराळ्या नाटकांतल्या एकाहून एक सरस भूमिकांवर आपण किती बेहद्द खूष झालों होतों, — त्याचं रसाळ वर्णन तो अगदीं मनःपूर्वक करूं लागला. तुझ्या स्तुतीनं मी मुळींच वितळणार नाहीं,—आर्लिस मनांत म्हणत होता,— तूं पैशाच्या गोष्टी काढ कीं तुला कसा ओढून धरतों पाहा !— शेवटीं कराराची गोष्ट निघाली. आर्लिस श्वास कोंडून धरून तो काय म्हणतो तें ऐकावयाला तयार झाला. त्यानं शांतपणें चिरूट खालीं ठेवला, आपल्या भव्य टेबलाचा एक खण उघडून एक कागद बाहेर ओढला आणि तो कागद आणि एक फाउंटनपेन आर्लिसच्या पुढं ठेवलं. करारपत्राचा तो एक कोरा फॉर्म होता.

‘ मि. आर्लिस ’ तो शांतपणें म्हणाला, ‘ तुम्ही मला हवेंत. तुमच्याशीं मी पैशांची घासाघीस करूंच शकत नाहीं. चित्रपटांतल्या कामासाठीं तुम्हांला हवी ती रक्कम तुम्ही खुशाल घाला; मी तिच्या खालीं सही करतों ! ’

आर्लिस म्हणतो, हे शब्द ऐकल्याबरोबर हिमालयाच्या शिखरावरून एकदम जमिनीवर आपटल्यासारखं मला झालं. वाद नाहीं, विवाद नाहीं, घासाघीस नाहीं कीं बनवाबनवीचा प्रयत्न नाहीं. आपण तयार केलेल्या मुद्द्यांची अगदीं धूळधाण उडाली. आपण भलतीच रक्कम कशी घालावी, अशी लाज उलट .आपल्याच मनाला वाटूं लागली ! एखाद्या सद्गृहस्थानं थोर मनानं आपणाला वाटेल ती रक्कम घाल म्हणून सांगितलं म्हणून आपण वाटेल ती रक्कम घालायची कीं काय ? आपणालाही कांहीं सभ्यपणा, मनाचा थोरपणा आहे कीं नाहीं ? पांच-दहा मिनिटं डोकं खाजवून, कमींत कमी आपण किती घ्यावं असा विचार करून करारपत्रावर आपण रक्कम टाकली असं आर्लिस लिहितो ! त्या निर्मोत्यानं प्रतिपक्षाला अगदीं चारही मुंडे चीत करून टाकलं.

प्रतिपक्षाला याहिपेक्षां अगदीं अनपेक्षित रीत्या चीत करून टाकल्याचं

दुसरं एक उदाहरण मला आठवतं. तेंहि सिनेमासृष्टींतलंच आहे. एक सिनेमा नटी आपल्या नवऱ्याला सोडून दुसऱ्या एका नटाबरोबर पळून जाण्याच्या विचारांत होती. तिचीं कांहीं पत्रं तिच्या नवऱ्याच्या हातीं पडलीं होतीं आणि त्यामुळं तिचे सर्व बेत नवऱ्याला आधींच कळले होते. आपण घरीं नसतांना तिचा प्रियकर कोणत्या दिवशीं कधीं येणार, कोणत्या गाडीनं तीं दोघं तें गांव सोडून कुठं जाणार, वगैरे वगैरे त्या दोघांचे सर्व बेत त्याला माहीत होते. एखादा सामान्य नवरा असता तर त्यानं ओरडाओरड, शिव्यागाळी, आदळा-आपट, मारामारी करून आपल्या बायकोचं मन आपल्याविरुद्ध अधिकच कलुषित केलं असतं. आणि तिचा घर सोडून जाण्याचा निश्चय अधिकच बळ-कट केला असता. या हुशार नवऱ्यानं विलक्षण रीतीनं प्रतिपक्षावर बाजू उल-टवली. तीं दोघं ज्या वेळीं निघणार होतीं त्या वेळेला बरोबर तो अचानक घरीं उपस्थित झाला. त्या वेळेला तो कधींच घरीं येत नसे. त्या दोघांना आश्चर्याचा धक्का बसला आणि त्यांचे चेहरे अगदीं काळवंडून गेले.

'कांहीं घाबरूं नका', तो शांतपणें त्या नटाला आणि आपल्या बायकोला म्हणाला, 'तुमचे सर्व बेत मला केव्हांच कळले होते. आयत्या वेळीं तुम्हांला स्टेशनवर जायला टॅक्सी मिळण्याची अडचण होईल म्हणून मी मुद्दाम माझी मोटर घेऊन आलों आहें!'

आपल्या बायकोकडे वळून तो म्हणाला, 'या गृहस्थाकडे फारसे पैसे नाहींत; तुला पहिले एक-दोन महिने खर्चाला कांहीं पैसे पाहिजेत का?'

त्याची बायको तर हतबुद्धच झाली. तिचा प्रियकर 'त-त-प-प' करूं लागला. आपल्या प्रियकराचा तो बावळटपणा पाहून तिला अतिशय राग आला. 'मला नाही तुमच्याबरोबर यायचं' म्हणून त्यालाच 'तूं इथून निघून जा' म्हणून ती सांगूं लागली! आणि त्या प्रियकरानं खालीं मान घालून तिथून पळ काढला!

आर्लिसला चीत करणाऱ्या त्या अमेरिकन निर्मात्याची किंवा या लोकविलक्षण नवऱ्याची, प्रतिपक्षावर मात करण्याची ही पद्धत सर्वसामान्य माणसाला साधेल असं मला वाटत नाहीं. आणि साधलीच तर ती नेहमींच यशस्वी होईल असंहि म्हणतां येणार नाहीं. सर्वसामान्य माणसांत इतकं धाडस असणं कठीण, पण

त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे या दोन्ही उदाहरणांत प्रतिपक्षांतहि कांहीं सदसद्विवेकबुद्धि, मनाचा थोरपणा आहे हें आपण विसरतां कामा नये. तुमच्या कुणीं थोबाडींत मारली तर उलट त्याच्या मुस्कटांत लगावण्याऐवजीं तुमचं दुसरं थोबाड पुढं करा, आणि प्रतिपक्षाला चीत करा, असं येशू ख्रिस्त सांगतो. तेव्हां तो हेंच धरून चालतो, कीं आपण दुसरा गाल पुढं केल्याबरोबर प्रतिपक्षाला स्वतःची लाज वाटेल, आणि आपल्या दुष्कृत्याचा त्याला पश्चात्ताप होईल. एकानं थोबाडींत मारली कीं दुसऱ्यानं त्याच्या उलट दोन मारायच्या, मग त्यानं पुन्हा तीन, अशा तऱ्हेनं दुष्कृत्यांची माळ लांबविण्यापेक्षां दुसरा गाल पुढं करून ती माळ तिथल्या तिथं तोडायची आणि प्रतिपक्षाला पश्चात्तापदग्ध व्हायला लावून जगांत एका चांगल्या माणसाची भर घालायची, हें येशू ख्रिस्ताचें — किंवा आपल्या महात्मा गांधींचें म्हणा, — तत्त्वज्ञान खरोखर उदार आणि उदात्त आहे. पण प्रतिपक्षाला सदसद्विवेकबुद्धिच किंवा काळीजच नसेल, किंवा असलेंच तर तें जर उलटें असेल तर या सर्व औदार्याचा आणि उदात्तपणाचा उपयोग काय ? जगांत एका चांगल्या माणसाची भर घालण्याऐवजीं दुष्कृत्यांना उत्तेजन देण्याचं पापच आपल्या हातून घडावयाचं ! समजा, आर्लिस सद्गृहस्थ नसता आणि त्यानं कोटी दोन कोटी डॉलर्स आपला पगार म्हणून त्या कोऱ्या करार-पत्रावर टाकले असते तर त्या अमेरिकन निर्मात्याचें दिवाळेंच निघालें असतें ! तसंच समजा, ती नटी अगदींच उलट्या काळजाची आणि लाजलज्जा कोळून प्यालेली असती, तर नवऱ्यानं दिलेले खर्चाचे पैसे घेऊन त्याच्याच गाडींतून आपल्या प्रियकराबरोबर ती पळून गेली असती ! आपण दुसरा गाल पुढं केल्याबरोबर स्वतःची लाज वाटून पश्चात्ताप होण्याऐवजीं पहिल्या गालावर एक तर दुसऱ्या गालावर प्रतिपक्षानं चार ठेवून दिल्या, तर कुठली दुष्कृत्यांची माळ तुटणं आणि कुठली चांगुलपणांत भर ! अर्थात्, येशू ख्रिस्त किंवा गांधीजी यावर म्हणतील, कीं प्रतिपक्षाला पश्चात्ताप होईल किंवा स्वतःची त्याला लाज वाटेल या अपेक्षेनं आपण भलेपणा दाखवायचाच नाहीं; फळाची आशा न धरतां आपण भलेपणाचं कर्म करायचं ! तें सर्व खरं, पण दुष्कृत्य करणारा माजतो त्याचं काय ? म्हणूनच सामान्य माणसाला प्रतिपक्षावर मात करण्याची ही लोकोत्तर पद्धति साधणं महाकर्मकठीण असं मी म्हणतों.

साहित्यिक वादविवादांतली प्रतिपक्षावर मात करण्याची पद्धत मात्र अगदीं सोपी, सुटसुटीत आणि सर्वसामान्य माणसाला अगदीं सहज साधण्यासारखी आहे. समजा 'अ' साहित्यिकानं 'ब' साहित्यिकावर वर्तमान-पत्रांत असा आरोप केला, कीं पुण्यांत झालेल्या अमुक अमुक सभेंत 'ब' नें अमुक अमुक भयंकर विधान केलें. 'अ'चें हें विधान धडधडीत खोटं आहे, कारण त्या दिवशीं पुण्यांत मी नव्हतोंच — त्या दिवशीं मुंबईत माझ्या एका मित्राची बायको फार आजारी असल्यामुळं त्याच्या घरींच सबंध दिवस होतों, असें 'ब' नें उत्तर दिलें. कुणालाहि वाटेल कीं आतां 'अ'ला कांहीं बोलणेंच उरलें नाहीं. 'ब' नें त्याचे सर्व दांत त्याच्या पुरेपूर घशांत घातले. पण हा वाद एवढ्यावर मुळींच थांबत नाहीं. दुसऱ्या दिवशीं 'अ' एक लांबलचक उत्तर 'ब' ला देतो. मित्राची बायको आजारी होती तर तिच्या शुश्रूषेसाठीं 'ब' ला जायचं कारण काय? तिचे किंवा त्या मित्राचे दुसरे कुणी नातेवाईक नव्हते कीं काय?

अशीं कांहींतरी सूचक विधानें करून 'अ' 'ब'च्या आणि त्याच्या मित्राच्या बायकोच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न करतो. मग 'ब' चिडतो आणि तिसऱ्या दिवशींच्या पत्रांत 'अ'च्या बायकोवर आणि 'अ'च्या एखाद्या मित्राच्या बायकोवर शिंतोडे उडवितो. अशा तऱ्हेनं वाद रंगत जातो; आणि मूळ जो मुद्दा 'ब' पुण्याच्या सभेंत विशिष्ट शब्द बोलला कीं नाहीं तो बाजूलाच राहतो. नव्हे, लोक आणि भांडणारे ते दोघे साहित्यिक तो पार विसरून जातात. शेवटीं बायकोची बेअब्रू पुरे झाली म्हणून 'ब' 'अ'पुढं हात टेकतो. आणि पुण्यांतच काय पण मुंबईतल्या सभेंतहि मीं तसे उद्गार काढले होते, असं जाहीर करतो. आणि मग 'अ' शेवटचें पत्र लिहून, पाहा मीं पहिल्यांदाच काय सांगितलं होतं, म्हणून आपला विजय सर्वांच्या नजरेस आणतो!

मुख्य मुद्दा सोडून सारखे शब्दांतून शब्द वाढवीत प्रतिपक्षाला जेरीस आणायचा ही शब्दसृष्टीच्या ईश्वरांची पद्धत आहे!

प्रतिपक्षाला जें हवें तें देणें म्हणजे आपला पराजय ताबडतोब कबूल करण्यासारखेंच आहे. पण प्रतिपक्षाला जें हवें तें त्याला अगदीं अजीर्ण होईल इतक्या फाजील प्रमाणांत देणें म्हणजे त्याची चांगलीच खोड मोडण्यासारखें आहे. हा

एक विचित्र अनुभव एकदां रस्त्यांत पाहिलेल्या एका प्रसंगावरून मला मिळाला. या नाट्यप्रसंगाचा नायक येशुख्रिस्ताच्या किंवा गांधीजींच्या बारशाला जेवला होता, असेंच म्हटलें पाहिजे. हा नायक म्हणजे एक दहा-बारा वर्षांचा भिकाऱ्याचा पोर होता. गल्लींतून जातां जातां तो बाजूला थुंकला आणि थोडीशी थुंकी तिकडून जाणाऱ्या एका धटिंगणाच्या अंगावर उडाली. त्या धटिंगणानें पुढें जाऊन त्याच्या एक श्रीमुखांत भडकावली. मला वाटलं, आतां हा पोर इथून रडत रडत पळून जाईल! पण त्या पोरानें मला चांगलाच आश्चर्याचा धक्का दिला. तो रडूं लागला.

पण रडत रडत छाती पुढें काढून तो त्या धटिंगणाला म्हणाला, 'एक थोबाडींत मारलीस पण दुसरी मारायची तुझी छाती आहे काय?'

त्या धटिंगणाने दुसरी एक त्याच्या थोबाडींत ठेवून दिली! आतां तरी तो पळेल अशी अपेक्षा करीत मी उभा होतों. पण छेः!

त्यानें रडत रडत त्या धटिंगणाला पुन्हा दरडावलें, 'दोन मारल्यास पण तिसरी मार पाहूं?'

त्या धटिंगणानें तिसरी एक चपराक त्याच्या कानशिलावर ठेवून दिली. आतां तरी–मी मनांत म्हणालों. छे!

'चवथी मारायची, तुझी काय छाती आहे!' तो ओक्साबोक्सीं रडत ताठ्यांत उद्गारला.

आतां मात्र तो धटिंगण हरला होता. 'काय कारटं आहे!' माझ्याकडे पाहात तो म्हणाला, 'याला मारीत बसायला मला वेळ नाहीं नि माझा हातहि दुखायला लागला. लेकाचे गाल गेंड्याच्या कातडीचे केलेले दिसतात!' असं म्हणून 'हरलों बुवा तुझ्यापुढें' असें म्हणत तो धटिंगण तिथून निघून गेला.

त्या भिकाऱ्याच्या पोरानें येशूख्रिस्ताचा उपदेश पुरा पाळून आपल्या प्रतिपक्षाला अगदीं चीत करून टाकला! प्रतिपक्षाला चीत करण्याकरितां त्याला मारायचा कीं त्याच्याकडून मार खायचा, हें या सर्व उदाहरणांवरून तुमचं तुम्हींच ठरवा!

• • •

## ११

## पानिपत झालं नसतं ?

*

एकदां गणूकाका आणि मी कसल्या तरी कार्यासाठीं देणगी मागण्याकरितां एका श्रीमंत गृहस्थाकडे गेलों होतों. त्या गृहस्थानं मोठ्या अदबीनं आमचं स्वागत केलं, आणि आमच्या कामाची विचारपूस केली. आम्हीं काम सांगतांच, 'मग किती पैसे देऊं!' असा प्रश्न त्यानें केला. गणूकाका इकडे तिकडे पाहूं लागले. मी मोठा थोरला श्वास घेऊन, 'शंभर रुपये तुम्हीं द्यावे' असं म्हणालों.

'हात्तिच्या' असं म्हणून तो गृहस्थ आंत गेला आणि शंभर रुपयांची एक नोट आणून त्यानं आमच्या हातावर ठेवली. पावती वगैरे देऊन, त्याचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही परत फिरलों. त्याच्या घरांतून बाहेर पाऊल टाकतांच गणूकाका मला म्हणाले, 'अगदीं बावळट आहेस तूं!'

'तो कां बुवा!' मीं आश्चर्यचकित होऊन विचारलं.

'अरे, इतका चांगला गृहस्थ तो, पांचशें रुपये मागितले असतेस तरी त्यानं या सत्कार्याकरितां सहज दिले असते.' काका म्हणाले.

'खरंच काका — पांचशें मागितले असते तर बरं झालं असतं!' मी म्हणालों.

'तूं काय मागतोस – तूं बरं झालं असतं मागाहून म्हणणार!' काका उद्गारले, 'कांहीं झालं तरी आपले गुजराती बंधू म्हणतात तेंच खरं!'

'काय?' मीं विचारलं.

'पश्चात् बुद्धि बामणिया न-आगळबुद्धि बनिया!' काका म्हणाले 'आपण बामण किंवा बुद्धिजीवी लोक मागाहून विचार करणार, – असं असं केलं असतं तर बरं झालं असतं. बनिया किंवा व्यापारी माणूस आधींच बरोबर हिशेब करतो नि मग काय बोलायचं तें बोलतो. तुझ्या जागीं असा कुणी आगळबुद्धि बनिया असता तर त्यानं हजार रुपये मागितले असते. म्हणजे पांचशें तरी सहज झर्तीं पडले असते.'

'जाऊं द्या, आतां काय त्याचं? आपण आहोंत तसे आहोंत – आतां कांहीं नवे होणार नाहीं आपण!' मी म्हणालों.

मीं स्वतःचं समाधान करण्याचा प्रयत्न केला खरा, पण आपलं चुकलं अशी माझ्या मनाला चुटपूट लागली यांत शंका नाहीं. या पश्चात् बुद्धीचा मला अगदीं राग आला. व्हायचं तें होतं. तें कांहीं पुन्हां नीट करतां येत नाहीं. या पश्चात् बुद्धिमुळं मनाला उगाच त्रास मात्र होतो. आयुष्यांतले हे लहान सहान अनुभवच कशाला,–मोठमोठया ऐतिहासिक घडामोडींसंबंधींही केव्हां केव्हां साऱ्या समाजाला किंवा सबंध राष्ट्राला उगाच चुटपूट लागते. पानिपतच्या पराजयामुळं महाराष्ट्रांतलीं लाखों कुटुंबं उघड्यावर पडलीं. कुणीतरी म्हणाला,–कुणाची तरी पश्चात् बुद्धि पुटपुटली – मराठयांना विजय मिळत होता, पण तेवढ्यांत हत्तीवरून भाऊसाहेब घोड्यावर बसून गर्दींत घुसले आणि फौजेला दिसेनासे झाले. त्यामुळें फौजेचा धीर सुटला आणि ती सैरावैरां पळूं लागली. त्या लाखों कुटुंबांना वाटलं असेल, सदाशिवरावभाऊ हत्तीवरून खालीं आले नसते तर किती बरं झालं असतं. वॉटर्लूच्या लढाईंत नेपोलियनचा पराभव झाला, त्याचंही कारण असंच सांगतात. कुमक घेऊन येणारा सेनापति ब्लूशर पांच मिनिटं उशिरां आला त्यामुळं म्हणे नेपोलियनचा पराभव झाला. फ्रेंच राष्ट्राला वाटलं असेल या पांच मिनिटांनीं केवढा घोटाळा केला. इतिहासाची उलटापालट झाली. पण या वाटण्याचा उपयोग काय? म्हणूनच केव्हां केव्हां वाटतं, माणसाला दिली कशाला ही पश्चात् बुद्धि!

39697 आ. ना.

मनाला त्रास झाला म्हणजे असं वाटतं खरं, पण पश्चात् बुद्धीचा कांहींच उपयोग नाहीं हें खरं नाहीं. थोडा शांतपणें विचार केल्यास माणस इतर प्राण्यांहून श्रेष्ठ आहे त्या श्रेष्ठत्वाचं मूळ थोडं तरी या पश्चात् बुद्धींत आहे, असं दिसून येईल. आपल्या कृतीचा माणूस पुन्हां विचार करतो, इतर प्राणी तसा विचार करीत नाहींत. तेव्हां त्या प्राण्यांच्या हातून त्याच त्याच चुका पुन्हां पुन्हां होतात. या पश्चात् बुद्धीचा,—या पुन्हां विचार करण्याचा, पुष्कळ वेळां तात्कालिक कांहीं उपयोग झाला नाहीं, तरी एकदां झालेली चूक पुन्हां होण्याचा संभव कमी होतो. इतर प्राणी आहेत तिथंच आहेत, माणसाची सारखी प्रगति, सारखी सुधारणा होत गेली आहे त्याचं मुख्य कारण हेंच.

या पश्चात् बुद्धीचं आणखी एक स्वरूप आहे. त्याचा मोठा मजेदार उपयोग आहे असं आधुनिक मानसशास्त्रज्ञ सांगतात. शास्त्रज्ञांचीं हीं मतं मीं वाचलीं होतीं; पण त्यांचा एकदां प्रत्यक्ष अनुभव आला तेव्हां तीं मला चांगलीं पटलीं. आम्ही तिघे-चौघे मित्र एकदां गप्पा करीत बसलों होतों. इतक्यांत आमच्या परिचयाचे एक गृहस्थ तिथं आले. बोलतां बोलतां आदले दिवशीं त्यांच्या ऑफिसांतल्या हेडक्लार्कशीं त्यांचा खटका उडाला होता, त्याचं रसभरीत वर्णन त्यांनीं केलं.

ते म्हणाले, ‘ मीं त्याला स्पष्ट सांगितलं, यापेक्षां अधिक कांहीं होणार नाहीं; नसेल पसंत तर हा माझा राजीनामा. कांहीं बोलला नाहीं. चूप बसला त्या-नंतर. ’ ते गृहस्थ गेल्यानंतर आमचा एक मित्र म्हणाला, ‘ तो हेडक्लार्क माझ्या ओळखीचा आहे. कांहीं कामाकरितां मी त्याला काल भेटायला गेलों होतों. तो थोडा कामांत होता म्हणून कपाटापलीकडच्या खुर्चीवर त्यानं मला बसायला सांगितलं. ज्या खटक्याचं या गृहस्थांनीं आतां वर्णन केलं तो सर्व मीं माझ्या कानांनीं काल ऐकला आहे. या गृहस्थांनीं मला पाह्यलं नाहीं, कारण मी कपाटाच्या पलीकडे होतों. ’

‘ मग तुला म्हणायचंय् काय ? ’ आम्हीं त्या मित्राला विचारलं.

‘ म्हणायचंय् इतकंच ’, तो म्हणाला, ‘ कीं त्यांनीं सांगितलं तसं कांहींच झालं नाहीं — हे स्पष्टही बोलले नाहींत कीं राजीनाम्याचीही यांनीं धमकी दिली नाहीं. हे तिथून गुपचूप निघून गेले ! ’

' मग तावातावानं उगाच खोटं कशाला सांगत होते आम्हाला ? ' एक जण म्हणाला.

' खोटं नाहीं ', मी म्हणालों, ' आम्हांला खोटं सांगून त्यांना काय मिळणार होतं ? कांहींच नाहीं. तें भांडण झाल्यावर ते परत आपल्या जागेवर येऊन बसले आणि त्यांच्या मनांत पश्चात् बुद्धि जागृत झाली, कीं आपण असं असं बोललों असतों तर बरं झालं असतं. पण तिथं कांहीं धीर झाला नाहीं. पण मनाला वाईट वाटतच होतं. तेव्हां जें व्हायला पाहिजे होतं तें झालं असं तुम्हां-आम्हांला ते सांगत होते. प्रत्यक्ष हेडक्लार्कची खरडपट्टी काढतां आली नाहीं, पण तुमच्या-आमच्यासमोर काल्पनिक खरडपट्टी काढतां आली, तेवढंच मनाला समाधान. आतां त्यांना हलकं वाटत असेल ! '

पश्चात् बुद्धीचा हा झाला आत्मसमाधानाकरितां उपयोग. असा उपयोग करणाऱ्या माणसाची आली तर आपणाला दयाच येईल, राग येणार नाहीं. पण कांहीं माणसं नंतर सुचलेल्या या बुद्धीचा उपयोग आपले दोष झांकण्या-करिता किंवा आपल्या सदसद्विवेकबुद्धीला गप्प बसवण्याकरितांसुद्धां करतात. एका मालकासंबंधीं मीं ऐकलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. युद्धकाळांत आपल्या धंद्यांत तो माणूस अमूप फायदा करीत होता, पण आपल्या नोकरांचे पगार मात्र विशिष्ट मर्यादेपलीकडे वाढवायला तो मुळींच तयार नव्हता. त्याचे मित्र त्याला म्हणाले, अरे इतका नफा तुला होतोय्, नोकरांचे पगार कां वाढ-वीत नाहींस ? '

त्यावर त्या परोपकारी मालकानं दिलेलं उत्तर मासलेवाईक आहे. तो म्हणाला, ' त्याचं असं आहे कीं यापेक्षां जास्त पगार त्यांना दिला तर त्या बिचाऱ्यांना ' इन्कम् टॅक्स ' द्यावा लागेल ! '

ही गोष्ट कदाचित् काल्पनिक असेल. पण मोठमोठ्या राष्ट्रांनींही याच जातीचे युक्तिवाद केल्याचे दाखले इतिहासांत आहेत. आपण भारतांत जे आलों तें केवळ सुराज्य आणि सुव्यवस्थेचा सुकाळ करून, इथल्या अजाण जनतेचा उद्धार करण्याकरितांच आलों, असं ब्रिटिश साम्राज्यवादी सांगत नसत का ? अफाट आफ्रिका खंडाची पिळवणूक करीत असतां अजूनही कित्येक गोरीं राष्ट्रं, ' काय करणार ? काळ्या लोकांचा उद्धार करण्याच्या जबाब-

दारीचं हें ओझें – हें ' व्हाइट मॅन्स् बर्डन् ' – परमेश्वरानं आपल्या डोक्यावर दिलंय् ' असं म्हणत नाहींत का ? सदसद्विवेकबुद्धीला गप्प बसविण्यांत तर आपण सर्वच वाकबगार असतों. एखाद्या दिवशीं आळसानं कामाला जायचं नाहीं, आणि मनाला मात्र सांगत बसायचं कीं आजचं काम महत्त्वाचं नव्हतंच – तसं एखाद्या दिवशीं काम केलं नाहीं कीं दुसऱ्या दिवशीं दुप्पट काम होतं, वगैरे वगैरे ! भिकाऱ्याला पैसा द्यायचा नाहीं; आणि मनाला जोरानं बजावायचं कीं भिकाऱ्यांना पैसे देणं म्हणजे निरुद्योगाला उत्तेजन देण्यासारखं आहे.

पश्चात् बुद्धि एकंदरींत चांगली नाहीं असं म्हणणारे बहुतेक लोक पूर्वबुद्धीचे मोठे उत्साही पुरस्कर्ते असतात. पूर्वबुद्धि याचा अर्थ हाच कीं एखादी गोष्ट केल्यानंतर मग विचार करीत बसण्यापेक्षां आधीं सर्व कांहीं विचार करावा. हें पूर्वबुद्धीचं तत्त्वं कुणीही मान्य करील. पण व्यवहारांत तें कितीसं शक्य आहे ? ' वर माग ' म्हटल्याबरोबर, ' माझ्या नातवाला सिंहासनावर बसलेला मला पाहूं द्या, ' असा वर आधीं पूर्णपणें सर्व विचार करून मागणारा आंधळा ब्राह्मण पुराणांत किंवा कल्पित कथेंतच सांपडायचा. नातवाला राजपद आणि स्वतःला डोळे आणि दीर्घायुष्य एका वरांत त्यानं घेऊन टाकलं ! बहुतेक वर मागणारे मिडाससारखेच असतात. 'मी हात लावीन त्याचं सोनं होऊं दे' असा वर सुवर्णलोभानं त्यानं मागितला; आणि मग अन्नाला हात लावला, सोनं झालं; पाण्याला हात लावला, सोनं झालं; असं होऊन उपासानं त्याला मरावं लागलं !

● ● ●

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. ५५९८
दि. ...

# २०

## गेले ते दिवस...

*

बऱ्या-वाईट अनुभवांचे कांहीं दिवस ज्यांनीं जगांत घालवलेत अशा प्रत्येकाच्या तोंडून केव्हां ना केव्हां तरी हे शब्द ऐकूं येतातच कीं, ' कांहीं विचारूं नका — गेले ते दिवस ! ' म्हाताऱ्यांच्या तोंडून ऐकूं येतात, मध्यम वयाच्यांच्या तोंडून ऐकूं येतात,— फार काय तरुणांच्याहि तोंडून येतात. खरं म्हटलं तर तरुणांचे फारसे दिवस या जगांत गेलेले नसतात. तरीहि अलीकडे त्यांच्या तोंडून भूतकालाबद्दल असे उद्‌गार बाहेर पडतात. पूर्वी म्हातारे आणि मध्यम वयाचे लोकच असे उद्‌गार काढीत. पण अलीकडे तरुणहि मधून मधून असं बोलूं लागलेत. म्हणजे ' गेले ते दिवस ! ' या उद्‌गारासंबंधींहि मी म्हणूं शकतों कीं, ' गेले ते दिवस ' असं म्हणणारे फक्त म्हातारे लोक होते तेहि दिवस गेले, आणि आजकाल तरुण-पोरंहि ' गेले ते दिवस ' म्हणूं लागलींत ! पाहा, कोटी करण्याच्या निमित्तानं कां होईना, पण माझ्यावरहि चाळीशी उलटल्याचा परिणाम दिसूं लागला ! ' गेले ते दिवस ' म्हणणारे फक्त म्हातारेच होते, ते दिवस गेले बरं,— असं मीहि म्हणूं लागलों ! पण त्यांत आश्चर्य काय ? हें रहाटगाडगं असंच चालायचं. आजचा तरुण उद्यां मध्यम वयाचा आणि परवां म्हातारा होणारच. कालाला थोपवून कोण धरणार ?

मात्र मी जें म्हणालों कीं, पूर्वी असं बोलणारे म्हातारे, किंवा फार तर

मध्यम वयस्कच होते, पण आजकाल तरुणहि मधून मधून असं बोलतात, त्याला थोडा अर्थ आहे. दोन महायुद्धं होऊन गेलीत. त्या पूर्वीच्या काळाच्या मानानं नंतरचा काळ फार झपाट्यानं बदलूं लागला यांत शंका नाहीं. त्या काळांत जीवनाचा वेग जितका संथ होता तितका नंतर राहिला नाहीं. त्यामुळं ज्यांच्या आयुष्याचे थोडेसे दिवस गेलेत त्यांना,– त्या तरुणांनाहि, आजच्यापेक्षां गेले ते दिवस चांगले होते असं वाटूं लागलं. आजचे तरुण लवकर म्हातारे होऊं लागलेत, असंच थोडंसं म्हणा ना. लागलों पुन्हां मी म्हाताऱ्यासारखा बोलायला! जाऊं द्या तें. 'गेले ते दिवस!' या उद्गारांच्या मागं मनोवृत्ति तरी काय असते ती पाहूं या. आतांपर्यंतच्या माझ्या बोलण्यावरून 'गेले ते दिवस' असं म्हणणाऱ्यांचा आशय, ते चांगले दिवस गेले किंवा गेले ते दिवस चांगले होते, आज वाईट दिवस आलेत किंवा चालू काळ जुन्या काळापेक्षां वाईट आहे, असाच होता, हें तुमच्या लक्षांत आलंच असेल. अर्थात् 'गेले ते दिवस' या उद्गारांचा दुसराहि अर्थ शक्य आहे. 'गेले ते एकदांचे वाईट दिवस — सुटलों बुवा! आतां सर्व कांहीं ठीक होईल' असंहि म्हणणारा एकादा दुसरा असतो,– नाहीं असं नाहीं. पण या अर्थानं 'गेले ते दिवस' म्हणणारा एखादा दुसराच. बहुतेक लोक मीं म्हटलें त्याप्रमाणें गेले ते दिवस चांगले होते,– आजचे ठीक नाहींत, याच अर्थानें ते शब्द वापरीत असतात. बहुतेक लोक असमाधानीच असतात. संत काय किंवा सामान्य काय, 'सुख पहातां जवापाडे, दुःख पर्वताएवढें' असंच बहुतेकांना वाटतं. तेव्हां या अर्थानं 'गेले ते दिवस' म्हणणारांच्याच मनोवृत्तीचा विचार करावा हें बरं. गेला तो दिवस किंवा ज्याला आपण 'काल' म्हणतों तो केव्हां ना केव्हां तरी 'आज' असतोच. मग तो 'काल' आज मात्र बरा वाटावा, आणि जो 'आज' वाईट वाटतोय तो कांहीं काळानंतर 'उद्यां' मात्र बरा वाटावा, हें काय गौडबंगाल आहे? मला वाटतं, आज काय, काल काय, उद्यां काय, कोणत्याहि काळीं थोडंबहुत सुख, थोडंबहुत दुःख, कांहीं बरं, कांहीं वाईट असतंच. पण कालांतरानं माणूस वाईट, त्रासदायक तेवढं विसरून जातो. आणि चांगलं, सुखकारक तेवढं मोठ्या प्रेमानं आपल्या स्मृतिकोशांत जपून ठेवतो. आजच्या वाईट, त्रासदायक गोष्टींनीं कातावलेल्याला तेवढंच जुन्या गोड

आठवणींचं समाधान. माणसाचं मन हें असं आहे, हे निसर्गाचे उपकारच समजले पाहिजेत. जर का सर्व कडू गोष्टींच्या आठवणींची अडगळ माणसांच्या मनांत तशीच सांचत गेली तर, मला वाटतं, जगणं अशक्य होईल.

गेले ते दिवस नेहमींच चांगले वाटतात. आणि ते चांगले वाटतात हेंच ठीक आहे, हें आपण पाह्यलं. पण त्याबरोबरच आजचे दिवसहि उद्यां गेलेले होतील, आणि उद्यांच्या लोकांना चांगले वाटूं लागतील, असा विचारहि तुमच्याआमच्या-सारखीं निःपक्षपाती माणसं करूं शकतात. आमचे गणूकाका तसलं कांहीं ऐकायला तयार नाहींत. 'गेले तेच दिवस चांगले, आजचे दिवस मुळींच चांगले नाहींत, आणि उद्यांचे तर त्याहूनहि वाईट येतील,' असं त्याचं ठाम मत आहे! बाकी त्यांच्या गोष्टी ऐकतांना पुष्कळ वेळां मीहि माझी निःपक्षपाती दृष्टि विसरतों, आणि खरोखरच ते वर्णन करीत असलेले दिवस सोन्याचे दिवस होते असं मला वाटूं लागतं. एकदां कुठून तरी प्रवासाहून मी परत आलों. बोलतां बोलतां काकांना म्हणालों, 'गाडीच्या रेस्टोरांमध्यें असा फक्कड चहा मिळाला म्हणून सांगूं काका, —'

'किती पैसे दिलेस एका कपाला?' काकांनीं शांतपणें चष्म्याच्या वरून माझ्याकडे पाहात विचारलं.

'सहा आणे,' मी म्हणालों.

'तेवढ्या पैशांत आम्ही तरुण असतांना चोवीस कप स्पेशल चहा पीत होतों!' ते म्हणाले, 'वेगळ्या भांड्यांतून दूध, साखर वगैरे मिळालं म्हणून तो चहा अगदीं फक्कड वाटला तुला, होय ना?'

'तो स्पेशल तर होताच' मी म्हणालों, 'पण तुमच्या वेळीं पैशाला मिळणारा एक कप कुठल्या तरी दुकानांत उकळलेला कळकट काढा असणार!'

'नाहीं, बाबा नाहीं!' ते उद्गारले, 'अगदीं स्पेशल चहा – वेगळं दूध, वेगळी साखर आणि वेगळी चहाची पावडर!'

'काय, म्हणतां काय?' मीं म्हटलं.

'अरे, त्या वेळीं एक पैशांत आम्ही स्पेशल चहा घरीं करूं शकत होतों. बाजारांत चांगलं जाड पैचं दूध मिळायचं, पैची साखर मिळायची नि पैची

पावडरहि मिळायची. केव्हां तरी एक पैसा खर्च करून मी असा स्पेशल चहा करून प्यायचा.'

'केव्हां तरी?'

'हो. केव्हां तरीच. उगाच पैसे खर्च करायला पैसे होते कुणाजवळ?' हे त्यांचे शब्द ऐकल्याबरोबर मी भानावर आलों. पैची साखर, पैचं दूध, पैची पावडर—पैला बाजारांत सर्व कांहीं मिळत असे हें ऐकूनच मी गुंग झालों होतों. आजकाल भिकारीहि 'दोन आणे द्या, साहेब,' म्हणतो! पण 'पैसे होते कुणाजवळ?' हे काकांचे शब्द ऐकून माझी निःपक्षपाती दृष्टि जागी झाली. पै-पैचे पदार्थ आणून स्पेशल चहा करतां येत असे, पण ती पैच दुर्मिळ होती. एक पैसा मिळवायला त्या काळच्या लोकांना जितके श्रम आणि जितका वेळ लागे तेवढ्याच श्रमांत आणि तेवढ्याच वेळांत आजचे लोक एक रुपया मिळवतात. काका एक पैसा खर्च करतांना जेवढा विचार करीत तेवढाच सहा आणे खर्च करतांना आम्हीं करतों.

काकांना मी थट्टेनं म्हणालों, 'काय हो, काका! रागावूं नका, एक गोष्ट विचारूं का तुम्हांला?'

'विचार ना,' ते म्हणाले.

'तुमच्या काकांच्या गोष्टी तुम्ही केव्हां केव्हां सांगतां,' मी म्हणालों, 'तुम्ही एक पैसा खर्च करून स्पेशल चहा प्याल्याचं कळल्यावर तुमचे काका काय म्हणत असत?'

'अरे, चहा प्यालों म्हणून त्यांना सांगण्याचीच सोय नव्हती,' काका म्हणाले, 'पैशाचाच काय, पण फुकट मिळालेला चहाहि पिऊं नये, असं त्यांचं मत होतं!'

'मग?'

'मग काय?' काका म्हणाले.

'नाहीं—मला असं विचारायचंय्,' मी म्हणालों, 'एका पैशांत एक कप स्पेशल चहा मिळण्याचे दिवस गेले अशी आज तुम्ही तक्रार करतां, त्याप्रमाणं तुमच्या काकांची त्या वेळीं तक्रार काय होती?'

'पुष्कळ तक्रारी होत्या.' काका म्हणाले, 'धर्म बुडाला, बायका शिकूं

लागल्या, जोडे घालून, छत्र्या घेऊन रस्त्यांतून जाऊं लागल्या, समई गेली, चिमणी आली —'

'काय, म्हणतां काय ? समई गेली, चिमणी आली काय ?'

'अरे, त्या वेळच्या म्हाताऱ्यांत हें एक मोठं लोकप्रिय पद होतं :

चालरीत सारी गेली, नित्य नवीं सोंगें आलीं
समई गेली, चिमणी आली वगैरे वगैरे.

चिमणी जाऊन विजेची बत्ती आली हें आम्हाला बरं वाटतं — आणि समई जाऊन चिमणी आली तें तुमच्या काकांना वाईट वाटलं काय ?' मीं म्हटलं.

'त्यांचंच म्हणणं बरोबर होतं,' काका ठासून म्हणाले, 'समईचा शांत, डोळ्यांना थंड ठेवणारा उजेड कुठं, आणि घाणेरड्या घासलेटच्या चिमणीचा डोळे बिघडवणारा उजेड कुठं ?'

'पण विजेच्या बत्तींत तर कांहीं घाण नाहीं ? आणि वाटेल तेव्हां उजेड, तेल नको, काड्याची पेटी नको, कांहीं करायला नको कीं कांहीं बघायला नको !' मी म्हणालों.

'हो ना,' काका म्हणाले, 'आणि एखादे दिवशीं यंत्र बिघडलं कीं साऱ्या गांवांत काळोख !'

'तें कचित्‌च,' मी म्हणालों, 'पण, काय हो काका, बायका जोडे घालून नि छत्र्या घेऊन रस्त्यांतून जाऊं लागल्या त्यांत तुमच्या काकांचं काय जात होतं ?'

'वाः ! बायकांनीं पुरुषांसारख्या छत्र्या घ्यायच्या नि जोडे घालायचे काय ?' काका म्हणाले.

'म्हणजे, बायकांच्या पायांना खडे लागत नाहींत नि त्यांना उन्हाचा त्रास होत नाहीं, असं तुमच्या काकांना वाटत होतं कीं काय ?' मीं विचारलं.

'तसं मुळींच वाटत नव्हतं.' काका म्हणाले, 'बायकांनीं मुळीं बाहेरच कशाला जायचं, असं त्यांना वाटत होतं. आणि त्यांचं तें वाटणं अगदीं बरोबर होतं.'

'तें कसं काय ?' मी म्हणालों.

'त्यांना बाहेर पडायला दिल्यामुळं काय परिणाम झाले ते आपण आतां

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



पाहतोंच आहोंत. — त्या घराबाहेरच पडायला लागल्यात ! ' काका म्हणाले, ' घटस्फोट काय, काडीमोड काय, आमच्या वेळीं कांहीं नव्हतं हें ! आधीं भलतंच स्वातंत्र्य द्यायचं नि मग निस्तरीत बसायचं ! '

गणूकाकांशीं यानंतर मीं बोलणं आवरतं घेतलं. कारण त्यांचीं हीं सर्व मतं माझ्या पूर्ण परिचयाचीं होतीं. गेले ते दिवस चांगले असं म्हणून निःश्वास टाकीत स्वस्थ बसणाऱ्यांपैकीं गणूकाका नाहींत; गेले ते दिवस चांगले होते यापेक्षांहि आजचे दिवस, आजच्या स्त्रिया, आजचे पुरुष, आजचं सर्व कांहीं कसं वाईट आहे हें पुनः पुन्हां सिद्ध करणारांपैकीं ते आहेत, हें मला पूर्ण माहीत होतं. आणि त्याची उजळणी मला पुन्हा ऐकायची नव्हती. स्त्रियांच्या स्वातंत्र्याची गोष्ट काढली कीं, घर सोडून पळून जाणाऱ्या स्त्रियांचीच त्यांना आठवण होते. विजेची बत्ती चिमणीपेक्षां चांगली म्हटलं कीं, कचित् यंत्र बिघडून सारं गांव काळोखांत बुडतं एवढंच नेमकं ते सांगतात. दोन-दोनशें माणसं घेऊन पांचशें मैल वेगानें जाणाऱ्या नवीन विमानाची गोष्ट त्यांना मी सांगत होतों.

ते ताबडतोब म्हणाले, ' म्हणजे कोसळलं कीं दोनशें माणसांचा एकदम निकाल ! पूर्वी तुमचीं विमानं नव्हतीं नि आगगाड्या-मोटारीहि नव्हत्या. तेव्हां लोक खरोखरच सुखी होते. '

' गेले ते दिवस ' म्हणणारे असं कांहीं बोलूं लागले कीं थोडा वेळ गप्प बसावं लागतं, हें खरं आहे. मोटारींचे, आगगाड्यांचे, विमानांचे अपघात होतात, शेंकडों माणसं ठार होतात, हें नाकबूल कसं करायचं ? तेव्हां मोटारी-विमानं नव्हतीं त्या काळांतले लोक अधिक सुखी होते असं क्षणभर वाटल्यास नवल नाहीं. नाना तऱ्हेच्या शस्त्रक्रिया डॉक्टर करतात, नाना प्रकारचे नवे रोग उघडकीला येतात, त्यांवर नवीं नवीं औषधें निघतात, अनेक लोक आश्चर्यकारक रीतीनें हृदयक्रिया बंद पडून मरतात,— या सर्व गोष्टींकडे बोट दाखवून, ' पाहा; पूर्वी हल्लींच्यासारखे एम्. डी., एफ्. आर्. सी. एस. डॉक्टर नसतील, एकाहून एक महाग औषधें नसतील, इंजेक्शनं नसतील, ऑपरेशनं नसतील, पण हे नवे नवे रोगहि नव्हते नि हृदयक्रिया नि दुसऱ्या कसल्या क्रिया बंद पडून लोकहि असे पटापट मरत नव्हते, '— असं हे गेलेल्या दिवसांचे खंदे पाठीराखे म्हणूं लागले, कीं आपण गोंधळल्यासारखे होतों खरे.

विजेच्या बत्त्या नसल्यामुळें एकदम काळोख होण्याची भीति नव्हती, मोटारी-विमानं नसल्यामुळें अपघात होत नव्हते, वगैरे वगैरे ठीक आहे. सुखाचीं कांहींच साधनं नव्हतीं तेव्हां त्या साधनांबरोबर येणारं दुःखहि नव्हतं हें खरं आहे. पण असाच विचार करीत गेलं तर माणसांपेक्षां जनावरं सुखी आणि जनावरांपेक्षांहि दगड-धोंडे अधिक सुखी असं म्हणावं लागेल. घरं बांधण्याचा, बांधलेलीं घरं साफसूफ ठेवण्याचा, पक्वान्न करण्याचा, खरकटीं काढण्याचा, कपडे विणण्याचा, फाटलेले कपडे शिवण्याचा त्यांना कांहींच त्रास नाहीं ! पूर्वीचे लोक सुखी होते म्हणजे काय होते ! सुख म्हणजे काय ? सुख म्हणजे दुःखाची संधीच न येणं ? मानवी जीवनांत तरी सुखाची अशी व्याख्या करतां येणार नाहीं. नाना अडचणींना तोंड देत, नाना दुःखांवर पराक्रमानं मात करीतच मानव पशूहून श्रेष्ठ होत गेला आहे. अशी मात करण्यांतच त्याला परमोच्च सुख लाभलं आहे. कोणत्याहि पक्ष्यापेक्षां आपण आकाशांत उंच उडूं शकतों यांतच मानवाला धन्यता वाटते. एखादे वेळीं विमान कोसळून मरत असतील शें-पन्नास माणसं, तथापि बैलगाडीच्या काळांत विमान कोसळण्याचा धोका नव्हता, तसं आकाशांत संचार करण्याचं भाग्यहि नव्हतं. डॉक्टर नव्हते, इंजेक्शनं नव्हतीं, ऑपरेशनं नव्हतीं; तेव्हां लोक आजच्याइतक्या प्रमाणांत मरत नव्हते असं मुळींच नाहीं. मरायचे ते मरतच होते. हृदयक्रिया बंद पडून मेले असं आपण आज म्हणतों, त्याऐवजीं अमक्याला त्याच्या वैऱ्यानं मूठ मारली, तमक्यावर तमक्यानं करणी केली नि तो रक्त ओकून मेला, असं म्हणत होते, इतकंच. आज अगोदरच निदान करून हृदयक्रिया अकस्मात् बंद न पडण्याची कांहीं तरी व्यवस्था करतां येते. पूर्वीं कां मेला म्हणून तर्ककुतर्क करीत बसावं लागे. समया एकदम जात नसत, विजेच्या बत्त्या एकदम केव्हां तरी जातात, हें खरं आहे. पण त्याबरोबरच दिवसापेक्षांहि लख्ख प्रकाशांत मध्यरात्रीं सारं गांव उजळून टाकतां येतं हेंहि खरं आहे. पूर्वीं मोटारीखालीं कुणी सांपडत नव्हते आणि विमान कोसळूनहि कुणी मरत नव्हते. पण शंभर मैलांच्यासाठीं आठ दिवसांत कराव्या लागणाऱ्या रखडपट्टींत रडत होते किती, पडत होते किती, आणि शेवटपर्यंत पोहोंचत होते किती ?

आजच्या मानवाचीं दुःखं मोठीं आहेत त्याप्रमाणेंच आजच्या मानवाचे

पराक्रमहि मोठे आहेत, आणि आजचीं सुखंहि मोठीं आहेत. गेले ते दिवस चांगले असतील, पण आजचे त्याहिपेक्षां चांगले आणि येणारे त्यांच्याहिपेक्षां चांगले, असंच कां म्हणूं नये ?

● ● ●

अक्र ३५५५४
विषय बा. वा.
क्र. २५५७
दि. [illegible]
मराठी ग्रं. सं. [illegible]

# २१

## शंकराचार्यांच्या गळ्यांत आइन्स्टाइन !

एकमेकांच्या अगदीं विरुद्ध दिशेनं जाणारीं दोन टोंकंच शेवटीं एकमेकांना येऊन मिळतात, हें तत्त्व अनेक बाबतींत मला पटलं होतं. आतां आणखी एका नव्या बाबतींत तें पटत असलेलं पाहून माझं मलाच आश्चर्य वाटतं. बिभीषणाइतकाच रावणही रामाचा निस्सीम भक्त होता असं कुणीं तरी म्हटलंय् म्हणे. रामाची एकनिष्ठपणें भक्ति करून बिभीषणाला मुक्ति मिळाली; रामाला आमरण विरोध केल्यामुळं रामाच्या हातून रावणाला मरण आलं, आणि रामाच्या हातून मरण आल्यामुळं त्यालाहि मुक्तीच मिळाली ! रावणही रामाचा बिभीषणाइतकाच भक्त होता; त्याच्या भक्तीचं नांव विरोधी भक्ति इतकंच ! पुराणांतल्या गोष्टी कशाला ? हाच अनुभव आपणाला रोजच्या जीवनांत येत नाहीं का ? ज्या माणसावर आपण आत्यंतिक प्रेम करतों त्या माणसाचे विचार अष्टौप्रहर आपल्या मनांत घोळत असतात. पण त्याचप्रमाणें ज्या माणसाचा आपण मनापासून द्वेष करीत असतों त्यालाही अष्टौप्रहर आपण विसरत नाहीं. आपल्या डोळ्यांसमोरून शेंकडों माणसं जात-येत असतात, शेंकडों माणसांशीं निरनिराळ्या कारणांनीं आपला हरघडी संबंध येतो. पण मनाला पकडून राहातात दोनच माणसं, — एक आत्यंतिक प्रेमाचं आणि दुसरं आत्यंतिक द्वेषाचं !

हेंच तत्त्व इंग्रजी भाषेंत एका वेगळ्या अनुभवाच्या रूपानं सांगितलं आहे. साधूला भूतकाळ असतो, तर पाप्याला भविष्यकाळ असतो म्हणे. आपल्याकडलं

उदाहरण घ्यायचं म्हणजे वाटमाऱ्या वाल्या कोळ्याचाच आद्य कवि मुनि वाल्मीकि झाला. ' मरा मरा ! ' म्हणतां येत होतं म्हणून शेवटीं ' राम राम ! ' असा जप त्याला करतां येऊं लागला ! तरुण वयांत अनन्वित पापं करणारा टॉल्स्टॉय शेवटीं संत-पदाला पोहोंचला. या साधूंचा भूतकाल असा काळाकुट्ट होता म्हणूनच कीं काय त्यांचा भविष्यकाल इतका उज्ज्वल झाला. भूतकाळांत ते पापी म्हणूनच जणूं भविष्यकाळीं ते साधू झाले.

दोन टोकं एकत्र येण्यासंबंधींचे हे अनुभव जुनेच आहेत. मला आश्चर्य वाटलं तें असल्याच एका नव्या अनुभवाचं. ब्रह्म सत्य, जग म्हणजे माया, अद्वैतवाद, केवळ तर्कानं सत्य कळत नाहीं, वगैरे वगैरे गोष्टी वेदान्तांत सांगितल्या आहेत, आणि शंकराचार्यांनीं विवेचिल्या आहेत. पण उपनिषदं आणि शंकराचार्य बसल्या जागीं आत्म्याचें ध्यान करीत साक्षात्काराच्या जोरावर जें सांगतात, तेंच अद्ययावत् पदार्थ-विज्ञानशास्त्र आणि आइन्स्टाइन साऱ्या जड विश्वाचा तर्कशुद्ध विचार करून, तो प्रयोगशाळेंत पडताळून सांगतात, हें पाहून कुणाला आश्चर्य वाटणार नाहीं ? हीं दोन टोकं एकत्र येतात हें खरोखरच महदाश्चर्य होय. पदार्थविज्ञानांत काल-परवांपर्यंत जड पदार्थ आणि चैतन्य या दोन मूलभूत गोष्टी होत्या. हातीं लागणारं, डोळ्यांना दिसणारं जड, तर जें अनुभवाला येतं पण दिसत नाहीं असं चैतन्य होतं. जड पदार्थांचा मूळ घटक अणु. हा अणु काय असावा याचं संशोधन करतां करतां ती चैतन्याचीच एक लहर असावी असा शास्त्रज्ञांनीं निष्कर्ष काढला आहे. म्हणजे जड असं कांहीं नाहींच — सगळंच चैतन्य ! शंकराचार्य हेंच सांगतात कीं जड जड म्हणून तुम्ही जें पाहतां तें सर्व माया आहे; ब्रह्म, आत्मा किंवा चैतन्य हेंच खरं. हेंच सत्य !

आइन्स्टाइनच्या एका संशोधनानं तर ही माया चांगलीच सिद्ध होते — खरोखरच जड वस्तु ही कशी माया आहे तें दिसतं. हें संशोधन असं आहे कीं काठीसारखी एखादी जड वस्तु एखाद्या गतिमान् शक्तीला जोडली तर गति वाढत जाईल तशी त्या काठीची लांबी कमी होत जाईल. प्रकाशाइतकं दुसरं कांहींच वेगवान् नाहीं. प्रकाशाची गति सेकंदाला एक लक्ष शहाऐंशी हजार दोनशें चौऱ्याऐंशी मैल इतकी आहे. काठीला गति मिळतां मिळतां ती जर प्रकाशाच्या गतीनं जाऊं लागली तर तिची लांबी आंखडतां आंखडतां ती

नाहींशीच होईल. नाहींशी होईल म्हणजे — अगदीं नाहींशी होणार नाहीं — तिची लांबी उरणार नाहीं. चैतन्यरूपानं ती उरेलच. कुणी म्हणेल वेगाबरोबर लांबी कमी होते तर निरनिराळ्या वेगानं चालणाऱ्या यंत्रांचे दांडे आंखूड होत होत होत यंत्रं मोडून कशीं पडत नाहींत ? त्याला उत्तर असं आहे कीं प्रकाशाच्या वेगाच्या मानानं जगांतल्या कोणत्याही यंत्राचा कितीही वेग इतका क्षुल्लक आहे कीं त्यामुळें आंखूडपणा येतो, पण तो अगदींच उपेक्षणीय असतो. लांबी-रुंदीप्रमाणेंच आतां तर, हीं काळाचीं मापंही कशीं सापेक्ष किंवा मायारूप आहेत हेंही आइन्स्टाइननं दाखवलं आहे. कांहीं ताऱ्यांचा प्रकाश या पृथ्वीवर येऊन पोहोंचायला कित्येक वर्षं लागतात. एका विशिष्ट ताऱ्याचा प्रकाश पृथ्वीपर्यंत यायला अडतीस वर्षं लागतात ! म्हणजे दूरदर्शक यंत्रांतून पाहून आपण जेव्हां अमुक तारा मी आत्तां पाहिला असं म्हणतों, तेव्हां अडतीस वर्षांपूर्वीचा तो तारा आपण पाहिलेला असतो, — आपला ‘ आत्तां ’ तो कदाचित् त्या जागेवर शिल्लकही नसेल ! काठीचं चैतन्य नि चैतन्याची काठी हें जसं अद्वैत, तसंच अडतीस वर्षांपूर्वी असलेला नि आज कदाचित् नसलेला तारा आपण पाहतों ही माया ! शंकराचार्यांना कधीं आइन्स्टाइन मिठी मारील असं मला वाटलं नव्हतं; पण भेटला खरा तो आचार्यांना ! जग — नव्हे, सर्व विश्वच गोल आहे. स्थल माया नि कालहि माया. न भेटून करतात काय !

• • •

## २२

## जें माहीत हवं...

परवां एका मित्राबरोबर चहा पीत बसलों असतां गप्पा करतां करतां तो म्हणाला, ' कांहीं लोकांचा जुलूम आहे, बुवा ! '

' काय ? ' मी म्हणालों.

' अरे, ते मला पुन्हा पुन्हा डॉक्टर म्हणतात ! '

' मग त्यांत काय झालं ? ' मी हंसत म्हणालों, ' तूं डॉक्टरणीचा नवरा आहेस म्हणून तुला डॉक्टर म्हणतात ! वकिलाच्या बायकोला स्वतःचं नांव लिहितां येत नसलं तरी वकिलीणबाई, डॉक्टरच्या बायकोला डॉक्टर या शब्दाचं स्पेलिंग येत नसलं तरी तिला डॉक्टरीणबाई नाहीं का म्हणत ? उलट तसं कुणीं नाहीं म्हटलं तर त्या बायकांना राग येतो ! '

' छे बुवा ! पण आपणाला कसंसंच वाटतं. ' तो आंबट चेहरा करून उद्गारला.

त्याच्या बायकोचं आणि त्याचं मुळींच भांडण नाहीं. दोघांचं एकमेकांवर चांगलं प्रेम आहे. दोघांना एकमेकांविषयीं अतिशय आदर आहे. त्याला कमीपणा वाटण्यासारखंही कांहीं नाहीं. लंडन विद्यापीठाचा तो बी. एससी. असून चांगली चारशें रुपये पगाराची त्याला नोकरी आहे. उलट त्याच्या बायकोचाच पगार त्याच्यापेक्षां कमी आहे. कुठल्या तरी हॉस्पिटलांत तिला अडीचशें रुपये मिळतात. दोघांची एकमेकांविरुद्ध तक्रार नाहीं. डॉक्टरच्या

बायकोला कुणीं डॉक्टरीण म्हटल्यास तिला वाईट वाटत नाहीं; उलट बरंच वाटतं. मग डॉक्टरणीच्या नवऱ्याला कुणी चुकून डॉक्टर म्हणाला तर त्याला कसंसंच कां वाटावं ? त्याचं कारण उघड आहे. शतकानुशतकं समाजांतल्या पुरुषांच्या वर्चस्वामुळें पुरुषांत एक प्रकारचा अहंगंड निर्माण झाला आहे. कसाही पुरुष असला तरी आपल्या बायकोच्या नांवानें किंवा पदवीनं आपण ओळखलं जाणं त्याला कमीपणाचं वाटतं. ज्या कारणामुळें पुरुषांना कसंसंच वाटतं त्याच कारणामुळें स्त्रियांना तसल्याच परिस्थितींत बरं वाटतं. अनेक वर्षांच्या संवयीनें पांखराला पिंजरा किंवा पशूला पट्टा प्रिय वाटावा, त्याचप्रमाणें नवऱ्याचं नांव किंवा पदवी स्त्रियांना भूषणासारखी वाटते.

अशिक्षित आणि अडाणी स्त्रियांना हे पिंजरे आणि पट्टे प्रिय वाटतात याचं मला मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. मला आश्चर्य वाटतं तें स्वतःला पुरुषांच्या बरोबरीच्या समजणाऱ्या आणि बरोबरीचं स्थान मिळावं म्हणून झगडणाऱ्या सुशिक्षित आणि पुढारलेल्या स्त्रियांनांही या गोष्टी भूषणास्पद वाटतात त्याचं. कांहीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या स्त्रियांना असं वाटत नाहीं हें मला माहीत आहे. मी सर्वसामान्य सुशिक्षित स्त्रियांसंबंधीं बोलतों आहें. आपली बायको ज्या सभेची अध्यक्ष आहे त्या सभेला बायकोनें आपणाला बरोबर नेलं नाहीं म्हणून तक्रार करणारा एकही छोटा किंवा मोठा पुरुष मला आढळलेला नाहीं; पण अशाच प्रसंगीं नवऱ्यानें बरोबर नेलं नाहीं म्हणून रागवणाऱ्या डझनावारी सुशिक्षित आणि सुधारलेल्या स्त्रिया मीं पाहिल्या आहेत. अमके राव किंवा तमके पंत यांच्या अध्यक्षतेखालीं एखादा समारंभ चालू आहे, आणि हुशार मुलांना किंवा मुलींनां रावांच्या किंवा पंतांच्या विदुषी पत्नीच्या हस्तें बक्षिसें वाटण्यांत येत आहेत, हें दृश्य नेहमींचें आहे; पण अमक्या राणी किंवा तमक्या देवी या एखाद्या समारंभाच्या महनीय प्रवक्त्या आहेत, आणि यशस्वी खेळाडूंना त्यांच्या विद्वान् पतीच्या हस्तें पेले, ढाली देण्यांत येत आहेत, असा देखावा कधीं पाहिलेला तुम्हांला आठवतो काय ?

स्त्री-जातीच्या स्वाभिमानाचा हा प्रश्न आहे. समतेसाठीं पुरुषांबरोबर झगडणाऱ्या स्त्री-लढवय्यांनीं पुरुषांच्या पलटणींना तोंड देण्याकरितां आपलें दल सज्ज करण्यापूर्वीं आपल्या शिपायांच्या माना ताठ करण्याची ही चळवळ आधीं हातीं

घेतली पाहिजे, असं मला वाटतं. स्त्रियांना संपूर्णपणें पुरुषांच्या बरोबरीचं स्थान मिळावं अशा मताचा मी आहें. पण ही बरोबरी म्हणजे काय ? याची कल्पना बऱ्याच स्त्रियांना नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी एका विचारी राष्ट्रीय पुढाऱ्यानं आपल्या एका महत्त्वाच्या भाषणांत सांगितलं, कीं सुशिक्षित स्त्रियांनीं पुरुषांच्या क्षेत्रात स्पर्धा करण्यांत वेळ दवडण्याऐवजीं आपल्या विशिष्ट क्षेत्रांत मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या या सांगण्याचा उद्देश खात्रीनं असा नव्हता कीं सरोजिनी नायडूंनीं जन्मभर चूल फुंकीत बसावें किंवा मादाम् क्यूरींनीं झबलीं टोपडीं शिवण्यांत आयुष्य व्यतीत करावें. पण आपण केवळ स्त्रीच्या जन्माला आलों एवढ्यानेंच क्यूरी-नायडू झालों अशा भ्रमानें झपाटलेल्या दोन-चार कुमारिकांनीं लगेच किंकाळ्या ठोकल्या, ‘ पाहा हो पाहा, हे पुरुष कसे आप्पलपोटे आहेत तें. आम्ही स्त्रिया पुरुष करतात तीं सर्व कामें करूं शकूं ! ’ तुम्ही मुळींच करूं शकणार नाहीं, हें त्याला उत्तर आहे. आणि पुरुषांचीं कांहीं कामें तुम्ही करूं शकणार नाहीं यांत कोणत्याही प्रकारचा कमीपणा नाहीं. पुरुषांनाही स्त्रियांचीं कांहीं कामें कधींच करतां येणार नाहींत. सुमाता होण्याचा मान नेहमीं स्त्रीलाच मिळेल; पुरुष कितीही थोर झाला तरी त्याला कधींही मिळणार नाहीं ! रशियांत स्त्रियांना संपूर्ण समता आणि संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलेलं आहे. पण एका प्रख्यात रशियन शास्त्रज्ञानें आपल्या ‘ बायालॉजिकल् ट्रॅजेडी ऑफ् वुमन् ’ या पुस्तकांत हीच गोष्ट स्पष्ट केली आहे. पुरुषांची बरोबरी म्हणजे पुरुष करतील तें मी करणार असं म्हणणाऱ्या स्त्रिया, शेजारणीनें सरी घातली म्हणून स्वतःचा गळा, सरीशिवाय शेजारणीच्यापेक्षा शतपट सुंदर दिसत असतांही, दोरी घालून त्याला फांस लावणाऱ्या स्त्रीच्याच जातीच्या होत.

पुरुषांची बरोबरी या शब्दाचा अर्थच या असल्या स्त्रियांना कळत नाहीं, हेंच खरं. ‘ माझ्या सर्व मोठेपणाचं श्रेय माझ्या आईला आहे, ’ असं म्हणणाऱ्या नेपोलिअनची आई पुरुषांच्या बरोबरीची नव्हती असं कोण म्हणेल ? मुलांचं उत्तम पालन-पोषण करून देशाला एक-दोन चांगले नागरिक देणारी स्त्री, पुरुषांच्या बरोबरीनें कचेरींत काम करून पुरुषांइतकाच पगार मिळविणाऱ्या स्त्रीपेक्षां कोणत्याही प्रकारें कमी प्रतीची आहे असं समजण्याचं कारण नाहीं; किंबहुना ती कांकणभर सरसच ठरेल. सुशिक्षित स्त्री ही अधिक चांगली माता

होण्याचा संभव; पण सुमाता होण्यापेक्षां पगार अधिक महागाई मिळवण्यांत आपण मोठा पराक्रम केला आणि पुरुषांच्या बरोबरीला आलों, असं समजणाऱ्यांचा शहाणपणा काय वर्णावा! पुरुषांचीं कामें स्त्रियांनीं करूं नयेत किंवा चूल आणि मूल हेंच स्त्रियांचें क्षेत्र असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. ज्या स्त्रियांना जमेल त्यानीं पुरुषांचीं कामें खुशाल करावीं. पण असलीं कामें करण्यांतच समता आणि स्वातंत्र्य आहे ही कल्पना चुकीची आहे. अशा स्त्रिया केव्हांही थोड्याच असणार, आणि स्त्रियांच्या कर्तृत्वाचं क्षेत्र याहून किती तरी मोठं आहे.

बॅरीच्या नाटकांतल्या एका नायिकेची मला इथें आठवण होते. दिसायला सामान्य, शिक्षणानेंही ती सामान्यच होती, पण आपली शक्ति ती जाणून होती; पुरुषांशीं भलतीच बरोबरी करण्याचा तिला हव्यास नव्हता. तिचा नवरा पार्लमेंटचा सभासद झाला, मोठेपणाला चढला. पार्लमेंटासाठीं त्यानें लिहिलेल्या भाषणांत ती बारीक सारीक फेरफार सुचवी; पण त्यामुळेंच भाषण रंगे. अर्थात् त्याला तें सर्व स्वतःचेंच मोठेंपण वाटे. त्याच्या त्या समजुतीला ती उत्तेजनच देई. एका चटोर पोरीच्या तो प्रेमांतही पडला. त्या पोरीच्या संगतींत राहायला या बाईनें त्याला खुशाल परवानगी दिली. चार दिवसांत तो कंटाळेल याची तिला पूर्ण खात्री होती. त्याला काय हवं—काय नको, त्याच्या स्वभावाचे खाच-खळगे काय आहेत, हें आपणाला माहीत आहे,—त्या पोरीला मुळींच माहीत नाहीं याची तिला पूर्ण खात्री होती. त्या पोरीच्या संगतींत राहून त्यानें लिहिलेलें भाषण पार्लमेंटांत सपशेल पडलें. पूर्वीच्या त्याच्या भाषणांत मधून मधून ज्या सुंदर, सर्वांच्या अंतःकरणाची पकड घेणाऱ्या घरगुती छटा असत त्या या भाषणांत मुळींच नव्हत्या असं पार्लमेंटांतले त्याचे मित्र आणि पुढारी म्हणूं लागले. त्याच्या डोक्यांत प्रकाश पडला. त्या पोरीचा त्याला वीट आला. नाक धरून तो बायकोकडे परत आला.

या नाटकाला बॅरीनें नांव दिलें आहे—'जें प्रत्येक स्त्रीला माहीत असतें.' प्रत्येक स्त्रीला हें माहीत असतेंच असें नाहीं. असायला पाहिजे एवढं खरं!

● ● ●

# २३

## कल्पना असती तर...

वीस वर्षांपूर्वीची ती गोष्ट आहे. पण तिची आठवण झाली कीं माझ्या मनाला अजूनही यातना होतात. तत्त्वज्ञान सांगून मनाचं समाधान करण्याचा मी प्रयत्न करतों, आणि समाधान होतंही.

पण त्या गोष्टीची आठवण झाली कीं यातना होतातच. गोष्ट तशी अगदीं क्षुल्लक आहे. माझा एक जिवाभावाचा मित्र होता. एके दिवशीं संध्याकाळीं मी कांहीं तरी काम करीत बसलों असतां तो माझ्याकडे आला, आणि कोपऱ्यावरल्या दुकानांत चहा प्यायला चल म्हणाला. कामांत असल्यामुळं मी त्याला नाहीं म्हणालों. त्यानं फार आग्रह केला, तरी मी नाहींच गेलों. हिरमुसला होऊन तो निघून गेला. दुसऱ्या दिवशीं एका अपघातांत त्याला मृत्यु आला. त्याच्या मृत्यूचं दुःख असह्य होतंच, पण आदल्या दिवशीं त्याची एक साधी इच्छा आपण उद्दामपणें धुडकावून लावली या आठवणीनं मी मेल्याहून मेला झालों. आतां त्रिभुवन दिलं तरी त्याच्याबरोबर चहा घेतां येणार नाहीं. झाला तरी कसा माझ्या हातून तो राक्षसीपणा या विचारानं मी सुन्न झालों. यापूर्वीं अनेक वेळां त्याच्या किती तरी इच्छा मी मोडल्या होत्या. मित्र झाला म्हणून तो म्हणेल तें आपण नेहमीं थोडेंच करतों ? त्यानं माझ्या मनाविरुद्ध काय कमी वेळां वर्तन केलं होतं ? नाहीं म्हणतांनासुद्धां माझ्या मनांत मित्रभावच नव्हता का ? फार काय, तो मित्र होता म्हणूनच इतक्या बेमुर्वतखोर-

पणें आपण त्याला नाहीं म्हणूं शकलों. अशा अनेक युक्तिवादांनीं माझ्या मनाचं समाधान मीं त्या वेळीं केलं. अजूनहि असंच समाधान करतों. पण आठवण झाली कीं अजूनही काळजांत कळ येते, आणि वाटतं दुसऱ्या दिवशीं कांहीं तरी भयंकर होणार याची पुसटशी जरी कल्पना असती तर ?...

काय करणार होतों मी कल्पना असती तर ? त्यानं चल म्हटल्याबरोबर चहा प्यायला गेलों असतों, असं का मला म्हणायचंय् ? किती खुळेपणाची कल्पना आहे ही ! एखाद्याच्या मृत्यूची आधींच कल्पना असेल तर तो चहा-पाणी पिण्याच्या मनःस्थितींत असेल, आणि त्याचे मित्र तो उद्यां मरणार म्हणून त्याची जी जी इच्छा असेल ती ती पुरी करण्याच्या खटपटींत असतील, ही कल्पनाच किती हास्यास्पद आहे !

अशा एखाद्या अनुभवामुळें मनाला त्रास होतो तेव्हां भविष्याची कल्पना यावी,—पुढं काय होणार त्याचं ज्ञान असावं असं मनापासून वाटतं खरं; पण खरोखरच असं कांहीं झालं तर सारं जीवनच एक अखंड त्रास होईल !

माहीत नव्हतं म्हणून माझ्या हातून चूक झाली असं स्वतःला किंवा इतरांना सांगण्याची सोयच उरणार नाहीं. सर्व कांहीं माहीत असणं, सर्व कांहीं करण्याची शक्ति असणं ही फार भयंकर जबाबदारी आहे. परमेश्वरसुद्धां ती पार पाडूं शकत नाहीं, तर तुम्हां-आम्हां पामरांची काय कथा ? ईश्वर स्वतःला सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वसाक्षी वगैरे म्हणवतो त्यामुळें त्याच्या पाठिराख्यांची केव्हां केव्हां विलक्षण त्रेधा उडते. एकदां एका कट्टर ईश्वरवाद्याची मीं खूप गंमत केली.

मीं म्हटलं, ‘ काय हो, तुमच्या ईश्वरानं तुम्हां-आम्हां सर्वांना निर्माण केलं, तो, सर्वत्र आहे, तो सर्वज्ञ आहे, तो सर्वशक्तिमान आहे, सर्व खरं ना ? ’

‘ अर्थात् ! ’ त्यानं ताडकन् उत्तर दिलं.

‘ मग खुनी, दरोडेखोर लोकांना तुम्ही पापी समजत नसाल ? ’ मी विचारलं.

‘ म्हणजे ? ’ तो उद्गारला, ‘ खुनी, दरोडेखोर पापी लोकच. पापी ते पापीच ! ’

' असं कसं तुम्हांला म्हणतां येईल ? ' मी म्हणालों, ' सर्वांना परमेश्वरानं निर्माण केलं, म्हणजे खुनी, दरोडेखोरांनासुद्धां त्यानं निर्माण केलं, हें आलंच. तो सर्वत्र आहे म्हणजे त्या लोकांच्या शरीरांत, मनांत तो आहेच. तो सर्वज्ञ, भूत, वर्तमान, भविष्य जाणणारा असल्यामुळें खुनी खून करणार किंवा दरोडेखोर दरोडा घालणारें हें त्याला माहीत होतं. सर्वशक्तिमान् असल्यामुळं खुन्याला किंवा दरोडेखोराला तो आवरूं शकला असता. बोला, त्या लोकांनीं केलेल्या खुनाची किंवा घातलेल्या दरोड्याची जबाबदारी सर्वस्वीं तुमच्या परमेश्वरावर आहे कीं नाहीं ? कोर्टांत ईश्वराची शपथ घेऊन लोकांना खरं बोलायला सांगतात, तेव्हां एखाद्या गुन्हेगारानं मीं दाखवून दिल्याप्रमाणं युक्तिवाद करून जज्जाला जर म्हटलं, ' मला कां शिक्षा करतां ? मीं जें कांहीं केलं त्याला तुमचा परमेश्वर जबाबदार आहे ! ' तर तो जज्ज किंवा तुम्ही ईश्वरवादी काय उत्तर देणार ? '

' आम्ही त्याला असं उत्तर देणार, ' तो म्हणाला, ' कीं आम्हांला, या जजसाहेबांनाही परमेश्वरानंच निर्माण केलंय्, फांसही परमेश्वरानंच निर्माण केलाय् नि सर्वशक्तिमान् परमेश्वर ज्या अर्थी आम्हाला अडवीत नाहीं त्या अर्थी आम्ही तुला बेलाशक या फांसावर चढवणार ! समजलं ! '

' हें पाहा, ही कोटी झाली, ' मी म्हणालों, ' तुम्ही सरळ माझ्या प्रश्नाला उत्तर द्या. '

' सरळ उत्तर हेंच, तुम्हीं कांहीं चांगलं केलंत, पुण्य केलंत म्हणजे ' मीं केलं ! ' ' मीं केलं ! ' म्हणून जबाबदारी घेतां ना ? झालं तर. तशीच वाईटाची किंवा पापाचीही जबाबदारी तुम्हीं घ्यायला पाहिजे. '

' ठीक आहे,' मीं म्हणालों, ' यापुढं पुण्य केलं तर त्याचं श्रेय आम्हीं घेणार नाहीं, परमेश्वराला सर्व श्रेय देऊं. मग तरी आम्ही केलेल्या सर्व पापांची, खुनांची, चोऱ्यांची, दरोड्यांची जबाबदारी तुमच्या परमेश्वरावर आहे हें मान्य करायला तुम्ही तयार आहांत का ? '

त्याचा हा सारा युक्तिवाद कै. वामनराव जोशी यांनीं एके ठिकाणीं व्यक्त केलेल्या विचारांवरून तो करीत होता हें मीं ओळखलं होतं. पण तो युक्तिवाद मुळांतच ढिला असल्यामुळं त्याला उत्तर देणं कठीण नव्हतं.

'हें पाहा,' तो शांतपणें सांगूं लागला, 'परमेश्वर सर्वज्ञ असला तरी प्रत्येक गोष्टीची जबाबदारी त्याच्यावर कशी टाकतां येईल ! एखादे मास्तर मारके आहेत, आपल्या वर्गातल्या मुलांना ते मारणार, हें शेजारच्या वर्गात शिकवणाऱ्या मास्तरांना माहीत असलं तरी ते त्या दुसऱ्या वर्गातल्या मुलांचा मार चुकवूं शकणार नाहींत. त्या मुलांना मिळालेल्या मारांची जबाबदारी त्या मास्तरांवर नाहीं.'

'दुर्दैवानं गुन्हेगार आणि परमेश्वर यांचे संबंध दोन समान दर्जाच्या मास्तरांसारखे नाहींत,' मी म्हणालों, 'परमेश्वर नुसता सर्वज्ञ नाहीं. त्याला सर्व कांहीं माहीत असतं, पण अंगांत शक्ति नसती तर गोष्ट वेगळी होती. तुमचा परमेश्वर परिमित शक्तीचा मास्तर नाहीं, तो सर्वशक्तिमान् आहे. खुन्यांचे व दरोडेखोरांचे हात जागच्या जागीं लुळे करून टाकणं, फार काय, खून-दरोडयाचा विचारही त्यांच्या मनांत येऊं न देणं इतकी कर्तुमकर्तुम् शक्ति त्याच्यांत आहे ना ?'

खरंच, आपणांला बरंचसं माहीत नसतं, आणि माहीत असतं तेव्हांसुद्धां पुष्कळसं करण्याची शक्ति आपल्यांत नसते, हेंच चांगलं आहे.

ती जबाबदारी आपल्याला झेपली नसती. परमेश्वराचा मला मुळींच हेवा वाटत नाहीं. हवं कुणाला तें, सर्व कांहीं माहीत असणं, आणि सर्व कांहीं करण्याची शक्ति अंगांत असणं ? जीवनांत कांहीं आनंदच उरणार नाहीं, आपण सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान् झालों तर — इतिहासांत काय घडलं तें वाचायला जावं तर सर्व कांहीं माहीत आहे ! वर्तमानकाळांत डोळ्यांसमोर घडतंय् तें अर्थात माहीत आहेच ! पुढं भविष्यकाळांत काय होणार आहे तेंही माहीत आहे ! मग करायचंय् काय ?

काय घडलं तें पुष्कळसं माहीत नाहीं. काय होणार तें मुळींच माहीत नाहीं; त्यामुळें होऊन गेलेल्याचा छडा लावण्यांत आणि होऊं घातलेल्याचीं स्वप्नं पाहण्यांत केवढा आनंद असतो ! तेंच सर्व कांहीं करण्याच्या शक्तीचं. बऱ्याचशा गोष्टी आपणांला करतां येत नाहींत, — करतां येतीलसं वाटत नाहीं; म्हणून आपण ईर्ष्येनं कांहीं गोष्टी करायला घेतों. त्या करण्यांत यश आलं म्हणजे कृतकृत्यतेचा अपूर्व आनंद आपणांला होतो. सर्व कांहीं करण्याची शक्ति आहे आणि करूं तें

होणारच ही खात्री आहे, अशा परिस्थितींत कांहीं करण्यांत आनंद असेल, असं मला वाटत नाहीं. परमेश्वर होण्यापेक्षां माणूस होणंच बरं !

परमेश्वर असो वा नसो, असलाच तर तो परमदयाळु असो कीं परम-निष्ठुर असो,– माणसानीं एकमेकांशीं भलेपणानं वागण्याकरितां नीतिशास्त्र बनवलं; दुर्बलांचं बलिष्ठांपासून रक्षण करण्याकरितां कायदेकानू केले; प्रत्येकाला सर्वच कांहीं माहीत नाहीं, प्रत्येकजण सर्वच कांहीं करूं शकत नाहीं तेव्हां परस्पर सहकार्यानं मोठमोठीं कामें केलीं, याचा मला अभिमान वाटतो. ही दया, हा न्याय, ही सहानुभूति, हें सहकार्य म्हणजेच माणुसकी; आणि ही माणुसकी निर्माण होण्याचं कारण आपण सर्वज्ञ नाहीं, आपण सर्वशक्तिमान् नाहीं हेंच !

आपण आलों कुठून तें माहीत नाहीं, आपण जाणार कुठं तें माहीत नाहीं; या दोन अमर्याद अज्ञातांच्या मध्यें चांचपडणाऱ्या माणसानं, 'उद्यां काय होणार याची थोडीशी जरी कल्पना असती तर माझ्या मृत मित्राशीं मी अधिक चांगुलपणानं वागलों असतों,' असे म्हणण्यांत काय अर्थ आहे ? कल्पना नसतेच. किंबहुना नसते म्हणूनच चांगुलपणा आजचा उद्यांवर टाकायला नको होता. कसल्या तरी क्षुल्लक कामांत मी गुंतलों होतों. हातांतलं काम टाकून त्याच्याबरोबर चहा घेण्यासाठीं मीं जायला हवं होतं !

● ● ●

## २४

## ‘ पक्षि म्हणती ज्या आपुला... ’

लेखकांची माहिती देणारें एक वार्षिक प्रसिद्ध करूं पाहणाऱ्या एका प्रख्यात प्रकाशकानें कांहीं दिवसांपूर्वी माझ्याकडे एक प्रश्नपत्रिका पाठविली होती. त्या पत्रिकेंतल्या, तुमचा जन्म कधीं झाला, तुमचं शिक्षण काय, तुमच्या पुस्तकांचीं नांवें काय वगैरे प्रश्नांचीं उत्तरं मीं भराभर लिहून टाकलीं; पण, ‘ तुमचे कांहीं विशेष छंद ’ या प्रश्नाकडे आल्याबरोबर मी एकदम थबकलों. कुणाला पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद असतो तर कुणाला जुन्या नाण्यांचा संग्रह करण्याचा छंद असतो. कुणी हातांत घेण्याच्या नाना प्रकारच्या काठ्या घेऊन ठेवतात तर कुणी दुर्मिळ ग्रंथांचे शोकी असतात. तसा विशेष असा छंद मला कांहींच नाहीं. हातांतली पेन्सिल डोक्याला लावून, काय लिहावें, कीं कांहीं छंदच नाहीं म्हणून लिहावें असा विचार करीत मी बसलों होतों.

इतक्यांत चिवचिवाट करीत दोन चिमण्या माझ्या टेबलासमोरच्या खिडकींत आल्या आणि मला बघून एकदम थबकल्या. माझ्या खोलींतल्या भिंतीवर एक लांकडी घड्याळ आहे. त्या घड्याळाच्या आणि भिंतीच्या मधल्या फटींत चिमण्या नेहमीं घरटीं बांधीत असतात. काड्या, काटक्या, गवत, सुतांचे तुकडे, कापूस काथ्या काय मिळेल तें चोंचींत घेऊन तीं चिमणाचिमणी नेहमीं तिथें येत असतात. कशाबद्दल कुणाला ठाऊक, जोरजोरानें एकमेकांशीं भांडतच तीं दोघें खिडकींतून आंत येत होतीं. मला पाहिल्याबरोबर त्यांचं भांडण एकदम

थांबलं, पण एकाच्या चोंचींतली काडी माझ्या जवळच दोन-तीन हातांवर खालीं पडली. तीं दोघेंहि काडीकडे आणि माझ्याकडे आलटून पालटून पाहात आपापसांत कांहींतरी चिवचिवत होतीं. बहुधा माझ्याबद्दलच त्यांची कांहीं तरी गंभीर चर्चा चालली होती.

'घेतों झालं चट्कन् झेप टाकून काडी, मला नाहीं वाटत तो कांहीं करील', असं तो चिमणा म्हणत असावा.

'छे छे, नको उगाच, त्या मेल्यांचा नेम नाहीं, घालील कांहींतरी कपाळांत. एका काडीचं काय मेलं, मिळतील दुसऱ्या हव्या तेवढ्या' ती चिमणी सांगत असावी.

एकमेकांशीं तीं काय बोललीं असतील तें असो, विश्वास टाकायला मी लायक आहें असं त्यांनीं माझ्याबद्दल ठरवलेलें असो कीं बायकोच्या बोलण्याकडे लक्ष द्यायचं नाहीं असं त्या चिमण्यानं ठरवलेलं असो, भुर्कन् खालीं येऊन त्यानं ती काडी उचलली आणि तो घड्याळाकडे उडाला. त्याच्या मागोमाग चिवचिव करीत ती चिमणी गेली. मी संथपणें, जागचा मुळींच न हालतां हें सर्व पाहात होतों. एक प्रकारच्या निर्मळ आनंदांत मी गर्क झालों होतों. कांहीं वेळ तो कागद, तो प्रश्न सर्व कांहीं मी विसरून गेलों होतों.

चिमण्यांच्याकडे पाहात बसण्यांत मला नेहमींच असा आनंद होतो. चिमण्याच कशाला, हरप्रकारचे सुंदर सुंदर पक्षी मला आवडतात. त्यांना डोळे भरून पाहण्याचं मला विलक्षण वेड आहे. मुंबईत दुसरे पक्षी फारसे दिसत नाहींत तेव्हां चिमण्याच पाहात मी बसतों, इतकेंच. जें करण्यांत खराखुरा, निरपेक्ष, निर्मळ आनंद होतो त्याला छंद म्हणावयाचें असेल तर पक्ष्याकडे पाहात बसण्याचा मला छंद आहे हें कबूल केलें पाहिजे. 'छंद : सुंदर सुंदर पक्षी पाहण्याचा' असें त्या प्रश्नपत्रिकेवर मीं लिहून टाकलें.

हा छंद मला आहे खरा. खेळण्यांचें दुकान पाहून लहान मुलांना होतं तसं सुंदर पक्षी पाहून मला होतं. मग मी कुठं आहें, लोक काय म्हणतील याची मला मुळींच पर्वा वाटत नाहीं. परवां एका सार्वजनिक वाचनालयाच्या दाराशीं मी उभा होतों. दुपारची वेळ होती. हमरस्त्यावर ती इमारत असल्यामुळें किती तरी लोक तिथून जात-येत होते. इतक्यांत निरनिराळ्या रंगांचे चिमु-

कले पक्षी असलेले सात-आठ पिंजरे घेऊन जात असलेला एक पक्षीविक्या रस्त्यावरून जातांना मीं पाहिला. लाल पोट, तपकिरी अंग आणि काळी चोंच असलेले चिमणीहूनहि लहान पक्षी एका पिंजऱ्यांत, तर रेशमासारखं निळं अंग आणि त्यावर राखाडी ठिपके असलेले दुसऱ्यांत, असे पिवळ्या अंगाचे, गुलाबी चोंचींचे, किती तरी लहान-मोठे पक्षी त्या निरनिराळ्या पिंजऱ्यांत होते. उगाच त्या माणसाला बोलावून याची किंमत काय, हा केवढ्याला विकतोस म्हणून विचारायचें आणि शेवटीं विकत मात्र कांहींच घ्यायचें नाहीं, असें केल्यामुळें सर्व लोकांसमोर आपणाला शिव्या हांसडीत तो जाणार, याची पूर्ण खात्री असूनहि मीं त्याला हांक मारलीच. देईल चार शिव्या, पण ते पक्षी तर आपणांला डोळे भरून पाहून घेतां येतील ! सुदैवानें तो माणूस फार चांगला निघाला. फार किंमत सांगतोस असं मी म्हणाल्यावर तो शांतपणें निघून गेला ही गोष्ट निराळी.

असे सुंदर पक्षी दिसले कीं काय वाटेल ती किंमत देऊन ते विकत घ्यावे, आणि घरीं आणून पिंजऱ्यांत ठेवावे, असा अगदीं अनावर मोह मला नेहमीं होतो. पण अगदीं शुक्राचार्यांच्या मनोनिग्रहानें मी तो आवरतों. कांहीं वेळ-पर्यंत त्यांना पाहात बसणें बरें वाटेल, पण पिंजऱ्यांतले पक्षी पाहण्यांत कसला आनंद आहे ? पिंजऱ्यांतला पक्षी हा पक्षीच नव्हे. स्वातंत्र्य हा पक्ष्याचा प्राण आहे. पिंजऱ्यांतला पक्षी पाहणं म्हणजे पक्ष्याचं निर्जीव चित्रच पाहण्यासारखं आहे. पक्ष्यांचे रंग आणि रूप पहाण्यांतहि आनंद आहे, पण खरा ब्रह्मानंद आहे तो निळ्या आभाळांत त्यांच्या रंगबेरंगी पंखांच्या स्वैर भराऱ्या पाहण्यांत, हिरव्या-पिवळ्या पानांतून त्यांनीं केलेला गोड चिवचिवाट ऐकण्यांत, स्वच्छंद-पणें चाललेले त्यांचे शिवाशिवीचे खेळ निरखण्यांत.

स्वच्छंदपणें वागडणाऱ्या निरागस, सदा आनंदी मुलांना पाहण्यांत मला जो आनंद होतो त्यापेक्षांहि अधिक आनंद झाडाझुडुपांतून भिरभिरणाऱ्या पांखरांना पाहण्यांत होतो. मुलं कधीं तरी रडतात, ओरडतात, दुःखी-कष्टी झालेलीं दिसतात. पांखरं खरोखरच तीन्ही त्रिकाळ आनंदी; रडणारं, सुस-कारे सोडीत बसलेलं पांखरूं कधीं कुणीं पाहिलं आहे का ? मला तरी असलं पांखरूं कुठं पाहिलेलं आठवत नाहीं. आणखी एक गोष्ट आहे. मुलांना

पाहतां पाहतां केव्हां केव्हां एक विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं; लवकरच यांचं मूलपण संपेल, हीं मोठीं होतील, प्रौढ होतील. त्यांचा अवखळ-पणा, त्यांची निरागसता नष्ट होईल. पांखरांना पाहतांना असं कधींच वाटत नाहीं. पांखरूं म्हणजे जणू काय चिरयौवन ! म्हातारं पांखरूं हा शब्दप्रयोगच कसासा वाटतो. पांखरूं कधींच म्हातारं होत नाहीं, पांखरूं नेहमीं तरुणच असतं, नाहीं तर तें नसतंच !

नेहमीं आकाशांत, उच्च, दिव्य वातावरणांत विहार करीत असल्यामुळें कीं काय, शुद्ध, निर्मळ मनाचा माणूस पांखरं अचूक ओळखतात. टिळकांच्या उग्रपणाच्या मीं पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत. चहाला स्पर्शहि न करणारा एक माणूस टिळकांना कांहीं कामाकरितां एकदां भेटावयाला गेला होता. बोलतां बोलतां टिळकांनीं चहाचे दोन पेले आणावयाला नोकराला सांगितलें. मी चहा पीत नाहीं, असं टिळकांपुढं म्हणण्याचा त्या गृहस्थाला धीर झाला नाहीं ! पुढ्यांतला चहाचा कप त्यानं मुकाट्यानं पिऊन टाकला ! टिळकांच्या उग्र, वज्रकठोर व्यक्तित्वाबद्दल कुणी कांहीं म्हणो, टिळकांचं अंतःकरण कुसुमाहूनहि मृदु होतं याबद्दल मला यत्किंचितहि शंका नाहीं. मला दुसरा कसलाच पुरावा नको ! माझा पुरावा वादातीत आहे. पांखरांना टिळकांची मुळींच भीति वाटत नसे. निःशंकपणें तीं त्यांच्या अंगाखांद्यांवर खेळत. मंडालेच्या किल्ल्यांत टिळक राजबंदी असतांना तिथल्या त्यांच्या आचाऱ्यानं सांगितलेली एक आठ-वण माझ्या अंतःकरणाला नेहमीं गोड गुदगुल्या करीत असते. टिळकांच्या आणि आचाऱ्याच्या जेवणाकरितां तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडून धान्याचा जो शिधा मिळे त्यांतलं पुष्कळच धान्य उरत असे. तें सर्व धान्य आपलं जेवण चालू असतां टिळक पांखरांना घालीत असत. कितीतरी पांखरं टिळकांच्या आंवतीं भोंवतीं दाणे टिपायला यायचीं. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे माणसांना अतिशय उग्र, वज्रकठोर वाटणाऱ्या त्या महापुरुषाच्या अंगाखांद्यांवर तीं खुशाल उडायचीं, नाचायचीं ! आचारी तर टिळकांना महाराज म्हणायचा. त्याला ते देवपुरुषच वाटायचे. पण एके दिवशीं टिळक जेवत असतां तुरुंगाचा युरोपियन अधिकारी तिथं आला. टिळकांच्या अंगाखांद्यांवर मजेंत उड्या मारणारीं तीं पांखरं पाहून आश्चर्याचा धक्काच बसला त्याला.

'हें काय, मि. टिळक ?' तो उद्गारला.

'आम्ही त्यांना खात नाहीं. आम्हाला त्यांनीं कां भ्यावं ?' टिळकांनीं गंभीरपणें उत्तर दिलें !

टिळकांची त्रिखंडविख्यात विद्वत्ता, त्यांचं अलोट धैर्य, त्यांची महान् देशसेवा यांची मला कांहीं एक माहिती नसती,—त्यांच्या अंगाखांद्यांवर पांखरं निःशंकपणें खेळत असत एवढी एकच गोष्ट मला कळली असती, तरी टिळकांना मी एक थोर, लोकोत्तर पुरुष समजलों असतों.

साधु-पुरुष कसा ओळखावा हें सांगतांना तुकारामबुवा म्हणतात कीं :

'जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥'

असेल हें खरं, पण रंजलेल्या गांजलेल्यांविषयीं आपुलकी दाखवण्याचं ढोंग एखादा करील किंवा त्यांची सेवा करण्याचंहि सोंग तो आणील. आणि आपण सामान्य माणसं एखादे वेळीं फसून त्याला साधु पुरुष म्हणूं. तेव्हां पांखरांच्या उपजत बुद्धीवरच विश्वास टाकणं अधिक बरं. तीं भलत्याच माणसाच्या आसपास मुळींच फिरकणार नाहींत. म्हणूनच तुकारामबुवांच्या शब्दांत थोडा फेरफार करून मी म्हणेन कीं :

'पक्षि म्हणती ज्या आपुला । बसति ज्याच्या खांद्यागळां ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।'

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा
ग्रा. क्र. ५८७८ नों. दि ......

## देशमुख आणि कंपनीनें
## अनंत काणेकर यांचीं
## प्रकाशित केलेलीं पुस्तकें

१ पांढरीं शिडें
२ पिकलीं पानें
३ शिंपले आणि मोती
४ उघड्या खिडक्या
५ तुटलेले तारे
६ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे
७ फांस
८ चांदरात
९ निळे डोंगर तांबडी माती
१० निशिकांताची नवरी
११ रुपेरी वाळू